मनुष्याणाम् वृत्तिरर्थः।

ISSN 0973-8452

मराठी अर्थशास्त्र परिषद

नियतकालिक

(त्रैमासिक)

# अर्थसंवाद

मनुष्याणाम् वृत्तिरर्थः।

भारतीय सौर फाल्गुन – ज्येष्ठ शके १९४३

एप्रिल – मे – जून २०२१ / खंड ४५, अंक १

# ‘अर्थसंवाद’च्या लेखकांसाठी महत्त्वाच्या सूचना

१. लेखकांनी आपले शोधनिबंध Shree Lipi (२३३५) किंवा Kruti Dev किंवा Unicode यापैकी कोणत्याही Font मध्ये Pagemaker किंवा Ms Word मध्ये टाईप करून पाठवावा. या व्यतिरिक्त कोणताही Font वापरू नये.

२ **संशोधनपर लेखाची प्रत अथवा सीडी पोस्टाद्वारे पाठवू नये.** काही अडचण असल्यास संपादकांशी संपर्क साधावा.

३. **संशोधनपर लेखाची एक सॉफ्ट कॉपी (एक मूळ फाईल व त्याचीच PDF केलेली फाईल अशा दोन फाईल्स्) ई-मेल द्वारे प्रमुख संपादकांकडे rahulmhopare@rediffmail.com या ई-मेल अ‍ॅड्रेसवर पाठवावी.** लेखासोबत संपादकांना लेख पाठवल्याची स्वाक्षरी केलेली कव्हर नोट स्कॅन करून पाठवावी. तसेच ई-मेल केल्यानंतर संपादकांशी भ्रमणध्वनीवर (९९२३८७९०२०) संपर्क साधून आपला ई-मेल व्यवस्थित पोचल्याची खात्री करून घ्यावी.

४. संशोधनपर लेख पूर्वमुद्रित नसावा. त्यामध्ये कॉपीराईटचा भंग न करता संदर्भाचा उल्लेख करावा. आजीव सभासद क्रमांक, भ्रमणध्वनी क्रमांक व ई-मेल लिहिणे आवश्यक आहे.

५. लेखाच्या शीर्षकाखाली लेखकांनी स्वत:चे संपूर्ण नाव देवनागरीतूनच लिहावे.

६. संशोधनपर लेख खास अर्थसंवादसाठीच लिहिलेला असावा. माहिती व आकडेवारी अद्ययावत असावी. लेखात गरजेनुरूप सांख्यिकीय तक्ते व आलेखांचा वापर केल्यास उत्तम. लेखांची गुणवत्ता पाहून तज्ज्ञ परिक्षकांनी केलेल्या सर्व सूचनांची पूर्तता केल्यानंतरच त्याची प्रसिद्धीसाठी निवड केली जाईल.

७. भाषा संचालनालयाने प्रकाशित केलेल्या अर्थशास्त्र परिभाषा कोश यातील परिभाषेचा उपयोग करावा. संपादकांना पाठवलेल्या कव्हर नोटसह लेखनाची एक प्रत स्वत जयळ अवश्य ठेवावी.

८. लेखकांनी कृपया संशोधनपर लेख टाईप केल्यानंतर सर्व सांख्यिकी माहिती, शुद्धलेखन आणि व्याकरण अचूक तपासून नंतरच अंतिम प्रत पाठवावी.

९. संदर्भ सूची देताना पूढील पद्धतीने देणे आवश्यक आहे : उदा. पाटील, ज.फा., सुवर्ण महोत्सवी महाराष्ट्राची बदलती अर्थव्यवस्था, सकाळ पेपर्स लिमिटेड, पुणे, २०१०, (पृष्ठ क्रमांक असेल तर द्यावा.)

मनुष्याणाम् वृत्तिरर्थः।
www.marthpari.org
(स्थापना वर्ष - १९७७)

मराठी अर्थशास्त्र परिषदेचे त्रैमासिक

लोककल्याणमूलस्य अर्थशास्त्रस्य सिध्दये।
शोधचर्चाविवादार्थ संवादोऽयं प्रवर्तितः।।

# अर्थसंवाद

(तज्ज्ञ परिक्षित नियतकालीक)

Reg.No. 31918/77 / ISSN 0973-8452

एप्रिल - मे- जून २०२१/ खंड ४५ / अंक १

## अ नु क्र म णि का

१. **श्रीनिवास खांदेवाले**
कार्ल मार्क्सची २१ व्या शतकातील प्रस्तुतता .................. ३

२. **विजय मारुती कुंभार**
सावधान!.... माल्थस जागा झालाय ........................... ९

३. **हरी पंढरी वंगरवार**
भारतातील सोन्याच्या किमतीतील बदलाची आणि सोन्यातील गुंतवणुकीच्या विविध गुंतवणूक साधनातील गुंतवणूक प्रवृत्तीचा अभ्यास ..................................................... १६

४. **कृष्णा शंकर शहाणे**
आंबा आणि आंबा प्रक्रियायुक्त पदार्थांच्या निर्यातीतून परकीय चलन प्राप्ती ............................................. २५

५. **पी. एस. कांबळे**
सार्वजनिक अंदाजपत्रक सिद्धांत आणि व्यवहार: केंद्रीय आणि महाराष्ट्र अंदाजपत्रक २०२१-२२ ........................... ३५

६. **ज्ञानदेव तळुले**
महाराष्ट्राच्या कृषी स्मशानाची राजकीय अर्थव्यवस्था : विदर्भ व मराठवाड्यातील सर्वाधिक शेतकरी आत्महत्याग्रस्त दोन जिल्ह्यांचा जनगणना अभ्यास (जानेवारी २०१४ - डिसेंबर २०१७) ........................ ४५

७. **संतोष दास्ताने :** पुस्तक परिचय
ब्रेकींग थ्रू.................................................... ७४

८. **शि. ना. माने :** अर्थ शब्दांची वाट पाहे...
काही नवीन आर्थिक संज्ञा.................................. ७९

९. **जे. एफ. पाटील :** अर्थ शब्दांची वाट पाहे...
हिस्टेरेसिस ................................................... ८०

**प्रमुख संपादक**
**राहुल शं. म्होपरे**
(देवचंद कॉलेज, अर्जुननगर)

**सहाय्यक संपादक**
**चंद्रकांत जाधव**
(य.च.वारणा महाविद्यालय, वारणानगर)

**सल्लागार मंडळ**
**(२०१८-२२)**
**जनार्दन काकडे**
**राजू शिंदे**
**अजय दरेकर**
**मोहन सदामते**

**संपादकीय पत्रव्यवहार**
**राहुल शं. म्होपरे**
'सर' निवास, री.स.नं. ३३/क/२,
प्लॉट नं. १८, लेक व्ह्यू कॉलनी,
दीपा गॅस गोडावूनच्या पाठीमागे,
उजळाईवाडी, ता. करवीर,
जि. कोल्हापूर - ४१६ ००४
भ्रमणध्वनी : ९९२३८७९०२०

**लेखातील मते लेखकांचीच**

# मराठी अर्थशास्त्र परिषद

## कार्यकारी मंडळ २०२१-२२

- **अध्यक्ष**

**अनिल बा. सूर्यवंशी (सोलापूर)**

- **कार्याध्यक्ष**

**कैलास के. पाटील (परभणी)**

- **कार्यवाह खजिनदार**

**मारोती वि. तेगमपुरे (अंबड)**

- **प्रमुख संपादक-अर्थसंवाद**

**राहुल शं. म्होपरे (कोल्हापूर)**

- **विश्वस्त**

**आप्पासाहेब पुजारी (मंगळवेढा)**
**रामकृष्ण टाले (नागपूर)**
**अजय दरेकर (बारामती)**

- **सदस्य**

**विजय भोपाळे (नांदेड)**
**स्नेहा देशपांडे (नागपुर)**
**बळवंत कोरे (कराड)**
**गणेश मांगडे (दापोली)**
**माधव शिंदे (अहमदनगर)**
**सुरेश ढाके (भुसावळ)**
**शिवाजी काकडे (बीड)**
**अरुण पिसे (धुळे)**
**राजाराम पाटील (सोलापूर)**
**दयाळू राठोड (अकोला)**
**मनीषकुमार कायरकर (बल्लारपूर)**

- **स्वीकृत सदस्य**

**जयवंत इंगळे (विटा)**
**गोरक्षनाथ सानप (संगमनेर)**

- **स्थानिक कार्यवाह**

**संजय जगदेव कोठारी (नांदगाव)**


**कार्यालयीन पत्रव्यवहार:**


(आजीव सदस्य नोंदणी, जाहिरात पाठविणे)
मुद्रक-प्रकाशक : **मारोती वि. तेगमपुरे**
कार्यवाह खजिनदार, मराठी अर्थशास्त्र परिषद,
'संगाई', घर नं. २२, शहीद भगतसिंग नगर, भालचंद्र पेट्रोल पंपाच्यामागे, पारनेर रोड, अंबड, जि. जालना.
पिन - ४३१ २०४ भ्रमणध्वनी: ९४२३९९३१३७


**अर्थसंवाद वर्गणी :**

- **परिषदेचे सदस्य :**

| | |
|---|---|
| आजीव सदस्य | : रु.३०००/- (एकरकमी) |
| इमारत निधी | : रु.२०००/- |
| सदस्य सूची | : रु. १००/- |
| एकूण | : रु. ५१००/- |

- **संस्था सदस्य व अर्थसंवाद वर्गणीदार:**

शैक्षणिक संस्था
व्यावसायिक संस्था
ग्रंथालये
} रु.२०००/-(त्रैवार्षिक)
रु.३०००/-(पंचवार्षिक)

- **वर्षगणना :** १ एप्रिल ते ३१ मार्च
- संस्थांना आजीव सभासद होता येत नाही.
- कृपया आजीव सदस्य वर्गणी **मराठी अर्थशास्त्र परिषद** या नावाने डिमांड ड्राफ्टद्वारेच कार्यवाहांकडे पाठवावी.
- अर्थसंवादची वर्गणी **मराठी अर्थशास्त्र परिषद** या नावाने डिमांड ड्राफ्ट किंवा NEFT (BOI खाते क्र. 094720110000368, IFSC - BKID0000947, राजारामपुरी, कोल्हापूर) द्वारे प्रमुख संपादकाकडे पाठवावी.
- मनीऑर्डर व वार्षिक वर्गणी स्वीकारली जात नाही.


**अर्थसंवादसाठी अनुदानाबद्दल आभार:**

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई.


टिप: म. रा. सा. सं. मंडळाने अनुदान दिले असले तरी या नियतकालिकातील लेखकांच्या विचारांशी मंडळ आणि राज्य शासन सहमत असेलच असे नाही.


हे त्रैमासिक, प्रकाशक मारोती वि. तेगमपुरे (प्रमुख संपादक राहुल शं. म्होपरे) यांनी मराठी अर्थशास्त्र परिषद या संस्थेकरिता भारती मुद्रणालय, शाहुपुरी, कोल्हापूर येथे छापून मराठी अर्थशास्त्र परिषद, शहीद भगतसिंग नगर, भालचंद्र पेट्रोल पंपाच्यामागे, पारनेर रोड, अंबड - ४३१ २०४ येथे प्रसिद्ध केले.

# कार्ल मार्क्सची २१ व्या शतकातील प्रस्तुतता

**श्रीनिवास खांदेवाले** †

**प्रस्तावना :**

काळाच्या आणि विकास प्रक्रियेच्या ओघात विविध टप्प्यांवर काही प्रश्न नव्याने उद्‌भवतात, तर काही प्रश्न आधीपासून चालत आलेले असतात. काही प्रश्नाचे स्वरूप तात्कालिक असते. त्यांची सोडवणूक झाल्याबरोबर ते प्रश्न विरून जातात. सगळ्या प्रश्नांच्या सोडवणुकीकरता विविध क्षेत्रांमधील विचारवंत प्रतिसाद देत असतात. काही वेळा तात्कालिक प्रश्नसुद्धा इतके तातडीचे व गंभीर बनतात की कायमस्वरूपी प्रश्न बाजूला ठेवून विचारवंतांना तात्कालिक प्रश्न हाती घ्यावा लागतो. देशाच्या/प्रदेशाच्या स्वातंत्र्याचा प्रश्न ह्या प्रकारचा असतो. गुलामीच्या प्रश्नांचे सगळे पैलू उलगडण्यासाठी त्या विचारवंताला (जाणीव असूनही) दीर्घकालीन प्रश्न बाजूला सारून अल्पकालीन प्रश्न हाताळावे लागतात.[१]

प्रत्येक विचारवंत बराचसा त्याच्या काळातल्या प्रश्नांमधून शिकतो. त्या प्रश्नांच्या मुळाशी जाऊन जो मूलभूत योगदान करतो, त्याचे स्मरण दीर्घकाळपर्यंत होत राहते. कार्ल मार्क्स हा असाच एक विचारवंत आहे.

**जीवन व परिचय :**

कार्ल मार्क्सचा जन्म (२०३ वर्षे पूर्ण) ५ मे १८१८ मध्ये जर्मनीत ट्रायर शहरात झाला. वडील हायकोर्टात बॅरिस्टर होते. म्हणजे कुटुंब सुखवस्तू होते. ज्यू धर्म सोडून त्या कुटुंबाने ख्रिश्चन धर्म स्वीकारला होता. वयाच्या २३ व्या वर्षी (१८४१) तत्त्वज्ञानामध्ये त्यांनी पीएच.डी. केली. त्यांच्या प्रबंधाचा विषय होता: 'Difference Between Democretean and Epicurean Philosophy of Nature' शाळेतून विद्यापीठात आल्यानंतर पीएच.डी.चा प्रबंध सादर करण्यापर्यंतचा (त्या वेळच्या तेथील नियमांनुसार) ७-८ वर्षांचा काळ केवळ व्यक्तिमत्त्वाच्या विकासाचाच नव्हे तर भविष्यात त्यांनी जे कार्य केले त्याचा वैचारिक पायाभरणीचाही होता. त्यामुळे जर्मनीतल्या तत्त्वज्ञांच्या मतांची, जर्मन राज्य-धर्म-सामाजिक परिस्थितीची, समवयस्क मित्रांसोबत चर्चा करणे व निष्कर्ष काढणे आणि सगळ्याच ज्ञान शाखांचे अद्यावत वाचन करणे चालू होते. त्याचा मुख्य गाभा असा होता की, जुन्या धारणांमुळे तत्कालीन जर्मन समाजात ज्या शोषक विकृती निर्माण

† माजी अध्यक्ष, मराठी अर्थशास्त्र परिषद.
आजीव सभासद क्र. १०९, भ्रमणध्वनी : ७४४७५६१५४४, ई-मेल : shreenivaskhandewale12@gmail.com

झाल्या होत्या, त्या दूर करून नवपरिवर्तन घडवून आणायचे होते त्यासाठी जुन्या धारणांवर सडेतोड टीका (Merciless criticism of the past) ही अभ्यासपद्धतीचा एक भाग बनली होती.

जरी कुटुंबातील लोकांची इच्छा होती की, त्यांनी नोकरी (प्राध्यापकाची) करून आपले जीवन सुरू करावे तरी मार्क्सनी वैचारिकदृष्ट्या परिवर्तनाचा/क्रांतीचा मनोमन स्वीकार केला असल्यामुळे त्यांना वाचन-विचार-लिखाण ह्यातच (नोकरीपेक्षा) रस वाटत होता. त्यांचे वडील वकील, मध्यम वर्गीय (Bourgeois) आणि तत्कालीन चालू व्यवस्थेचे लाभार्थी होते. त्यांचा कल ती धर्म-राज्य-सामाजिक व्यवस्था टिकून राहण्याकडे होता. त्यांच्या मते मार्क्सचे वाचन फार पसरट, व्यवस्थेचा उच्छेद करणारे होते. पण पितापुत्रामध्ये मतभिन्नतांच्या प्रत्यक्ष प्रदर्शनाआधीच त्यांच्या वडिलांचा मृत्यू झाला. १८४१ मध्ये त्यांचा विवाह, त्यांची मैत्रीण जेनी वेस्टफॉलेन ह्यांच्याशी झाला.

त्यांच्या टीकात्मक लिखाणामुळे त्यांना जर्मनी सोडण्याचा आदेश झाला. ते फ्रान्समध्ये गेले. तिथे त्यांचा परिचय क्रांतिकारी समाजवादी लेखक-विचारवंतांशी झाला. तिथे त्यांच्या तत्त्वज्ञानात्मक विचारांना समाजवादाच्या भौतिकतेचे अधिष्ठान प्राप्त झाले. औद्योगिक श्रमिकांच्या संघटित शक्तीचे, राजसत्तेला आव्हान देण्यातले, दर्शन घडले. फ्रान्समध्ये असताना त्यांनी केलेल्या टीकात्मक लिखाणामुळे त्यांना फ्रान्सही सोडावा लागला आणि ते इंग्लंडमध्ये आले. तिथे इतर सगळ्या देशांमधून स्थलांतरित झालेल्या श्रमिकांच्या संघटनांबरोबर त्यांनी काम सुरू केले. फ्रान्स आणि जर्मनीतील मित्रांसोबत त्यांच्या पत्रव्यवहाराद्वारे संपर्क होताच. दरम्यान १८४४ मध्ये त्यांनी Economic and Philosophical Manuscripts (आर्थिक व तत्त्वज्ञानात्मक हस्तलिखित) हा ग्रंथ पूर्ण केला.[२] मार्क्सचे सहकारी फ्रेडरिक एंगल्स ह्यांनी Condition of the working class in England – 1844 प्रकाशित केल्यामुळे जगातील सर्वात श्रीमंत देशात श्रमिकांचे शोषण कसे चालू आहे, हे लक्षात आले. युरोपभर सरंजामशाही व भांडवलशाहीच्याविरुद्ध उठाव चालू होते. त्यातून ठिकठिकाणचे कम्युनिस्ट पक्ष लिखाण करीत होते आणि कम्युनिस्ट पक्षाला आंतरराष्ट्रीय पातळीवर (कम्युनिस्ट इंटरनॅशनल) संघटित करण्याची आवश्यकता भासत होती. त्यात सुसूत्रता व स्पष्ट दिशा यावी म्हणून त्या चळवळीच्या नेत्यांनी मार्क्स (त्या वेळी वय वर्षे ३०) आणि एंगल्स ह्यांना दस्तऐवज तयार करण्यास सांगितले. तो जगप्रसिद्ध दस्तऐवज Manifesto Of The Communist Party (साम्यवादी पक्षाचा जाहीरनामा, फेब्रुवारी १८४८ मध्ये युरोपातील क्रांत्यांच्या आधी) प्रकाशित झाला. लगोलग झालेल्या क्रांत्यांमध्ये नेहमी राजेशाहीवर टीका करणारा भांडवलदार वर्ग क्रांतीत महत्त्वाची भूमिका बजावेल असे जे श्रमिक वर्ग धरून चालला होता, तसे घडले नाही. त्यामुळे श्रमिक वर्ग एकटा पडला. सैनिकी कारवायांमध्ये सगळ्या क्रांत्या चिरडल्या गेल्या. तेव्हा मार्क्सने ठरविले की भांडवलदार वर्गावर अवलंबून न राहता श्रमिकांच्या मुक्तीची लढाई श्रमिक संघटनांना स्वतःच लढावी लागेल. त्यासाठी श्रमिकांचे आर्थिक तत्त्वज्ञान मांडावे लागेल व त्यासाठी भांडवली उत्पादन प्रणालीचा सखोल अभ्यास करावा लागेल.

मार्क्स १८४८ पासून इंग्लंडमध्ये होते, ते अभ्यासाकरिता इंग्लंडमध्येच थांबले. त्यांनी वस्तूत मूल्य श्रमिक निर्माण करतो आणि त्याच्या योगदानापेक्षा मूल्याचा (एकूण काम केलेल्या तासांपैकी कमी तासांचे

पारिश्रमिक देऊन) अल्प हिस्सा दिला जातो व बाकीचे वरकड मूल्य (सरप्लस व्हॅल्यू) भांडवलदार वर्ग ठेवून घेतो. म्हणून मार्क्सने त्या काळी (१८६१-६३) परिचयात असलेल्या सिद्धांतांचे संकलन केले. त्यांचे तीन खंड झाले.[३] मार्क्सनी जी आर्थिक मांडणी केली ती जर्मन भाषेत 'दास कापिटल' (इंग्रजीत 'धिस कॅपिटल') किंवा मराठीत 'भांडवल' ह्या नावाने ३ खंडांमध्ये प्रकाशित झाली.[४] इंग्लंडमध्ये त्यांनी जेम्स मिल ह्यांच्या राजकीय आर्थिक विचारांवर (Excerpts From James Mill's Elements of Political Economy) १८४४ मध्ये ग्रंथ रूपाने टिपण प्रकाशित केले. म्हणून असे म्हटले जाते की, मार्क्सच्या वैचारिक विकासामध्ये तीन प्रभाव दिसून येतात. प्रत्येक प्रभाव काही बाबतीत काहीसा प्रगत पण समाज बदलविण्यासाठी एकटा म्हणून अपूर्ण. ते तीन प्रभाव मार्क्सनी स्वत:च्या लिखाणात साधने म्हणून एकत्र आणून शोषणमुक्त समाज ह्या साध्याची मांडणी केली. ते तीन प्रवाह असे : (१) जर्मनीच्या विशेष संदर्भात, जुन्या राजवटींच्या, धार्मिक संघटनाच्या आणि आर्थिक संघटनाच्या व्यवहारात शोषणाचा सगळा भार उचलणाऱ्या (छोटे शतकरी, शेतमजूर, टोळी समाजाचे अवशेष ह्या) सर्वांना माणूस समजून, माणसाचे माणसाकडून होणारे शोषण समाप्त करण्याचे तत्त्वज्ञान; (२) समानतेचे हक्क मिळवून नव्या समाजाच्या निर्मितीसाठी समाजवादी विचार मांडून त्यासाठी राज्यव्यवस्थेशी प्रत्यक्ष लढा देणारी फ्रेंच क्रांतिकारी श्रमिक चळवळ; (३) राजाचे हक्क मर्यादित करणारी आणि स्वत:चा साम्राज्यातला नफा वाढत राहावा म्हणून श्रमिकांना (मतदान, हाऊस ऑफ कॉमन्स-लोकसभा, कामाचे कमी तास, अशा) सवलती देणारी नव्या औद्योगिक भांडवलशाहीवर आधारित लोकशाही.

साहजिकच, आज एकविसाव्या शतकातही वर वर्णन केलेले मुद्दे अवशेष म्हणून, जगातील कोणत्याही देशात, शिल्लक असतील किंवा विकास प्रक्रियेत नव्याने निर्माण झाले असतील त्यांना आजही मार्क्सचे प्रतिपादन प्रस्तुत/प्रासंगिक वाटत असले पाहिजे.

मार्क्सच्या मते, (आर्थिक फायदे मिळविणाऱ्या साम्राज्यवादी शक्ती असल्यामुळे) सामाजिक-राजकीय विकासामध्ये त्या क्रमाने इंग्लंड व फ्रान्स हे जर्मनीपेक्षा पुढे होते व खरी व्यवस्थापरिवर्तनाची गरज जर्मनीला होती. म्हणून मार्क्सच्या १८४८ च्या आसपासच्या लिखाणात जर्मनीच्या अपेक्षित क्रांतीची उत्कंठा वारंवार प्रदर्शित केलेली आढळते

मार्क्सचा मृत्यू १४ मार्च १८८३ रोजी लंडनमध्ये झाला. मार्क्सच्या हयातीत (१८६७ मध्ये) भांडवल ह्या ग्रंथाचा पहिला खंडच प्रकाशित होऊ शकला. नंतरचे दोन खंड एंगल्स ह्यांनी संपादित केले.[५]

**मार्क्सवादाचा व्यावहारिक अर्थ :**

श्रमाच्या शोषणाचे मूळ उत्पादनाच्या प्रक्रियेत शोधताना मार्क्सने असे म्हटले की, कच्च्या मालामध्ये/धातुमध्ये/सेवांमध्ये (आजचे यंत्र व व्यवस्थापन ज्ञान नसतानासुद्धा) वाढीव उपयोगिता-मूल्य श्रमशक्ती निर्माण करते. ती शारीरिक/मानसिक, सुशिक्षित/अशिक्षित, स्त्री-पुरुष, रंग-धर्म-प्रदेश भेदांपलीकडे जाऊन मूर्त व अमूर्त स्वरूपात पाहता, अनुभवता व मोजता येते. वस्तुचे मूल्य सामान्य स्थितीत साधारणपणे किमतींच्या स्वरूपात समजावून घेता येते. श्रमशक्तीच्या योगदानापेक्षा (व्यवस्था म्हणून) मूल्याचा कमी वाटा देणे म्हणजेच श्रमिकांचे शोषण आणि मूल्याचे अपहरण (Misappropriation) ठरते. अशा शोषणाविरोधात बहुतेक देशांमध्ये आंदोलने चालू असतात. त्या अर्थाने ती सार्वत्रिक असतात. म्हणून मार्क्सच्या विचारांना सार्वत्रिकता आहे.

हे शोषण दर्शविते की, उत्पादन साधनांवर श्रमिकांचे नियंत्रण नाही म्हणून ते शोषले जातात. ह्या कारणास्तव मार्क्सनी असे सुचवले की, अशा आर्थिक रचनेची आवश्यकता आहे की ज्यामध्ये श्रमिकांचे त्यांच्या उत्पादन साधनांवर नियंत्रण राहील. म्हणजे तेवढ्या प्रमाणात त्यांचे आर्थिक स्वातंत्र्य अबाधित राहील.

शोषण होत आहे हे ओळखण्याचे ढोबळ मार्ग महत्त्व क्रमाप्रमाणे पुढीलप्रमाणे आहेत : (१) राष्ट्रीय उत्पन्न अहवालांत दिसून येणारे उत्पन्न व संपत्तीचे विषम वाटप (२) काही लोकांचे निम्न राहणीमान (३) निरक्षरता व अकुशलता ह्यात वाढ (४) काही समाज घटकांचे उपोषण व कुपोषण (५) अनारोग्य, अकाली वार्धक्य, अकाली मृत्यू. ही लक्षणे ज्या देशांत व समाजांत आढळतात, तिथे लोकांना मार्क्सवादी लिखाण आशादायी वाटते. सरंजामशाहीत, कारखानी भांडवलशाहीत आणि आता स्वयंचलन व माहिती क्रांतीत शोषण ज्या तीव्र गतीने वाढत आहे त्यात खुला व छुपा साम्राज्यवाद, कायदे बदलाच्या प्रक्रिया समाविष्ट आहेत. साम्राज्यवादाचेही तत्त्वज्ञान मांडणारा, त्याचे समर्थन-प्रचार-प्रसार करणारा (लाभार्थी) माध्यमे, अर्थराजकीय तज्ज्ञ, उद्योजक-व्यापाऱ्यांच्या राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय संघटना, जनतेला खोटी आश्वासने देऊन लोकशाही पद्धतीने निवडून येणारी सरकारे असा मोठा वर्ग अविरत कार्य करीत असतो (आपल्यापैकी प्रत्येकजण कळत-नकळत, प्रत्यक्षपणे किंवा अप्रत्यक्षपणे ह्या शोषणाच्या बाजूने किंवा विरोधात कार्य करीत असतो). श्रमिकांना न्याय मिळण्यासाठी शोषक-शोषित वर्गसंघर्ष अटळ आहे. म्हणून असे म्हटले जाते की, शोषितांच्या भाऊगर्दीत कुठेतरी मार्क्स उभा असतो.

इंग्लंडमध्ये श्रमिक संघटनांच्या दबावात बरीचशी धोरणे (नफ्याची प्रक्रिया खंडित होऊ नये म्हणून) बदलली गेली. म्हणून मार्क्सने असे म्हटले की श्रमिकांना आर्थिक परिवर्तन हवे आहे. त्यासाठी आपणहून हिंसा नको आहे, त्यांना न्याय्य अनुकूल बदल हवा आहे. त्यात शासनसत्तेने हिंसा केली तर श्रमिकांच्या हिंसा-अहिंसेचा प्रश्न गैरलागू बनतो.

**वैचारिक प्रासंगिकता :**

डॉ. आंबेडकरांना प्रश्न विचारला होता की दलितांना बुद्ध हवा की मार्क्स : त्यांनी उत्तर दिले होते की, बद्धाने जीवनाच्या उच्चतर मूल्यांकडे संकेत केला होता. मार्क्सने सामान्य माणसाच्या भुकेचा प्रश्न उपस्थित केला, म्हणून आपल्याला दोघांचेही तत्त्वज्ञान हवे आहे. परिस्थितीनुसार त्यांचा उपयोग व्हावा.

विनोबा भावे (सोव्हियत संघात घडलेल्या हिंसक घटनांच्या संदर्भात) असे म्हणाले होते की, साम्यवाद उणे हिंसा म्हणजे सर्वोदय. अमेरिकन अर्थशास्त्रज्ञ रॉबर्ट हाईलब्रोनर असे म्हणाले होते की, उद्योजक कामाचे तास मर्यादित करतात, मजुरांना बोनस देतात ते त्यांनी बंद केले तर त्यांना दिसेल की मार्क्स त्यांच्या दारातच उभा आहे. अमेरिकेत सप्टेंबर २०११ मध्ये 'कॅप्चर द वॉल स्ट्रीट' (शेअर बाजारावर कब्जा करा) हे आंदोलन झाले. अमेरिकेचा शेअर बाजार वॉल स्ट्रीटवर आहे. शेअर बाजार हे भांडवलशाहीचे मुख्य चालक यंत्र आहे. त्या वेळी अमेरिकेबद्दल अशी आकडेवारी प्रसिद्ध झाली की, अमेरिकन संपत्तीपैकी निम्मी संपत्ती अतिधनाढ्य एक टक्का लोकांजवळ केंद्रित आहे आणि उरलेल्या संपत्तीत ९९ टक्के लोक कोंबलेले आहेत. म्हणून त्या आंदोलनाला १% विरुद्ध ९९% असे म्हटले गेले. त्या विषमतेचे गांभीर्य जाणून तिथला तरुण पेटून उठला. आंदोलन हिंसकही झाले. तरुणांच्या टी-शर्टवर लिहिलेले होते : "I Am 99%. I Will Not

Rest” (मी ९९ टक्के आहे. मी स्वस्थ बसणार नाही.) ते विषमतेविरुद्धचे आंदोलन इतर देशांतही पसरले. ही गोष्ट मार्क्सच्या आजच्या संगततेचेच उदाहरण आहे.

**आधुनिक प्रासंगिकता :**

आजच्या काळात जगभरच्या लोकांना मार्क्सचा विचार प्रस्तुत, संगत किंवा प्रासंगिक वाटतो त्याची मुख्य कारणे अशी:

(१) स्वयंचलित तंत्रज्ञानाने उत्पादनवाढ, एकूण उत्पन्नवाढ केली पण बेरोजगारी व विषमता वाढीमुळे जनआक्रोश.

(२) १९९१ च्या खासगीकरण, उदारीकरण, जागतिकीकरणामुळे आर्थिक विकासात आलेली मंदी घालविण्याचा प्रयत्न, त्यामुळे मंदीबाबत मार्क्सने काय म्हटले होते ह्याकडे जगाचे लक्ष.

(३) १९९५ पासूनचा जागतिक मुक्त व्यापारावरील भर; कॉर्पोरेट कंपन्या आणि अतिश्रीमंतांवरील करांमध्ये कपात व त्यामुळे सरकारांचा वाढलेला कर्जबाजारीपणा.

(४) खासगी क्षेत्रस्नेही धोरणांमुळे सार्वजनिक बँका बुडणे.

(५) सरकारी कर्जे कमी करण्यासाठी सार्वजनिक क्षेत्रातील उद्योगांचे भांडवल खासगी क्षेत्राला विकणे.

(६) भारतीय शेतीक्षेत्रात (उत्पादन, विक्री, संग्रहण इत्यादींमध्ये) जागतिक कंपन्यांच्याद्वारे नवसाम्राज्यवादाचा प्रवेश सुकर करण्यासाठी भारतात कायदे.

(७) हवामान बदल आणि खंडित होणारी उत्पादन व उत्पन्न वितरण श्रृंखला.

ही सगळी (व इतर अनेक) भांडवलशाहीची संकटे आहेत.

**उपाय काय?**

मार्क्सवादाच्याच भाषेत उपाय सांगायचे झाल्यास: राज्यसंस्थेत बदल, भांडवलशाहीवर नियंत्रणे, (खासगी नफा हे उद्दिष्ट नसलेल्या) नव्या, कालसंगत समूहवादी (Communitarian) व्यवस्था निर्माण करणे, इत्यादी.

संचित आणि केंद्रित भांडवलाची जी राजकीय व आर्थिक शक्ती आहे ती हे जनकेंद्रीबदल मान्य करील ह्याची मुळीच शक्यता नाही. १८४८ च्या क्रांत्या का अयशस्वी झाल्या त्याचे स्पष्टीकरण मार्क्स सदस्य असलेल्या Neue Rhinisehe Zeitung ह्या नियतकालिकाचे संपादक मंडळ जर्मनीतील श्रमिकांना कोलोनमधील संघर्षात पुढे न जाण्याचा इशारा देत आहे. तो इशारा असा, ''तुम्ही एल्बरफेल्ड मध्ये पाहिले आहे की (राजाविरुद्ध) भांडवलदार वर्ग श्रमिकांना संघर्षाच्या अग्निरेषेवर पाठवतो आणि नंतर त्यांचा अतिशय नीच पद्धतीने विश्वासघात करतो.'' (You have seen in Elberfeld how bourgeoisie sends workers in the fire-line and afterwords betrays them in the basest manner[6]) त्यामुळे पुढील काळात भांडवलदार वर्ग आणि श्रमिक वर्ग ह्यांच्यात संघर्ष अटळ आहे, हे मार्क्सना स्पष्टपणे जाणवत होते.

ह्या संघर्षाचा वैचारिक पाया म्हणून भांडवल ह्या ग्रंथाचा पहिला खंड पूर्ण केल्यानंतर आपल्या एका मित्राला पत्रोत्तर न दिल्याचे कारण ते सांगतात. ''मी मृत्युच्या दाराशी घुटमळत होतो. ज्या कामाच्या पूर्तीसाठी मी माझे आरोग्य, सुख आणि कुटुंब पणाला लावले, त्या कामाच्या पूर्ततेसाठी मला प्रत्येक क्षणाचा उपयोग करावा लागला.''[७]

**टीपा व संदर्भ :**

१. स्वातंत्र्यासाठी लढणाऱ्या क्रांतिकारकांचे तसेच होते. स्वातंत्र्य मिळाल्यानंतर क्रांतिकारक

कार्याची आवश्यकता व औचित्य संपते. मग ती व्यक्ती रोजच्या जगण्यासाठी शेतकरी, उद्योजक, व्यापारी, दुकानदार (म्हणजे सामान्य नागरिक) बनते. पण जनतेच्या मनात जुनीच प्रतिमा ठसलेली असते. त्यामुळे प्रतिमांचा गोंधळ होतो.

२. आजच्या बाजारव्यवस्थेत आर्थिकतेचा तत्त्वज्ञानाशी काही संबंध आहे हे लोकांना कळूच दिले जात नाही.

३. Marx, Karl, 'Theories of Surlus Value, (Vol. I) Lawrence & Wishart, 1967 Theories of Surplus Value (Vol. II) Lawrence &Wishart, 1970. Theories of Surplus Value (Vol. III) Lawrence &Wishart, 1972.

४. Marx Karl : Capital, Vol. 1 (English Edition) Penguin Marx Library, 1867 Capital, Vol. 2 (English Edition) Penguin Marx Library, 1885 Capital, Vol. 3 (English Edition) Penguin Marx Library, 1894.

५. प्रस्तुत लेखात आपण मार्क्सच्या तीन ग्रंथांचाच उल्लेख केला. परंतु त्यांची बरीच पुस्तके त्यांच्या मृत्युनंतर प्रकाशित झाली.

६. Marx Karl : The Revolutions of 1848, Penguin Books in Association with New Left Review, London, 1973, P. 264.

७. Quoted in Volkov G. "Birth of a Genius : The Development of the Personality and World Outlook of Karl Marx', Progress Publishers, Moscow, 1978, P. 198-99. ("Because I was constantly hovering at the edge of the grave. Hence I had to make use of every moment when I was able to work to complete my book to which I have sacrificed health, happiness and family …".)

◆

## निवेदन - अर्थसंवाद

अर्थसंवादच्या सर्व वर्गणीदार शैक्षणिक संस्था, व्यावसायिक संस्था, ग्रंथालयांना कळविण्यात येते की, मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या कार्यकारिणी व सर्वसाधारण सभेच्या ठरावानुसार १ एप्रिल, २०२० पासून अर्थसंवादची त्रैवार्षिक वर्गणी २००० रु. व पंचवार्षिक वर्गणी ३००० रु. करण्यात आलेली आहे. ज्या वर्गणीदार सदस्यांनी यापूर्वीच जुन्या दराने रक्कम पाठवली आहे त्यांनी फरकाची रक्कम त्वरित पाठवून देवून सहकार्य करावे.

**- प्रमुख संपादक, अर्थसंवाद**

# सावधान!... माल्थस जागा झालाय...

**विजय मारुती कुंभार** †

**प्रस्तावना :**

जगभरातील विविध देशांमध्ये कोरोना महामारीचे संकट वाढत जात असताना आजच्या घडीला सुप्रसिद्ध अर्थतज्ज्ञ थॉमस रॉबर्ट माल्थस यांची आठवण झाल्याशिवाय राहात नाही. जगभरात निर्माण झालेले कोरोना संकट अधिकच गंभीर होत जात आहे, जगभरातील विविध देशांमध्ये कोरोनाची लागण झालेल्या नागरिकांची संख्या अत्यंत जलद गतीने वाढत आहे. कोरोना महामारीची सुरुवात जगातील सर्वाधिक लोकसंख्या असलेल्या चीनमधून झाली आणि सध्या लोकसंख्येच्या बाबतीत दुसऱ्या क्रमांकावर असणाऱ्या भारतासारख्या महाकाय देशामध्ये त्याचा फैलाव अत्यंत जलदगतीने होत जाणे, याबाबी थॉमस माल्थस यांनी दिलेल्या संकेताशी मिळत्याजुळत्या आहेत.

**लेखाची उद्दिष्ट्ये :**

प्रस्तुत लेखाची मांडणी करण्यासाठी लेखकाने थोर अर्थतज्ज्ञ थॉमस माल्थस आणि सध्या निर्माण झालेल्या जागतिक महामारीचे संकट यांचे विवेचन करण्यासाठी पुढील उद्दिष्ट्ये डोळ्यांसमोर ठेवून लेखाची मांडणी केलेली आहे.

१. थॉमस माल्थस यांच्याशी सिद्धांताची मूलभूत बैठक अभ्यासणे.

२. जगभरातील महत्त्वाच्या नैसर्गिक संकटांचा व मनुष्यहानीचा आढावा घेणे.

३. कोरोना महामारीचे संकट व थॉमस माल्थस यांचा सिद्धांत यांच्यातील दुवा शोधणे.

**लेखासाठी आवश्यक तथ्ये व सामग्रीचे संकलन :**

प्रस्तुत लेखासाठी आवश्यक असणारी माहिती व विविध प्रकारचे सांख्यिकीय आकडेवारी विविध वर्तमानपत्रे शासकीय संकेतस्थळे तसेच इतर उपलब्ध माहिती स्त्रोतांच्याद्वारे संकलित करण्यात आलेली आहे. जगभरातील विविध देशांमधील नैसर्गिक आपत्ती व त्यामुळे झालेली मनुष्यहानी याची माहिती संकलित करण्यासाठी संबंधित देशातील नियतकालिके शोधनिबंध व इतर माहिती स्त्रोतांचा वापर करण्यात आलेला आहे.

**लेखाच्या मर्यादा :**

प्रस्तुत लेख थॉमस माल्थस यांचा लोकसंख्याविषयक सिद्धांत व वर्तमान परिस्थिती यावर

† विभाग प्रमुख, बँक मॅनेजमेंट विभाग, धनंजयराव गाडगीळ वाणिज्य महाविद्यालय, सातारा (स्वायत्त महाविद्यालय)
आजीव सभासद क्र. १२८६, भ्रमणध्वनी ९८६०१७६०५९, ई-मेल : vijay.kumbhar9@gmail.com

प्रकाश टाकण्यासाठी सादर करण्यात आलेला असून, सदर लेखामध्ये वर्तमान परिस्थितीतील कोरोना संकट आणि होणारी अपरिमित मनुष्यहानी याचा प्रभाव असू शकतो. थॉमस माल्थस यांनी दिलेले संकेत आणि जागतिक महामारी यांचा संबंध जोडण्याचा प्रयत्न प्रस्तुत लेखात करण्यात आलेला असल्यामुळे कांही वैयक्तिक मतांचा प्रभाव या लिखाणावर असू शकतो. सदर लेख हा परीक्षण करण्याच्या हेतूने नाही तर थॉमस माल्थस यांच्या संकेताची जाणीव करून देण्यासाठी मांडण्यात आलेला आहे.

**थॉमस माल्थस यांच्या विचारांची बैठक :**

थॉमस रॉबर्ट माल्थस हा अठराव्या शतकाच्या उत्तरार्धात होऊन गेलेला एक सुप्रसिद्ध अर्थशास्त्रज्ञ त्यांचा जन्म इंग्लंडमधील वेस्टकॉट या शहरांमध्ये १३ फेब्रुवारी, १७६६ मध्ये झाला. जगभरातील विविध देशांमध्ये अभ्यासदौरे करून लोकसंख्याविषयक अभ्यास करून लोकसंख्याविषयक जगप्रसिद्ध सिद्धांत मांडण्याचा प्रयत्न केला, यालाच माल्थसचा लोकसंख्याविषयक सिद्धांत असे म्हटले जाते. लोकसंख्या वाढीच्या दृष्टिकोनातून थॉमस माल्थस यांनी १७९८ मध्ये आपल्या An Essay on Principles of Population या ग्रंथातून प्रचंड लोकसंख्या वाढली असता आणि मनुष्याने स्वतःहून लोकसंख्या नियंत्रणात ठेवली नाही, तर अशा वाढलेल्या लोकसंख्येचे नियंत्रण निसर्ग स्वतः करेल आणि निसर्गाने केलेले हे नियंत्रण अत्यंत भयानक व क्रूर पद्धतीचे असेल असा विचार त्यांनी मांडला. माल्थस यांनी आपल्या सिद्धांतामध्ये केलेल्या मांडणीमध्ये लोकसंख्या वाढीचे नैसर्गिक नियंत्रण हे भयानक व निराशादायक असणार आहे (Rahman, २०१८). हे कथन केले होते. तत्कालीन तज्ज्ञ व्यक्तींनी थॉमस माल्थस यांच्या विचाराचा धिक्कार केला. थॉमस माल्थस हे जगासमोर निराशावादी वातावरण निर्माण करत आहेत, लोकांच्यामध्ये निरुत्साह निर्माण करत आहेत, अशा प्रकारचे आरोप माल्थस यांच्यावर लावण्यात आले. थॉमस माल्थस यांच्या सभा, त्यांची भाषणे यावर बहिष्कार टाकला जाऊ लागला. थोडक्यात, थॉमस माल्थस यांनी लोकसंख्या वाढीच्या दुष्परिणामाविषयी व त्याच्या नैसर्गिक नियंत्रण याविषयी जे मत मांडले होते; ते तत्कालीन परिस्थितीमध्ये जनतेसमोर, समाजासमोर एक निराशावादी चित्र निर्माण करणारे आहे, अशा प्रकारचा समज पसरविण्यात आलेला होता.

**थॉमस माल्थस यांच्या लोकसंख्याविषयक सिद्धांताची मध्यवर्ती कल्पना :**

थॉमस माल्थस यांच्या मते, लोकसंख्या ही भूमिती पद्धतीने वाढत असते तर अन्नधान्याचे उत्पादन हे गणिती पद्धतीने वाढत असते. म्हणजेच लोकसंख्या १,२,४,८,१६,३२..... या पद्धतीने वाढत असते तर अन्नधान्याचे उत्पादन १,२,३,४,५,६ ......... या पद्धतीने वाढते असते. भविष्यात लोकसंख्या जलदगतीने वाढत गेल्यास देशातील अन्नधान्याचे साठे कमी पडू लागतील, अन्नधान्याची मागणी व पुरवठा यामध्ये असमतोल निर्माण होतो; तसेच नैसर्गिक साधनसंपत्तीची कमतरता निर्माण होऊ लागते (Rahman, २०१८). अशा परिस्थितीत अनेक विविध प्रकारचे प्रश्न निर्माण होतात. (Musa Abdullahi Sakanko, Joseph David,२०१८) यांनी नायजेरियाच्या अर्थव्यवस्थेचा व तेथील लोकसंख्येचा अभ्यास करून लोकसंख्या वाढीचा विपरित परिणाम त्या देशातील अन्नधान्याच्या उपलब्धतेवर कोणत्या पद्धतीने झालेला आहे हे स्पष्ट केलेले आहे. त्यांनी माल्थसच्या सिद्धांताची वास्तविकता मान्य केली आहे. वाढलेल्या

लोकसंख्येमुळे निर्माण झालेले प्रश्न किंवा समस्या नियंत्रणात आणण्यासाठी स्वतः मानवाने आपली लोकसंख्या नियंत्रित ठेवणे अत्यंत आवश्यक असते. मात्र मानवाने स्वतःहून ही लोकसंख्या नियंत्रणात ठेवली नाही, तर मग मात्र या लोकसंख्येचे नियंत्रण निसर्ग स्वतः आपल्याकडे घेतो. परंतु जेव्हा निसर्ग स्वतः लोकसंख्या नियंत्रणाचे अस्त्र हातात घेतो तेव्हा लोकसंख्या नियंत्रणाचे मार्ग अत्यंत भयानक असतात, क्लेशदायक असतात. कारण वाढलेली लोकसंख्या नियंत्रणात आणण्यासाठी निसर्गद्वारे विविध आपत्ती, महामारी निर्माण केल्या जातात. ज्यामध्ये महापूर, भूकंप, ज्वालामुखी उद्रेक, दुष्काळ, महामारी, रोगराई यांसारख्या मार्गाने निसर्ग वाढलेल्या लोकसंख्येचे नियंत्रण करू लागतो आणि हे नियंत्रण क्लेशदायक व त्रासदायक असते (Bretschger, २०१९) म्हणून जनतेने स्वतःहून लोकसंख्या नियंत्रणात ठेवण्यासाठी प्रयत्न करण्याची गरज असते. ब्रेश्चजर यांच्या मतानुसार, जगभरातील वातावरणात होणारा बदल हादेखील वाढत्या लोकसंख्येचा प्रभाव आहे. त्याचा प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष संबंध जगातील वेगवेगळ्या नैसर्गिक घटनांशी आहे (Bretschger, २०१९) .

**वाढती लोकसंख्या गैरव्यवहार व्याभिचार व सामाजिक मूल्यामधील घसरण :**

थॉमस माल्थस यांनी हेदेखील स्पष्ट केले होते की, जर लोकसंख्या अशीच वाढत गेली आणि संसाधनांची कमतरता निर्माण होऊ लागली तर समाजात व्याभिचार, भ्रष्टाचार व गैरवर्तन वाढत जाईल. त्याचबरोबर संसाधने मिळवण्यासाठी मोठी युद्धे होतील; तसेच नैसर्गिक कोपदेखील होऊ शकेल. आज ही बाब जर आपण तपासून पाहिली, तरी याची सत्यता जगभरातील विविध देशांमध्ये आपणास पाहावयास मिळत आहे. समाजात भ्रष्टाचार वाढत आहे, व्याभिचार वाढत आहे, संस्कृती लोप पावत चाललेली आहे, गैरवर्तन वाढत आहे. मोठमोठ्या देशांमध्ये युद्ध आणि युद्धजन्य परिस्थिती निर्माण झालेली आहे. वाढत्या लोकसंख्येमुळे जगातील सर्वाधिक लोकसंख्या असणाऱ्या देशांमध्ये विविध प्रकारचे आर्थिक, सामाजिक प्रश्न निर्माण झालेले आहेत. या देशांमध्ये कमालीची आर्थिक विषमता; तसेच सामाजिक विषमतादेखील निर्माण झालेली आहे. लोकसंख्येच्यादृष्टीने हे देश जगातील सर्वात मोठे देश म्हणून पुढे आलेले असले, तरी या देशातील अंतर्गत समस्या या दिवसेंदिवस गंभीर बनत चाललेल्या आहेत.

भारतासारखा देश एकीकडे लोकसंख्येच्या जीवावर जागतिक महासत्ता बनण्याचे स्वप्न पाहत असला, तरी या देशातील आर्थिक व सामाजिक परिस्थिती ही फार वेगळी असून, ग्रामीण भागात अर्धनागरी भागात विविध प्रकारच्या सेवासुविधांची वानवा आहे. शिक्षण व आरोग्य यासारख्या मूलभूत सुविधांची खूप मोठ्या प्रमाणात कमतरता आहे. ज्या ठिकाणी या सुविधा उपलब्ध आहेत त्या उच्च उत्पन्न गटातील लोकांच्यासाठीच आहेत. मध्यम व अल्प उत्पन्न गटातील लोकांना दर्जेदार शिक्षण, दर्जेदार आरोग्य सुविधा, दर्जेदार अन्नपदार्थ यांसारख्या बाबी योग्य त्या प्रमाणात उपलब्ध नाहीत, ही वस्तुस्थिती आहे. कृषिप्रधान असलेल्या अर्थव्यवस्थेत प्रतिवर्षी भूकबळी आणि कुपोषणामुळे मृत्युमुखी पडणाऱ्यांची संख्या खूप मोठी आहे. या वस्तुस्थितीकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. भारतात थॉमस माल्थस यांनी मांडलेले सूत्र प्रत्ययास येत असल्याचे दिसून येत आहे. ज्या प्रमाणात अन्नधान्याच्या उत्पादनात वाढ होत आहे. त्यापेक्षा अधिक प्रमाणात वाढ भारतातील लोकसंख्येमध्ये होत आहे आणि त्यामुळे अन्नधान्याची मागणी व पुरवठा यामध्ये कमालीचा असमतोल निर्माण झालेला आहे,

ही वस्तुस्थिती नाकारता येऊ शकत नाही.

**लोकसंख्या वाढ व नैसर्गिक साधनसंपत्तीची उपलब्धता यामधील असमतोल :**

जगातील लोकसंख्या वाढीचा दर आणि लोकसंख्यामधील प्रत्यक्षातील वाढ या सर्व बाबींचा जर आढावा घेतला तर असे दिसून येते की, सन १९५१ मध्ये जगात सरासरी प्रतिकिलो मिटरमध्ये वास्तव्य करणाऱ्या लोकसंख्येचे प्रमाण हे १७ एवढे होते. मात्र सध्या हे प्रमाण ५२ झालेले आहे, तर दुसरीकडे जगातील साधनसंपत्ती, जमीन, पाणी, नैसर्गिक साधनसंपत्ती यामध्ये वाढ झालेली नाही. उलट उपलब्ध नैसर्गिक साधनसंपत्तीचा वारेमाप व बेफिकिरीने वापर केल्यामुळे पुनर्नवीकरण साधनसंपत्ती कमी होत चाललेली आहे. नवीकरणक्षम साधनसंपत्तीमध्ये हे फार मोठ्या प्रमाणात घट झालेली नसली, तरी या साधनसंपत्तीचे प्रचंड प्रमाणात प्रदूषण झालेले आपणास पाहावयास मिळत आहे (Azam et al, 2020). हवा व पाणी यांसारख्या पुनर्नवीकरणक्षम साधनसंपत्तीचा विचार करता त्यामध्ये तुलनात्मकदृष्ट्या खूप मोठी घट झालेली नसली, तरी पाणी, प्रदूषण व हवा प्रदूषण सातत्याने वाढत असल्याचे आपणास दिसून येत आहे. सकांको यांनी बांगलादेशात केलेल्या संशोधनावरून असे दिसून आले आहे की, लोकसंख्या वाढीमुळे देशाच्या आर्थिक प्रगतीचा दरदेखील बाधा होत असताना देशातील आर्थिक विकासाच्या प्रक्रियेत विविध प्रकारच्या बाधा निर्माण करण्याचे कार्य वाढती लोकसंख्या करीत असते. याचे सर्वात महत्त्वाचे कारण म्हणजे नैसर्गिक साधनसंपत्तीचा तुटवडा किंवा टंचाई हे असते (Sakanko, M. A., David, J., 2018).

शेतजमिनीचा वापर अन्नधान्याच्या उत्पादनासाठी न करता सिमेंटची जंगले उभा करण्यासाठी केला जात आहे. जंगलसंपत्ती तोडली जात आहे व तेथे सिमेंटची जंगले, कारखाने, उत्पादन संस्था व शहरे स्थापन केली जात आहे. म्हणजेच एकीकडे वाढत जाणारी प्रचंड लोकसंख्या व त्यांना हव्या असणाऱ्या वस्तू व सेवांची मागणी तर दुसरीकडे या वस्तू व सेवा उपलब्ध करून देण्यासाठी अस्तित्वात असणारी नवीकरणक्षम व पुनर्नवीकरणक्षम साधनसंपत्तीचा ऱ्हास व प्रदूषण अशा दुहेरी अडचणींमध्ये आपण सापडलेले आहोत. किंबहुना याचा विपरित परिणाम म्हणून जगातील सर्व देशांमध्ये सार्वजनिक यंत्रणा नैसर्गिक यंत्रणेवर प्रचंड ताण निर्माण होत आहे. परिणामी, या यंत्रणा कोलमडून पडत असतानादेखील आपण पाहात आहोत.

**विविध प्रकारच्या महामारी व मृत्यूचे तांडव**

जगातील विविध देशांबरोबरच भारतातदेखील अनेक भयानक रोग जसे की एड्स, कॅन्सर, चिकनगुनिया, स्वाइन फ्लू, इबोला इत्यादी विषाणू आणि जंतुसंसर्ग सातत्याने वाढत असल्याचे आपणास पाहावयास मिळत आहे. या सर्व बाबी पाहता आपणास एक बाब निश्चितपणे मान्य करावी लागेल ते म्हणजे निसर्गाचे नियंत्रण सुरू झालेले आहे. थॉमस माल्थस यांनी सांगितल्याप्रमाणे निसर्गाचे नियंत्रण असणार आहे. निर्दयी पद्धतीने लोकसंख्या नियंत्रणात आणण्याचा प्रयत्न निसर्गाकडून केला जाईल (Pham et al.,2020). भारतातीलच नव्हे तर जगातील लोकसंख्या नियंत्रित करण्यासाठी निसर्गाचे क्रूर नियंत्रण सुरू झालेले आहे. अशा प्रकारचे नियंत्रण सुरू करण्यापूर्वी निसर्गाने अनेक संकेत मानवी समाजास दिलेले होते; परंतु आपण त्याकडे सतत दुर्लक्ष करत गेलो. हे दुर्लक्ष करत गेल्यामुळे की काय आज आपण कोरोना महामारीसारख्या अत्यंत भयानक निराशावाद निर्माण करणाऱ्या क्रूर पद्धतीने हताश होऊन मृत्युमुखी पडणारी मानव जमात आपण आपल्या डोळ्यांदेखत पाहत आहोत. ही महामारी इतकी

भयानक आहे की, ज्यामध्ये आपले आप्त, नातेवाईक अत्यंत जवळचे लोक मृत्युमुखी पडत असताना आपण हताशपणे पाहत आहोत. किंबहुना मृत्युमुखी पडलेल्या लोकांना आपल्या प्रथेप्रमाणे किंवा परंपरेप्रमाणे अंत्यविधीदेखील करता येत नाही.

**सर्वाधिक लोकसंख्या असलेल्या देशातून जागतिक महामारीची सुरुवात :**

जगात हाहाकार माजवणाऱ्या कोरोना महामारीची सुरुवात सर्वाधिक लोकसंख्या असणाऱ्या चीनमधून होणे आणि सर्वाधिक कोरोनाबाधित रुग्ण भारतासारख्या मोठ्या लोकसंख्येच्या देशात सापडणे याला केवळ योगायोग म्हणणे कितपत योग्य ठरेल. (ZENG, Y.,२०१७) यांनी केलेल्या संशोधनानुसार, अर्थतज्ज्ञ थॉमस माल्थस यांचा सिद्धांत सध्याच्या परिस्थितीलादेखील लागू असून, त्याचे अनेक पुरावे जगभरातील विविध अर्थव्यवस्थेतील पाहावयास मिळत आहेत. या सर्व घटनांची सांगड थॉमस माल्थस यांच्या सिद्धांताची घातली असता असे निश्चितपणे दिसून येईल की, ज्या देशात लोकसंख्या मोठ्या प्रमाणात वाढलेली आहे अशा देशातील लोकसंख्या नियंत्रणात आणण्यासाठी निसर्गाने नैसर्गिक आपत्ती किंवा महामारीच्या माध्यमातून लोकसंख्येचे नियंत्रण करण्याची सुरुवात केलेली आहे असे दिसून येते. याला अनेक जागतिक पुरावे उपलब्ध आहेत.

भारताचाच जर आपण विचार केला तर आपणास असे दिसून येईल की, १९५५ मध्ये लोकसंख्येची घनता १३८ एवढी होती १९८० मध्ये ती २३४ इतकी झाली. २०१८ मध्ये ती ४५५ पर्यंत पोहोचली. शहरी लोकसंख्येचे प्रमाण याच कालावधीत १७.६ टक्केवरून ३२.५ टक्क्यांवर पोहोचले आहे. हे आकडे वाढत्या लोकसंख्येचे प्रतीक आहेत. वाढत्या लोकसंख्येमुळे शहरातच नव्हे; तर ग्रामीण भागांमध्येदेखील विविध प्रकारच्या समस्या निर्माण होत आहेत. निसर्गाचे नियंत्रण सुरू झालेले आहे. याचे अनेक पुरावे इतिहासात आणि वर्तमानात पाहावयास मिळतात. सन १९३१ मध्ये चीनमधील पुरामध्ये दहा लाख लोक, १९७० मध्ये पूर्वीच्या बांगलादेशमध्ये भोला वादळात पाच लाख लोक, १९२० आणि १९७६ या वर्षात चीनमधील भूकंपात सुमारे १८ लाख लोक, २००४ मध्ये इंडोनेशियातील भूकंपात तीन लाख लोक, भारतात १८९६ ते १९०२ पर्यंतच्या दुष्काळात ६० लाख लोक, सन १९४२ मधील चीनच्या दुष्काळात २० लाख लोक भूकबळी बळीने मृत्युमुखी पडले, २०१० मध्ये रशियात उष्माघाताने ५६ हजार लोक, २००३ मध्ये युरोपमध्ये ७० हजार लोक, २००८ मध्ये म्यानमारमधील वादळात दोन लाख लोक मृत्युमुखी पडले. भारताच्याच बाबतीत सांगायचे झाले तर २००४ मधील सुनामीमध्ये दोन लाख लोकांचा मृत्यू झाला, २००१ मधील गुजरातमधील भूकंपात वीस हजार लोक मृत्युमुखी पडले तर लाखो लोक अपंग झाले. २००४मध्ये अंदमान सुमाग बेटावरील भूकंपात दोन लाख लोक मृत्युमुखी पडले, १९४३ मधील बंगालच्या दुष्काळात ४० हजार लोक, १९९३ मधील लातूरच्या भूकंपात वीस हजारपेक्षा अधिक लोक मृत्युमुखी पडले. १९९९ च्या ओरिसामधील दुष्काळात दहा हजार लोक, २०१३ मधील उत्तराखंडमधील पूर व भूस्खलनमध्ये ५००० लोक अशी कित्येक उदाहरणे देता येतील.

**कोरोनाबाधित व कोरोनामुळे मृत्युमुखी पडलेली लोकसंख्या :**

प्रस्तुत कोष्टक क्र. १ द्वारे जगातील सर्वाधिक लोकसंख्या असणाऱ्या देशांमध्ये कोरोनाबाधितांची संख्या व कोरोनामुळे मृत्युमुखी पडलेल्या जनतेची संख्या दिलेली आहे. या संख्येवरून आपणास कोरोना

**कोष्टक क्र. १ : कोरोनाबाधित व कोरोनामुळे मृत्युमुखी पडलेली लोकसंख्या (मे - २०२१ पर्यंत)**

| अ.क्र. | देश | बाधित जनता | एकूण मृत्यू | एकूण लोकसंख्या |
|---|---|---|---|---|
| १ | चीन | ९१,१४६ | ४,६३६ | १,४३९,३२३,७७६ |
| २ | भारत | २८,४४०,९८८ | ३३८,०१३ | १,३९२,४९४,१२८ |
| ३ | अमेरिका | ३४,१५६,९३१ | ६११,०३७ | ३३२,७९१,४२३ |
| ४ | इंडोनेशिया | १,८३१,७७३ | ५०,९०८ | २७६,१८५,५९० |
| ५ | पाकिस्तान | ९२४,६६७ | २०,९३० | २२४,८२९,०७८ |
| ६ | ब्राझील | १६,७२०,०८१ | ४६७,७०६ | २१३,९५१,४१४ |
| ७ | नायजेरिया | १६६,५६० | २,०९९ | २१०,८२०,८२३ |
| ८ | बांगलादेश | ८०४,२९३ | १२,६९४ | १६६,१९९,७३२ |
| ९ | रशिया | ५,०९०,२४९ | १२२,२६७ | १४५,९९२,२११ |
| १० | मेक्सिको | २,४२०,६५९ | २२७,८४० | १३०,१७९,५०९ |
| ११ | जपान | ७४९,१५५ | १३,१४० | १२६,११८,८४४ |
| १२ | इथोपिया | २७२,०३६ | ४,१७८ | ११७,५७२,७३६ |
| १३ | फिलिपिन्स | १,२४०,६८२ | २१,१५८ | ११०,९२२,३१६ |
| १४ | इजिप्त | २६४,५५७ | १५,१७८ | १०४,१०६,२६२ |
| १५ | व्हिएतनाम | ७,८१३ | ४९ | ९८,१४५,००५ |
| १६ | संपूर्ण जग | १७२,४१८,७१८ | ३,७०६,११६ | ७,७९४,७९८,७३९ |

संदर्भ : https://www.worldometers.info/coronavirus/ May - 2021.

जागतिक महामारीची तीव्रता व त्यामधील भयानकता लक्षात येऊ शकते. सदरची आकडेवारी मे २०२१ पर्यंतची आहे.

**सारांश :**

निसर्ग खूप प्रेमळ आहे. निसर्गाने मानवी जमातीस खूप गोष्टी भरभरून दिलेल्या आहेत. निसर्गाने साधनसंपत्ती दिलेली आहे, अधिवास दिलेला आहे, जगण्यासाठी सुंदर वातावरण दिलेला आहे; मात्र असे असतानादेखील आपण निसर्गाची हेळसांड करत गेलो आणि त्याचाच परिणाम म्हणून की काय निसर्ग कोपला आहे. खरंच निसर्ग एवढा क्रूर झाला आहे का? तो इतका क्रूर का झाला? यावर ते आपण सर्वांनी गांभीर्याने विचार करण्याची गरज आहे. अशा प्रकारचे दूर नियंत्रण सुरू करण्यात पूर्वी निसर्ग नेहमीच वेगवेगळ्या संधी देत असतो, वेगवेगळे संकेत देत असतो; परंतु आपण या संख्येत आकडे दुर्लक्ष करत असत असतो. आता तरी सावध होऊ या निसर्गाचे संकेत समजून घेऊ या. या पृथ्वीचे आणि संपूर्ण मानवजातीचे संवर्धन करण्यासाठी लोकसंख्या नियंत्रणात ठेवण्याचे विशेष प्रयत्न करूया. नैसर्गिक साधनसंपत्तीचे संवर्धन करूया, निसर्गाने निर्माण केलेल्या व्यवस्था मूळस्थितीत ठेवूया, त्यामध्ये मानवी हितासाठी अनपेक्षित बदल न करता त्या गोष्टी निसर्गानेच अशा निर्माण केलेले आहेत त्याच पद्धतीने

ठेवू या व त्याचे संवर्धन करू या म्हणजे मानवी जीवन अधिक सुखकर होण्यासाठी मदत होईल.

**संदर्भसूची :**


1. Azam, M., Khan, H.N. and Khan, F. (2020), Testing Malthusian's and Kremer's population theories in developing economy, International Journal of Social Economics, Vol. 47 No. 4, pp. 523-538. https://doi.org/10.1108/IJSE-08-2019-0496.
2. Bretschger, L. (2019). Malthus in the light of climate change. CER-ETH-Center of Economic Research at ETH Zurich Working Paper, 19, 320.
3. Chowdhury, M. N. M., Hossain, M. (2018). Population growth and economic development in Bangladesh: Revisited Malthus. arXiv preprint arXiv:1812.09393.
4. Musa Abdullahi Sakanko, Joseph David (2018). An Econometric Validation of Malthusian Theory: Evidence in Nigeria. Signifikan: Jurnal Ilmu Ekonomi, 7(1), 77-90.
5. Oladimeji, Y. U. (2017). Food production trend in Nigeria and Malthus theory of population: empirical evidence from rice production. Nigerian Journal of Agriculture, Food and Environment, 13(1), 126-132.
6. Pham, N. M., Huynh, T. L. D., Nasir, M. A. (2020). Environmental consequences of population, affluence and technological progress for European countries: - Malthusian view. Journal of environmental management, 260, 110143.
7. Rahman, M. (2018). Validity of Malthusian Theory of Population in 20th Century in Terms of Using Scientific Technology to the Economic Growth and Strength. International Journal of Tax Economics and Management, 1(1), 13-21.
8. Sylwia Kuzma-Markowska (2020) Marx or Malthus? Population debates and the reproductive politics of state-socialist Poland in the 1950s and 1960s, The History of the Family, 25:4, 576-598, DOI: 10.1080/1081602X.2019.1702889
9. ZENG, Y. (2017). Malthus' population theory is still wrong. Chinese Science Bulletin, 62(21), 2335-2345.


◆

**निवेदन : अर्थसंवाद**

मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या ज्या आजीव सदस्यांना अंक मिळत नसेल किंवा पत्त्यात बदल झाला असेल तर त्यांनी प्रमुख संपादक, अर्थसंवाद यांच्याकडे तशा आशयाचे पत्र पाठवून त्या पत्रात आपला नवीन पत्ता लिहून पाठवावा; मात्र या पत्रात आजीव सदस्य क्रमांकाचा उल्लेख असणे अत्यंत गरजेचे आहे.

**- प्रमुख संपादक, अर्थसंवाद**

# भारतातील सोन्याच्या किमतीतील बदलाची आणि सोन्यातील गुंतवणुकीच्या विविध गुंतवणूक साधनातील गुंतवणूक प्रवृत्तीचा अभ्यास

**हरी पंढरी वंगरवार** †

**गोषवारा :**

प्रत्येक व्यक्ती आपल्या उत्पन्नाचा काही भाग भविष्यातील अनिश्चिततेचा सामना करण्यासाठी बचत करतो. या बचतीच्या माध्यमातून उत्पन्न मिळविण्याच्या उद्देशाने त्याची गुंतवणूक वित्तीय बाजारात करतात. वित्तीय बाजारात गुंतवणुकीची विविध साधने उपलब्ध आहेत. सोने हे भारतातील लोकांचे मुख्य गुंतवणुकीचे साधन आहे. जागतिक सोने परिषद २०१७ नुसार, भारतातील घरगुती सोन्यातील साठा २४००० टन असून त्याचे मूल्य ८०० बिलियन डॉलर इतके आहे. यातील मोठा भाग दागिने स्वरूपात असण्याची शक्यता आहे. अलीकडील काळात सोन्यातील गुंतवणुकीची नवीन साधने भारतीय बाजारपेठेत उपलब्ध आहेत. त्यात गोल्ड इटीएफ, गोल्ड सर्टिफिकेट, गोल्ड म्युच्युअल फंड, सोने वस्तू बाजार, सॉव्हरिन गोल्ड बॉण्ड ही साधने आहेत. ही साधने सुरक्षित आणि गुंतवणूक परतावा याबाबतील सोन्याच्या दागिन्यांच्या तुलनेत अधिक सोयिस्कर ठरतात.

प्रस्तुत शोधनिबंधाचा उद्देश भारतातील सोने-चांदीच्या किमतीत झालेला बदल आणि सोन्यातील गुंतवणूक लाभाची शेअर बाजारातील गुंतवणूक लाभाशी तुलना करणे आहे. त्याचप्रमाणे, सोने गुंतवणुकीच्या विविध साधनात गुंतवणूक करण्याची लोकांची प्रवृत्ती अभ्यासणे हा देखील प्रस्तुत शोधनिबंधाचा उद्देश आहे. सोने, चांदीच्या किमतीतील १९७९ पासून झालेला बदल आणि सोन्यापासून मिळणाऱ्या लाभाशी शेअर बाजारातील लाभाशी तुलना केली असता, शेअर बाजारातील गुंतवणूक अधिक फायदेशीर असल्याचे दिसते. तसेच सध्याच्या काळात सोने गुंतवणुकीच्या नवीन साधनात लोक गुंतवणूक करण्यास प्राधान्य देताना आढळून आले. एकूण गुंतवणूकदारांपैकी ३९ (३२ टक्के) लोक अभौतिक सोन्यात म्हणजेच गोल्ड इटीएफ, गोल्ड सर्टिफिकेट, गोल्ड म्युच्युअल फंड, सोने वस्तू बाजार, सॉव्हरिन गोल्ड बॉण्ड या प्रकारात गुंतवणूक करताना आढळून आले.

**प्रस्तावना :**

भारतीय संस्कृती ही जगातील पुरातन संस्कृतीपैकी एक मानली जाते. सोने या धातूशी भारतीय लोकांचा दीर्घ आणि घनिष्ठ संबंध आहे. रामायण, महाभारत

† सहयोगी प्राध्यापक, अर्थशास्त्र विभाग, बी.वाय.के. (सिन्नर) कॉलेज ऑफ कॉमर्स, नाशिक-५.
आजीव सभासद क्र.:१४८९, भ्रमणध्वनी:९४०४७८१८६५, ई-मेल:bykhariwangarwar@gmail.com

या भारतीय धर्मग्रंथातून सोने या धातूचा वापर आणि त्याच्या लोकप्रियतेची कल्पना येते. प्राचीन काळात भारतात सोने या धातूचा एक मौल्यवान संपत्ती, शुद्धता, सौभाग्याचे व समृद्धीचे प्रतीक आणि सुलभ विनिमयाचे साधन म्हणून वापर केला जात होता. जगात आजही भारत सोन्याचा सर्वात मोठा ग्राहक आणि आयात करणारा देश म्हणून ओळखला जातो. जागतिक सोने परिषद २०१७ नुसार, भारतातील घरगुती सोन्यातील साठा २४००० टन असून, त्याचे मूल्य ८०० बिलियन डॉलर इतके आहे (MCX year Book, 2020).

सोने हे भारतीय लोकांचे परंपरागत बचतीचे आणि गुंतवणुकीचे साधन आहे. भारतात आर्थिक संकटाच्या काळात सोन्याला सुरक्षित आश्रयस्थान मानले जाते. शेअर बाजार, म्युच्युअल फंड, मुदत ठेवी, सरकारी रोखे यांसारखी गुंतवणुकीची साधने उपलब्ध असतानासुद्धा लोक अद्याप सोन्यामध्ये गुंतवणूक करण्यास प्राधान्य देतात. त्यामुळे सोन्याच्या किमतीतील बदल, सोन्यातील गुंतवणुकीच्या विविध गुंतवणूक साधनातील गुंतवणूक प्रवृत्ती, सोन्यातील गुंतवणुकीपासून मिळणारा लाभ, किमतीतील अनिश्चितता आणि सोन्यातील गुंतवणुकीपासून मिळणाऱ्या लाभाची चांदी व शेअर बाजारातून मिळणाऱ्या लाभाशी तुलना करण्याचा प्रयत्न या संशोधनपर शोधनिबंधात करण्यात आला आहे.

**साहित्याचा आढावा :**

मिश्रा रवी आणि जी. जगन मोहन (२०१२), भारतात सोन्याच्या किमतीत २००३ पासून मोठ्या प्रमाणात वाढ झालेली असली तरी सुरक्षित बचत, सोन्याचे भारतीय समाजातील सामाजिक आणि सांस्कृतिक महत्त्व या कारणामुळे मागणी कायम आहे. या काळात सोन्याच्या किमतीत चढउतार होण्यासाठी यूएस डॉलर विनिमय दर, शेअरच्या किमतीतील बदल आणि सोन्याच्या देशी आणि आंतरराष्ट्रीय किमतीतील बदल यातील वाढता सहसंबंध हे घटक कारणीभूत आहेत.

निषाद नवाझ आणि सुधीन्द्र व्ही. (२०१३), अजूनही बरेच गुंतवणूकदार दागदागिने, सोन्याची नाणी आणि सोन्याचे बुलियन बार हे गुंतवणुकीचे प्रकार पसंत करतात. परंतु गोल्ड इटीएफ आणि फ्युचर्स या साधनामध्येसुद्धा लोकांनी गुंतवणूक केली असून, नफा प्राप्ती आणि गुंतवणुकीचे सुलभ स्वरूप हे दोन घटक त्यास कारणीभूत आहेत.

पटेल जी. आणि चांदवडकर ए. (२००६), भारतात सोन्याची मागणी लवचिकता ६ ते ८ आहे. जर भारतात घाऊक वस्तू बाजारातील किमती स्थिर असताना, सोन्यातील किमतीत १६ टक्के वाढ झाली तर सोन्याची मागणी पूर्णतः थांबलेली असेल.

ए. वैद्यनाथन (१९९९), भारतातील सोन्याची आयात ही १८३१ पासून सतत वाढत असून, स्वातंत्र्यप्राप्तीनंतर सोन्याच्या आयातीवरील निर्बंधात वाढ झाल्यामुळे त्यात आणखी जलद वाढ झाली. सुरुवातीस भारतातील सोन्याची आयात ही शेअरच्या किमती आणि आंतरराष्ट्रीय सोन्याचे भाव यापेक्षा देशांतर्गत सोन्याची किंमत यावर अधिक प्रमाणात निर्धारित होत होती. परंतु १९९२ नंतरच्या काळात शेअरच्या किमती आणि चलन विनिमय दर हे सोन्याची आयात निर्धारित करणारे महत्त्वाचे घटक म्हणून उदयास आले.

**संशोधनाची उद्दिष्टये :**

१. भारतातील सोने व चांदी या मौल्यवान धातूच्या किमतीतील बदलाची प्रवृत्ती अभ्यासणे.

२. शेअर बाजार, सोने, चांदी यापैकी कोणत्या साधनात गुंतवणूक करणे अधिक फायदेशीर असेल ते शोधणे.

३. सोन्यातील गुंतवणुकीच्या विविध गुंतवणूक साधनांचा अभ्यास करणे.

४. सोन्यातील गुंतवणुकीच्या विविध गुंतवणूक प्रकारातील गुंतवणूकदाराच्या प्रवृत्तीचा अभ्यास करणे.

**संशोधन पद्धती :**

प्रस्तुत शोधनिबंध हा प्राथमिक आणि दुय्यम साधनसामुग्रीवर आधारित आहे. प्राथमिक माहिती संकलनासाठी महाराष्ट्रातील नाशिक, नांदेड, अमरावती, ठाणे या चार जिल्ह्यांतील १२० नमुने लॉटरी पद्धतीचा वापर करून निवडण्यात आले. यापैकी ६० नमुने नोकरी करणारे तर ६० नमुने व्यवसाय करणारे निवडले आहेत. निवडलेल्या लोकांकडून माहिती गोळा करण्यासाठी प्रश्नावली तयार करण्यात आली आणि गुगल फॉर्म या इलेक्ट्रॉनिक साधनांच्या मदतीने आवश्यक ती माहिती मिळवण्यात आली.

त्याचप्रमाणे हा शोधनिबंध पूर्ण करण्यासाठी संदर्भग्रंथ, मासिके, वर्तमानपत्रे, विविध संस्थांचे अहवाल, संशोधन लेख आणि इलेक्ट्रॉनिक संसाधने इ. साधनांचा आधार घेण्यात आलेला आहे.

गोळा केलेल्या माहितीचे विश्लेषन करण्यासाठी टक्केवारी, सरासरी आणि चक्रवाढ वार्षिक वृद्धिदर या सांख्यिकीय साधनांचा वापर करण्यात आला.


**शेअर बाजार, सोने, चांदीच्या किमतीतील बदल (१९७९-८० ते २०२०-२१) :**

भारतात स्थावर मालमत्ता, सोने, चांदी मुदत ठेवी, जीवन विमा, भविष्य निर्वाह निधी, शेअर बाजार, रोखे, म्युच्युअल फंड इ. गुंतवणुकीची साधने सहज उपलब्ध आहेत. असे असले तरी लोकांचा परंपरागत गुंतवणुकीकडे असलेला कल अजूनही कमी झालेला नाही. देशातील बहुतांश लोक जमीन, घर, सोने, चांदी, मुदत ठेवी यांसारख्या परंपरागत प्रकारात गुंतवणूक करतात. अजूनही भारतात सोने आणि चांदी ही सर्वाधिक तरल, सुरक्षित आणि महत्तम परतावा देणारी गुंतवणूक म्हणून लोकप्रिय आहे. भारतात १९७९-८०ते २०२०-२१ या कालावधीत सोने, चांदी आणि मुंबई शेअर बाजारातील संवेदनशील निर्देशांकात झालेला बदल खालील तक्त्यात दर्शविला आहे. माहितीच्या सुलभीकरणासाठी हा कालावधी १९७९-८० ते १९८९-९० आणि १९९०-९१ ते २०२०-२१ अशा दोन टप्प्यांत विभागण्यात आला आहे.

आलेख १ वरून असे दिसून येते की, दीर्घकाळासाठी सोने, चांदी आणि शेअर बाजारातील गुंतवणूक ही फायदेशीर आहे. १९७९-८९ या दहा वर्षांच्या काळात मुंबई शेअर बाजार संवेदनशील निर्देशांक (BSE SENSEX) हा १०० वरून ७१४ झाला आहे. याचाच अर्थ शेअर बाजारात १९७९ या वर्षी १०० रुपये गुंतवणूक केली असता १९८९ साली ७१४ रुपये एवढी रक्कम मिळाली. त्या तुलनेत सोने आणि चांदी या पारंपारिक प्रकारातील गुंतवणुकीमधून मिळणारा लाभ हा कमी आहे. सोन्यात १९७९ वर्षी १०० गुंतवणूक केली असता १९८९ साली २७९ रु. आणि चांदीत १०० रुपये गुंतवणूक केली असता २९७ रुपये एवढी रक्कम मिळाली. थोडक्यात दीर्घकाळासाठी सोने, चांदी आणि शेअर बाजारातील गुंतवणूक ही लाभदायक असून शेअर बाजारातील गुंतवणूक ही तुलनेने अधिक लाभदायक असल्याचे वरील विश्लेषणावरून दिसून येते (पाहा आलेख १).

तक्ता १ मध्ये १९७९-८० ते ३० जानेवारी २०२१ या कालावधीत सोने, चांदीच्या किमतीत आणि मुंबई शेअर बाजार निर्देशांकात झालेला बदल दर्शविला आहे. या कालावधीत सोन्याच्या किमतीत ४२ पट, चांदीच्या किमतीत ३० पट आणि मुंबई शेअर बाजार निर्देशांकात ४६२ पट वाढ झाल्याचे तक्ता १ वरून सिद्ध होते. याच कालावधीतील सोने आणि चांदीच्या

**आलेख १ : सोने व चांदी किंमत निर्देशांक आणि मुंबई शेअर बाजारातील निर्देशांकात झालेला बदल १९७९-८० ते १९८९-९०**




संदर्भ: तक्ता १

किमतीतील चक्रवाढ वार्षिक वृद्धिदराची गणना केली असता असे दिसून येते की, सोन्याच्या आणि चांदीच्या किमतीतील चक्रवाढ वार्षिक वृद्धिदर अनुक्रमे ९.६% आणि ८.७% आहे. तसेच मुंबई शेअर बाजारनिर्देशांकाचा चक्रवाढ वार्षिक वृद्धिदर १६.१% एवढा होता. थोडक्यात, चांदीच्या तुलनेत सोन्याच्या किमतीत मागील चाळीस वर्षात अधिक वाढ झालेली आहे. परंतु मुंबई शेअर बाजार निर्देशांकात मात्र त्या तुलनेत खूप मोठी वाढ झालेली आहे.

आलेख २ हा १९९१ च्या सोने, चांदीच्या किमती, मुंबई शेअर बाजार १०० गृहीत धरून निर्देशांक काढला आहे. १९९१-२०२१ या तीस वर्षांच्या काळात मुंबई शेअर बाजार संवेदनशील निर्देशांक (BSE SENSEX) हा १०० वरून ५९२६ झाला आहे. याचाच अर्थ शेअर बाजारात १९९१ या वर्षी १०० रुपये गुंतवणूक केली असता २०२१ साली ५९२६ रुपये एवढी रक्कम मिळाली. त्या तुलनेत सोने आणि चांदी या पारंपारिक प्रकारातील गुंतवणुकीमधून मिळणारा लाभ हा कमी आहे. सोन्यात १९९१ वर्षी १०० रुपये गुंतवणूक केली असता २०२१ साली आणि १४१८ रु. आणि चांदीत १०० रुपये गुंतवणूक केली असता ३०४२रु.एवढी रक्कम मिळाली. थोडक्यात, दीर्घकाळासाठी सोने, चांदी आणि शेअर बाजारातील गुंतवणूक ही लाभदायक असून शेअर बाजारातील गुंतवणूक ही तुलनेने अधिक लाभदायक असल्याचे वरील विश्लेषणावरून दिसून येते (पाहा

**तक्ता १: सोने, चांदी किमतीतील आणि मुंबई शेअर बाजारातील निर्देशांकात झालेला बदल १९७९-८० ते २०२०-२१.**

| आर्थिक वर्ष | सोन्याची किंमत (रु.) / प्रति १० ग्रॅम | चांदीची किंमत (रु.) / प्रति किलो | मुंबइ शेअर बाजार निर्देशांक (BSE SENSEX) | आर्थिक वर्ष | सोन्याची किंमत (रु.) / प्रति १० ग्रॅम | चांदीची किंमत (रु.) / प्रतिकिलो | मुंबई शेअर बाजार निर्देशांक (BSE SENSEX) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १९७९-८० | ११५९ | २३०१ | १०० | २०००-०१ | ४४७४ | ७८६८ | ५,००१ |
| १९८०-८१ | १५२२ | २६१८ | १२९ | २००१-०२ | ४५७९ | ७४४७ | ३,६०४ |
| १९८१-८२ | १७११ | २६३६ | १७३ | २००२-०३ | ५३३२ | ७९९१ | ३,४६९ |
| १९८२-८३ | १७२३ | २७१८ | २१८ | २००३-०४ | ५७१९ | ८७२२ | ३,०४९ |
| १९८३-८४ | १८५८ | ३५०६ | २१२ | २००४-०५ | ६१४५ | १०६८१ | ५,५९१ |
| १९८४-८५ | १९८४ | ३५१४ | २४५ | २००५-०६ | ६९०१ | ११८२९ | ६,४९३ |
| १९८५-८६ | २१२५ | ३११८ | ३५४ | २००६-०७ | ९२४० | १९०५७ | ११,२८० |
| १९८६-८७ | २३२३ | ४२४७ | ५७४ | २००७-०८ | ९९९६ | १९४२७ | १३,०७३ |
| १९८७-८८ | ३०८२ | ५५३९ | ५१० | २००८-०९ | १२८९० | २१२४८ | १५,६४४ |
| १९८८-८९ | ३१७५ | ६३६७ | ३९८ | २००९-१० | १५७५६ | २५३२१ | ९,७०९ |
| १९८९-९० | ३२२९ | ६८४२ | ७१४ | २०१०-११ | १९२२७ | ३७२९० | १७,५२८ |
| १९९०-९१ | ३४५२ | ६७६१ | ७८१ | २०११-१२ | २५७२४ | ५७३१६ | १९,४४५ |
| १९९१-९२ | ४२९८ | ७३३२ | १,१६८ | २०१२-१३ | ३०१६४ | ५७६०२ | १७,४०४ |
| १९९२-९३ | ४१०४ | ७०७८ | ४,२८५ | २०१३-१४ | २९१९० | ४६६३७ | १८,८६४ |
| १९९३-९४ | ४५३२ | ६३४८ | २,२८१ | २०१४-१५ | २७४१५ | ४०५५८ | २२,४४६ |
| १९९४-९५ | ४६६७ | ६६९२ | ३,७७९ | २०१५-१६ | २६५३४ | ३६३१८ | २८,२६० |
| १९९५-९६ | ४९५८ | ७२२१ | ३,२६१ | २०१६-१७ | २९६६५ | ४२७४८ | २५,२६९ |
| १९९६-९७ | ५०७१ | ७१६५ | ३,३६७ | २०१७-१८ | २९३०० | ३९०७१ | २९,९१० |
| १९९७-९८ | ४३४७ | ७३५२ | ३,३६१ | २०१८-१९ | ३११९३ | ३८४०४ | ३३,२५५ |
| १९९८-९९ | ४२६८ | ७८५५ | ३,८९३ | २०१९-२० | ३७०१८ | ४२५१४ | ३८,८७१ |
| १९९९-०० | ४३९४ | ८०६७ | ३,७४० | ३०जाने.२०२१ | ४८९५० | ७०००० | ४६,२८५ |


संदर्भ: www.rbi.org.in, http://bse2nse.com

आलेख २). त्यामुळे गुंतवणूक म्हणून सोने आणि चांदीऐवजी शेअर बाजारातील गुंतवणूक दीर्घकाळासाठी अधिक फायदेशीर ठरेल, असे स्पष्टपणे दिसून येते.

**सोन्यातील गुंतवणुकीची साधने**

अलीकडील काळात सोन्याच्या सुरक्षित साठवणुकीचा प्रश्न ज्वलंत बनत चालला आहे. महिलांवरील सोने चोरीसाठी हल्ले, दरोडेखोरी यासारखे प्रकार मोठ्या प्रमाणात वाढत चालले आहेत. त्यामुळे घरात सोन्याचे दागिने किंवा सोन्याची नाणी, सोन्याची बिस्किटे साठवून ठेवणे अधिक धोक्याचे झाले आहे. परंतु सोन्यातील गुंतवणुकीचा केवळ लाभ घेण्याच्या दृष्टीने भारतीय बाजारात सोन्यातील गुंतवणुकीचे अनेक पर्याय उपलब्ध आहेत. त्यातील मुख्य साधने

**आलेख २ : सोने व चांदी किंमत निर्देशांक आणि मुंबई शेअर बाजारातील निर्देशांकात झालेला बदल१९९०-९१ते २०२०-२१**




संदर्भ: www.rbi.org.in, http://bse2nse.com

पुढीलप्रमाणे-

१. गोल्ड इटीएफ : इटीएफ किंवा एक्सचेंज ट्रेडेड फंड ही गुंतवणूक मुख्यत: राष्ट्रीय शेअर बाजारात केली जाते. हे फंड समभागांप्रमाणेच कार्य करतात आणि त्या समभाग, वस्तू किंवा बाँड्स म्हणून मालमत्ता ठेवतात. गोल्ड इटीएफ किंवा गोल्ड एक्सचेंज ट्रेडेड फंड हीदेखील शेअर बाजारातील लोकप्रिय गुंतवणूक प्रकार आहे. सध्या भारतातील गोल्ड इटीएफ व्यक्ती तसेच संस्थात्मक गुंतवणूकदारांकडून गुंतवणुकीसाठी उपलब्ध आहेत. एक गोल्ड इटीएफ १ ग्रॅम उच्च शुद्धतेच्या (९९% शुद्धता) सोन्याच्या बरोबरीचे असते आणि हेगोल्ड इटीएफ प्रत्यक्ष सोन्याच्या साठ्याने समर्थित असतात. सध्या १३ गोल्ड एक्सचेंज ट्रेडेड फंड उपलब्ध आहेत. गोल्ड इटीएफ कागद किंवा डिमॅट प्रकारात खरेदी करता येतात.

२. सॉव्हरिन गोल्ड बॉण्ड योजना (SGB) : गोल्ड मुद्रीकरण योजनेंतर्गत 'सार्वभौम सोन्याचे बंधपत्र' ही योजना २०१५ साली भारत सरकारने सुरू केली आहे. रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाकडून भारत सरकारच्यावतीने हे बॉण्ड वितरित केले जातात. अधिकृत सेबी ब्रोकर्सकडून हे बॉण्ड्स खरेदी करता येऊ शकतात. या बॉण्ड्सवर सरकार वार्षिक २.५% व्याज देते आणि सोन्याच्या किमतीतील बदलाशी गुंतवणुकीवर लाभ मिळतो. या बॉण्ड्सचा कालावधी ८ वर्षांचा असतो, परंतु गुंतवणूकदार ५ वर्षानंतर या योजनेतून बाहेर पडू शकतात. या बॉण्डमध्ये कमीत कमी एक ग्रॅम सोन्याची गुंतवणूक करता येते आणि सामान्य माणसासाठी कमाल गुंतवणुकीची मर्यादा किलो इतकी आहे. प्रत्यक्ष सोने ठेवण्यासाठी एसजीबी हा एक उत्तम पर्याय आहे. यात चोरी होण्याचा धोका असत नाही. तसेच हे बंधपत्र डिमॅट प्रकारात सुद्धा

रूपांतरित करता येतात.

३. गोल्ड म्युच्युअल फंड : प्रत्यक्षात भौतिक सोने खरेदी करण्याऐवजी गोल्ड म्युच्युअल फंडामध्ये गुंतवणूक करणे सुरक्षिततेच्या दृष्टीने फायद्याचे आहे. भारतात बँका आणि वित्तीय संस्थांनी गोल्ड म्युच्युअल फंड योजना बाजारात आणल्या आहेत.

४. वस्तू बाजार: Multi Commodity Exchange of India Limited (MCX) ही भारतातील पहिली वस्तू डेरीवेटीव्ह सूचीबद्ध विनिमय संस्था आहे. ही संस्था २००३ साली सुरू झाली असून, वस्तू डेरीवेटीव्हचे ऑनलाईन व्यवहार नियमन करण्याचे काम करते. वस्तू बाजारात सोने, चांदी, क्रूड ऑइल, नैसर्गिक वायू, मूलभूत धातू आणि कृषी उत्पादनाचा ऑनलाईन व्यापार होतो.

**सोने गुंतवणुकीच्या विविध प्रकारातील उत्तरदात्याची गुंतवणूक प्रवृत्ती :**

गुंतवणूक ही सामान्यतः भविष्यकालीन गरजा, उत्पन्न वाढ, भौतिक चलन साठवणुकीतील असुरक्षितता या कारणासाठी केली जाते. महाराष्ट्रातील लोकांच्या गुंतवणूक प्रवृत्तीचे प्राथमिक माहितीच्या आधारे विश्लेषन केले असता पुढील निष्कष प्राप्त झाले.

१) उत्तरदात्याचा वयोगट : १२० उत्तरदात्यांपैकी सर्वाधिक ४२% उत्तरदाते ३६वर्षे ते ६०वर्षे या वयोगटातील आहेत, त्याखालोखाल २६% उत्तरदाते २५वर्षे ते ३५वर्षे आणि २५% उत्तरदाते ६०पेक्षा अधिक वयाचे आहेत.

२) उत्तरदात्याचा व्यवसाय : एकूण उत्तरात्यांपैकी सर्वाधिक ६० (५०%) नोकरी करणारे, २५ (२१%) शेतकरी, २१ (१७.५%) व्यापारी, १२ (१०%) घरकाम करणाऱ्या बायका आहेत.

३) उत्तरदात्याचे वार्षिक उत्पन्न : एकूण उत्तरदात्यांपैकी सर्वाधिक ४४ (३६.७%) उत्तरदात्याचे वार्षिक उत्पन्न १-५ लाख या गटात मोडणारे आहे. त्याखालोखाल ४२ (३५%) ५-१० लाख रुपये उत्पन्न गटात मोडतात. १० लाखांपेक्षा अधिक उत्पन्न असणारे २४ (२०%) आणि एक लाखापेक्षा कमी उत्पन्न असणारे १० (८.३%) उत्तरदाते आहेत.

४) सोने गुंतवणुकीच्या विविध प्रकारातील गुंतवणुकीचे विश्लेषण : उत्तरदाते गुंतवणूकदार सोन्यातील विविध प्रकारच्या साधनात गुंतवणूक करताना दिसून आले. प्रथमतः त्यांना सोन्यातील गुंतवणुकीचे आपणास माहीत असलेले विविध प्रकार कोणते असा प्रश्न विचारून त्यांना सोन्याचे दागिने, सोन्याची नाणी, सोन्याची बिस्किटे, गोल्ड इटीएफ, गोल्ड सर्टिफिकेट, सॉव्हरिन गोल्ड बॉण्ड, गोल्ड म्युच्युअल फंड, वस्तू (शेअर) बाजारातील सोन्यातील गुंतवणूक हे पर्याय निवडीसाठी देण्यात आले होते. उत्तरदात्यांपैकी १००% उत्तरदात्यांना सोन्याचे दागिने, सोन्याची नाणी, सोन्याची बिस्किटे बाजारात विक्रीसाठी उपलब्ध असतात याचे ज्ञान होते असे आढळून आले. गोल्ड इटीएफ संदर्भात माहिती असलेले केवळ २२ (२२%), सॉव्हरिन गोल्ड बॉण्ड २९ (३०%), गोल्ड सर्टिफिकेट ४६ (४७%), गोल्ड म्युच्युअल फंड ४७ (४८%) आणि वस्तू (शेअर) बाजारातील सोन्यातील गुंतवणूक ६१ (६२%) उत्तरदाते आढळून आले.

सोने गुंतवणुकीच्या विविध प्रकारात गुंतवणूक करणाऱ्या उत्तरादात्यांची संख्या खालील तक्ता २ मध्ये दिलेली आहे. तक्ता २ वरून असे दिसून येते की, सोन्याचे दागिने, सोन्याची नाणी आणि सोन्याची बिस्किटे याव्यतिरिक्त इतर सोन्यातील गुंतवणुकीच्या प्रकारात गुंतवणूक करणाऱ्याचे प्रमाण नगण्य आहे. एकूण १२० उत्तरदात्यांपैकी १०८ (९०%) सोन्याचे दागिने या प्रकारात गुंतवणूक करताना आढळून आले

आहेत. सोन्याच्या दागिन्यातील गुंतवणूक ही शुद्ध गुंतवणूक या प्रकारात येत नाही. कारण दागिने विकताना सराफा व्यापारी मोठ्या प्रमाणात दागिने घडणावळीचे शुल्क घेतात आणि दागिन्यातील सोने हे शुद्ध सोने नसते. तसेच सोन्यातील दागिने लोकांकडून खरेदी करताना त्याच दागिन्यांचे वजन मिश्र धातू म्हणून कमी करतात. थोडक्यात, सोन्याचे दागिने अल्प आणि मध्यम काळासाठी गुंतवणूक होऊ शकत नाही आणि त्यापासून चांगला परतावा मिळणेदेखील शक्य नाही.

अभौतिक सोने या प्रकारात गुंतवणूक करणाऱ्यांची संख्या तुलनेने कमी दिसत असली, तरी ती उल्लेखनीय आहे. निवडलेल्या गुंतवणूकदारांपैकी ३९ (३२%) लोक अभौतिक सोने जसे गोल्ड इटीएफ, गोल्ड सर्टिफिकेट, गोल्ड म्युच्युअल फंड, सोने वस्तू बाजार, सॉव्हरिन गोल्ड बॉण्ड या प्रकारात गुंतवणूक करताना आढळून आले. ही गुंतवणूक सुरक्षितता आणि योग्य लाभ मिळवून देते. त्यापैकी गोल्ड सर्टिफिकेट या प्रकारात गुंतवणूक करणाऱ्या उत्तरादात्यांची संख्या १७ (१४.२%) आहे.

**तक्ता २ : सोने गुंतवणुकीच्या विविध प्रकारांतील उत्तरदात्या गुंतवणूकदाराची संख्या**

| **सोने गुंतवणुकीचे विविध प्रकार** | **गुंतवणूक करणाऱ्या उत्तरदात्यांची संख्या** | **टक्केवारी** |
|---|---|---|
| एकूण उत्तरदाते | १२० | १०० |
| सोन्याचे दागिने | १०८ | ९० |
| सोन्याची नाणी | २३ | १९.२ |
| सोन्याची बिस्किटे | २४ | २० |
| गोल्ड इटीएफ | ४ | ३.३ |
| गोल्ड सर्टिफिकेट | १७ | १४.२ |
| गोल्ड म्युच्युअल फंड | ६ | ५ |
| वस्तू (शेअर) बाजारातील सोन्यातील गुंतवणूक | ३ | २.५ |
| सॉव्हरिन गोल्ड बॉण्ड | ९ | ७.५ |

संदर्भ: प्राथमिक माहिती

५) सोने गुंतवणुकीमागील उद्देश: सोने गुंतवणूकदारांचा उद्देश समजून घेण्यासाठी नफा, संपत्तीची निर्मिती, बचत हे पर्याय उत्तरदात्या गुंतवणूकदारांना निवडीसाठी देण्यात आले होते. त्यापैकी ९१ उत्तरदात्यांनी गुंतवणूक दुहेरी उद्देशाने केलेली आहे आणि १७ उत्तरदात्यांनी एकेरी उद्देशाने केली आहे. उत्तरदात्यांपैकी १७ (१४.२%) उत्तरदात्यांचा उद्देश हा केवळ संपत्ती निर्मिती होत. उर्वरित उत्तरदात्यांपैकी ४१उत्तरदात्यांचा उद्देश नफाप्राप्तीबरोबर संपत्ती निर्मिती तर ५८ लोकांचा उद्देश नफाप्राप्ती आणि बचत हा होता.

थोडक्यात एकूण गुंतवणूकदारांपैकी १०८

गुंतवणूकदार सोन्याचे दागिने या प्रकारात गुंतवणूक करत असल्याचे आढळून आले. दागिन्यातील गुंतवणूक ही सौभाग्याचे प्रतीक मानले जाते आणि केवळ कुटुंब आर्थिक अडचणीत असताना अशा सोन्याचा वापर कुटुंबाला आर्थिक संकटातून बाहेर काढण्यासाठी केला जातो. म्हणजेच भारतीय लोक सोने खरेदी गुंतवणूक या दृष्टिकोनातून विचारात न घेता सोन्याला सौभाग्याचे प्रतीक बचत आणि आर्थिक संकटातील आधार याच ऐहिक आणि पारंपारिक भावनेतून अजूनही बघतात.

**समारोप :**

सोने या धातूतील गुंतवणूक ही भारतीय लोकांचे गुंतवणुकीचे मुख्य साधन आहे. वास्तविक भारतीय लोक सोन्यामध्ये गुंतवणूक न करता सोनेरूपात आपल्याकडील उत्पन्नाचा काही भाग बचत करतात आणि त्यातील मूल्यवृद्धीचा लाभ घेतात. भारतात जवळपास २४००० टन सोने लोकांकडे साठवलेले असेल असा अंदाज वर्तवण्यात आलेला आहे. त्यातील सर्वाधिक सोने हे दागिन्यांच्या स्वरूपात असून ते केवळ सौभाग्याचे प्रतीक, आर्थिक अडचणीच्या काळातील साधन म्हणून वापरले जाते.

गुंतवणुकीच्यादृष्टीने सोन्याचा विचार केला असता गोल्ड इटीएफ, गोल्ड सर्टिफिकेट, गोल्ड म्युच्युअल फंड, सोने वस्तू बाजार, सॉव्हरिन गोल्ड बॉण्ड या गुंतवणूक प्रकारात गुंतवणूक करणाऱ्यांची संख्या तुलनेने कमी दिसत असली तरी ती उल्लेखनीय आहे. एकूण गुंतवणूकदारांपैकी जवळजवळ ४७% गुंतवणूकदारांनी शुद्ध सोने किंवा पेपर सोने किंवा ई-सोने या प्रकारात गुंतवणूक केलेली होती. असे असले तरी शेअर बाजारातील गुंतवणूक ही सोने, चांदी यातील गुंतवणुकीच्या तुलनेत अधिक फायद्याची असल्याचे सिद्ध होते.

थोडक्यात, भारतात सोने गुंतवणुकीचे अनन्यसाधारण महत्त्व आहे. भारतातील पारंपारिक गुंतवणूक अजूनही सोन्यामध्येच होते. परंतु अभौतिक सोन्यातील गुंतवणूक वाढत असल्यामुळे गुंतवणुकीचा महत्तम परतावा मिळविण्याबरोबरच गुंतवणूक सुरक्षितता मोठ्या प्रमाणात मिळत आहे. त्याशिवाय लोकांना सोन्यातील गुंतवणुकीच्या नवीन साधनांविषयी ज्ञान असून त्यात गुंतवणूक करण्यास प्राधान्य देत असल्याचे दिसते.

**ग्रंथसूची :**


1. A Vaidyanathan (1999), "Consumption of Gold in India: Trends and Determinants", Economic and Political Wkly, 34 (8), Feb. 20-26, 1999 PP. 471-47.
2. Nishad Nawaz and Sudindra V. (2013), "A Study on various forms of gold investment", Asia Pacific Journal of Research, 2 (4), Jun, 2013, PP. 55-7.
3. NISM (2020), ''Commodity Insights Yearbook 2020'', National Institute of Securities Markets, Mohapada, Maharashtra.
4. Patel G. and Chandwadkar A. (2006), "India's elasticity of Demand for Gold", Economic and Political Weekly, 41(6), Feb. 11-17, 2006, PP.507-516.
5. Rabi N. Mishra and G. Jagan Mohan (2012), ''Gold Prices and Financial Stability in India'', WPS 2/2012, Department of Economic and Policy Research, Reserve Bank of India, Central Office, Mumbai.
6. Sudindra V. and Naidu (2019), ''Is Sovereign Gold Bond is better than other Gold Investment?'' International Journal of Management Studies, VI 2(2), April 2019, PP. 101-104.
7. http://bse2nse.com
8. www.rbi.org.in


◆

# आंबा आणि आंबा प्रक्रियायुक्त पदार्थांच्या निर्यातीतून परकीय चलन प्राप्ती

**कृष्णा शंकर शहाणे** †

**प्रस्तावना :**

फळांचा राजा म्हणून ओळखला जातो तो आंबा. हा आंबा आपल्या गोड आणि खास चवीमुळे प्रसिद्ध आहे. भारतासह जगभरात आंबा हा खास अग्रक्रमाने खाल्ला जातो. जगभरात चीन, थायलंड, इंडोनेशिया, पाकिस्तान, मेक्सिको आदी देशांसह इतर अनेक देशांमध्ये आंबा उत्पादन घेतले जाते. पण जगातील सर्वाधिक आंबा उत्पादन हे भारतात होते. आंबा उत्पादनाच्या बाबतीत भारत जगात आघाडीवर म्हणजेच क्रमांक १चे राष्ट्र आहे. ही आपल्या कृषिप्रधान भारत देशासाठी प्रतिष्ठेची गोष्ट आहे.

केवळ आंबा हा चवीने गोड आहे ही एकच जमेची बाजू नसून, त्यामध्ये आरोग्यास उपयुक्त अशा अनेक घटक द्रव्यांचा समावेश आहे. त्यामध्ये 'अ' आणि 'क' जीवनसत्त्व कार्बोदके, प्रथिने, पोटॅशियम, फॉस्फरस, मॅग्नेशियम, कॅल्शियम, सोडियम, खनिजे, लोह या घटकद्रव्यांचा समावेश आहे. याच्या सेवनाने आरोग्य वृद्धिंगत होण्यास मदत होते. या पार्श्वभूमीवर त्याचे सेवन किंवा उपयोग किती महत्त्वाचा आहे, याची खात्री आपणास पटते.

भारतात विविध जाती-प्रजातींचे आंबे मोठ्या प्रमाणावर उत्पादित होतात. त्यात हापूस, पायरी, केशर, निलम, आम्रपाली, सिंधू, रत्ना, दशहरी, लंगडा, हिमसागर, गुलाबखास या प्रमुख तसेच इतर प्रकारच्या आंब्यांचा समावेश होतो. आंबा उत्पादनातील 'हे श्रेष्ठत्व' केवळ आजच आहे असे नव्हे; तर फार पूर्वीपासून भारतीय आंबा जगात श्रेष्ठ आहे. इ.स. १९३५ मध्ये डॉ. चिमा यांनी 'भारतीय आंबा' इंग्लंडच्या राणीला भेट दिला होता. तो त्याच्या विशिष्ट चवीमुळेच.

आजही इंग्लंडला तसेच इतर देशांकडे भारतीय आंब्यांची निर्यात मोठ्या प्रमाणावर होते. आंब्याच्या या वैशिष्ट्यांमुळेच हा आंबा शेतकरी, ग्राहक, व्यापारी, शासन, प्रक्रियायुक्त पदार्थांचे उत्पादक, परकीय नागरिक यांच्यासाठी विविध भूमिकेतून अतिशय महत्त्वाचा आहे. आंबा उत्पादनात भारताचे जगातील स्थान अतिशय महत्त्वाचे आहे.

आंबा फळांच्या हंगामात विविध जाती प्रजातींचे

† विभाग प्रमुख, अर्थशास्त्र विभाग, आर.एन.सी.कला, जे.डी.बी.वाणिज्य, एन.एस.सी.विज्ञान महाविद्यालय, नाशिक रोड, नाशिक ४२२०१०.
आजीव सभासद क्र. १२३६, भ्रमणध्वनी ९८५०७४८४८१, ई-मेल : drkrishnashahane1@gmail.com

आंबे बाजारात मोठ्या प्रमाणावर येतात. हे हंगामी फळ असल्यामुळे नागरिकांकडून याला मोठ्या प्रमाणावर मागणी येते. प्रत्यक्ष आंब्याची 'गोड' चव वर्षभर चाखता येत नाही. परंतु या चवीचा वर्षभर विविध प्रकारच्या आंबा प्रक्रियायुक्त पदार्थांच्या रूपाने आस्वाद घेता येतो. कैरी व आंबा यांच्यापासून विविध प्रक्रियायुक्त पदार्थांची निर्मिती केली जाते. आमचूर, गोड व आंबट चटणी, लोणचे, चुंदा, वडी, पन्हे, गुळआंबा, आंबापोळी, जॅम, गर, सरबत, आंबा स्कॅश यांची निर्मिती केली जाते. म्हणजेच आंबा या फळापासून मोठ्या प्रमाणावर प्रक्रियायुक्त पदार्थांची निर्मिती केली जाते. या विविध पदार्थांचे सेवन देश-विदेशातील नागरिकांकडून मोठ्या प्रमाणावर केले जाते, भारत हा आंबा उत्पादनात जगात क्रमांक एक वर असल्याने साहाजिकच प्रक्रियायुक्त पदार्थांची निर्यातही मोठ्या प्रमाणावर होते.

तक्ता क्रमांक १ मध्ये जागतिक पातळीवरील आंबा उत्पादन करणारे प्रमुख देश, त्या देशातील आंबा उत्पादनाखालील क्षेत्र, आंबा उत्पादन आणि उत्पादकता दर्शविली आहे. २०१० या वर्षात जगात एकूण ४९४६.३१४ हजार हेक्टर आंबा उत्पादनाखालील क्षेत्र होते. जागतिक पातळीवर भारताचे आंबा क्षेत्र हे सर्वाधिक म्हणजेच २३१२.३० हजार हेक्टर एवढे दिसून येते. यानंतर चीन (४६५.३३७), थायलंड (३११.०४८) या देशांचा नंबर लागतो. तर उर्वरित पाकिस्तान, मेक्सिको, इंडोनेशिया, ब्राझील, बांग्लादेश, फिलिपाईन्स, नायजेरिया या देशातील आंबा उत्पादनाखालील क्षेत्र

**तक्ता क्र. १ : जागतिक पातळीवरील आंबा उत्पादन करणारे प्रमुख देश (२०१०)**

| अ.नं. | देश | क्षेत्र (००० हेक्टर) | उत्पादन (००० मे.टन्स) | उत्पादकता (मे.टन्स / हेक्टर) | जागतिक उत्पादनाशी शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | भारत | २३१२.३० | १५०२६.७० | ६.५० | ४०.४८ |
| ०२ | चीन | ४६५.३३७ | ४३५१.२९ | ९.३५ | ११.७२ |
| ०३ | थायलंड | ३११.०४८ | २५५०.६० | ८.२० | ६.८७ |
| ०४ | पाकिस्तान | १७३.७ | १८४५.५० | १०.६२ | ४.९७ |
| ०५ | मेक्सिको | १७४.९७ | १६३२.६५ | ९.३३ | ४.४० |
| ०६ | इंडोनेशिया | १३१.६७४ | १२८७.२९ | ९.७८ | ३.४७ |
| ०७ | ब्राझील | ७५.१११ | ११८८.९१ | १५.८३ | ३.२० |
| ०८ | बांग्लादेश | १७०.८ | १०४७.८५ | ६.१३ | २.८२ |
| ०९ | फिलिपाईन्स | १८९.४३७ | ८२५.६८ | ४.३६ | २.२२ |
| १० | नायजेरिया | ११४.९ | ७९०.२० | ६.८८ | २.१३ |
| ११ | इतर देश | ८२७.०४ | ६५७८.०७ | ७.९५ | १७.७२ |
|  | एकूण जग | ४९४६.३१४ | ३७१२४.७४ | ७.५१ | १००.०० |

आधार : Source FAO Statistics

अत्यंत कमी आहे. आंबा उत्पादनाचा विचार करता याच वर्षात जागतिक पातळीवर ३७१२४.७४ हजार मेट्रिक टन्स एवढे आंबा उत्पादन होते. जगात भारतातील आंबा उत्पादन हे सर्वाधिक म्हणजेच १५०२६.७० हजार मेट्रिक टन्स एवढे होते. यानंतर चीन (४३५१.२९), थायलंड (२५५०.६०) या देशांचा नंबर लागतो. तर उर्वरित पाकिस्तान, मेक्सिको, इंडोनेशिया, ब्राझील, बांग्लादेश, फिलिपाईन्स, नायजेरिया या देशातील आंबा उत्पादन हे अत्यंत कमी दिसून येते. तर जगात प्रति हेक्टरी आंबा उत्पादकतेच्या बाबतीत ब्राझील हा देश १५.८३ मेट्रिक टन्स उत्पादन देऊन जगात प्रथम क्रमांकावर आहे. तर उत्पादकतेच्या बाबतीत भारत ६.५० मेट्रिक टन्स उत्पादन देऊन जगात नवव्या क्रमांकावर आहे, म्हणजेच भारतात आंबा उत्पादकता वाढीकडे अधिकाधिक लक्ष देण्याची गरज आहे आणि यात मोठी संधीदेखील आहे.

**तक्ता क्र. २ : भारतातील आंबा क्षेत्र, उत्पादन आणि उत्पादकता**

| अ.नं. | वर्ष | क्षेत्र (००० हेक्टर) | उत्पादन (०००टन्स) | उत्पादकता (टन्स/हेक्टर) |
|---|---|---|---|---|
| ०१ | १९९१-१९९२ | १०७७.६ | ८७१५.६ | ८.१ |
| ०२ | २००१-२००२ | १५७५.८ | १००२०.२ | ६.४ |
| ०३ | २००२-२००३ | १६२३.४ | १२७३३.२ | ७.८ |
| ०४ | २००३-२००४ | १९०६.७ | ११४९०.० | ६.० |
| ०५ | २००४-२००५ | १९७०.४ | ११८२९.७ | ६.० |
| ०६ | २००५-२००६ | २०८०.७ | १२६६३.१ | ६.१ |
| ०७ | २००६-२००७ | २१५४.० | १३७३४.० | ६.४ |
| ०८ | २००७-२००८ | २२०१.० | १३९९७.० | ६.४ |
| ०९ | २००८-२००९ | २३०९.० | १२७५०.० | ५.५ |
| १० | २००९-२०१० | २३१२.३ | १५०२६.७ | ६.५ |
| ११ | २०१०-२०११ | २२९७.० | १५१८८.० | ६.६ |
| १२ | २०११-२०१२ | २३७८.१ | १६१९६.४ | ६.८ |
| १३ | २०१२-२०१३ | २५००.० | १८००२.४ | ७.२ |
| १४ | २०१३-२०१४ | २५१६.० | १८४३१.३ | ७.३ |
| १५ | २०१४-२०१५ | २२१७.० | १८५०६.० | ८.३ |

आधार : Area Production and Yield of Horticulture Crops, P. - 149.

तक्ता क्रमांक २ मध्ये भारतातील आंबा क्षेत्र, उत्पादन आणि उत्पादकता दर्शविली आहे. वर्ष १९९१-१९९२ या वर्षात आंबा पिकाखालील क्षेत्र १०७७.६ हजार हेक्टर एवढे होते. ते २०१४-२०१५ या वर्षात २२१७.० हजार हेक्टरपर्यंत वाढले आहे. या

कालावधीत आंबा लागवडीखालील क्षेत्रात झालेली ही वाढ ११३९.४ हजार हेक्टर एवढी दिसून येते. वर्ष १९९१ -१९९२ या वर्षात आंबा पिकाचे उत्पादन ८७१५.६ हजार टन्स एवढे होते. ते २०१४-२०१५ या वर्षात १८५०६.० हजार टन्सपर्यंत वाढले आहे. या कालावधीत आंबा उत्पादनात झालेली ही वाढ ९७९०.४ हजार टन्स एवढी दिसून येते. तर याच कालावधीत आंबा पिकाच्या उत्पादकेत ८.१ टन्स प्रति हेक्टरवरून ८.३ टन्स प्रति हेक्टरपर्यंत वाढ झालेली आहे.

**भारतीय आंबा निर्यात :** भारतीय आंबा हा त्याच्या चवीमुळेच देश-विदेशातील ग्राहकांकडून मोठ्या आवडीने खाल्ला जातो. भारतातून जगभरात आंब्याची होणारी निर्यात दिवसेंदिवस वाढत आहे त्यापासून भारत सरकारला मिळणाऱ्या परकीय चलनात मोठ्या प्रमाणावर वाढ होत आहे. या परकीय चलनाचा उपयोग देशाचा आर्थिक विकास वृद्धिंगत करण्यासाठी केला जातो. भारतीय आंबा हा जगातील विविध देशांकडे निर्यात केला जातो. त्यात प्रामुख्याने युनायटेड अरब अमिराती, इंग्लंड, सौदी अरेबिया, कतार, कुवेत, नेपाळ, बांग्लादेश, अमेरिका, सिंगापूर व इतर देशांचा समावेश आहे. असे म्हटले जाते की, भारतीय आंबा पिकाने फार पूर्वीपासूनच जगभरात आपले स्थान निर्माण केलेले आहे. हा आंबा शेतकरी, ग्राहक, व्यापारी, प्रक्रिया पदार्थांचे उत्पादक, परकीय नागरिक यांच्यासाठी वेगवेगळ्या भूमिकेतून महत्त्वाचा आहे. भारत हा आंबा उत्पादनात जगात अतिशय महत्त्वाची भूमिका पार पाडतो. त्याने केवळ शेतीक्षेत्रात संपन्नता येते. एवढेच नव्हे; तर भारतीय शेतकऱ्यांची अर्थिक परिस्थिती त्याने सांभाळली जाते तर याच्या निर्यातीपासून भारत सरकारला बहुमूल्य असे परकीय चलनदेखील प्राप्त होते.

सर्वसाधारणपणे निर्यातीसाठी आवश्यक असणारा आंबा हा कीड व रोगमुक्त असावा, त्याचा आकार हा किमान एकसारखा असावा, फळ खरचटलेले नसावे, आंतरराष्ट्रीय पातळीवर बंधने घातलेली औषधे वापरून आंबा मशागत केलेला नसावा, निर्यात केला जाणारा आंबा हा ताजा असतानाच समोरील देशाकडे पोहोचणे महत्त्वाचे आहे. आंब्याची योग्य त्या प्रकारे प्रतवारी केलेली असावी, फळाची विनाकारण जास्त वेळा हाताळणी करू नये, एकसारख्या आकाराचे व रंगाचे आंबे एका खोक्यात भरावेत. आंबा हा नाशवंत असल्याने तो काढणीनंतर साधारण २२ - २५ दिवस चांगला टिकतो, या कालावधीच्या आत हा आंबा निर्यातस्थळी पोहोचेल अशा बेताने पाठवावा. आंबा हा उष्णतेपासून दूर ठेवावा या सर्व बाबींची काळजी आंबा निर्यातीत घ्यावी लागते. जेणे करून निर्यातक्षम फळांचा दर्जा व गुणवत्ता यावर विपरित परिणाम होता कामा नये. कोणत्याही कारणाने निर्यात केल्या जाणाऱ्या फळाचा दर्जा घसरला तर त्याचा परिणाम मिळणाऱ्या परकीय चलनावर होतो. यासाठी हा दर्जा योग्य त्या मानकांप्रमाणे राखणे आवश्यक आहे.

तक्ता क्रमांक ३ वरून असे लक्षात येते की, गेल्या अनेक वर्षांच्या कालावधीत भारतातून झालेली आंबा निर्यात आणि त्यापासून प्राप्त झालेल्या परकीय चलनाच्या प्रमाणात मोठ्या प्रमाणावर वाढ झालेली आहे. वर्ष १९९३-१९९४ ते २०१९-२०२० या कालावधीत आंबा निर्यात ही २२७९४ मेट्रिक टनांवरून ४९६५९ मेट्रिक टनांपर्यंत म्हणजे २६८६५ मेट्रिक टनांनी वाढलेली दिसून येते. ही वाढ सुमारे २.१७ पट असल्याचे दिसून येते, तर त्यापासून प्राप्त झालेल्या परकीय चलनाच्या प्रमाणात याच कालावधीत ४३८७ लक्ष रुपयांवरून ४००२१ लक्ष रुपयांपर्यंत म्हणजेच ३५६३४ लक्ष रुपयांनी वाढ झालेली दिसून येते. ही

### तक्ता क्र. ३ : भारतातून झालेल्या आंबा निर्यातीची प्रवृत्ती आणि परकीय चलन प्राप्ती

| अ.नं. | वर्ष | आंबा निर्यात (मे.टन्स) | प्रतिवर्षी निव्वळ वाढ - घट | प्राप्त परकीय चलनाचे मूल्य (लक्ष रुपये) | प्रतिवर्षी निव्वळ वाढ - घट |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | १९९३-१९९४ | २२७९४ | ------ | ४३८७ | ------ |
| ०२ | १९९४-१९९५ | २५४१४ | २६२० | ४५०२ | ११५ |
| ०३ | १९९५-१९९६ | २२२६९ | -३१४५ | ३८५१ | -६५१ |
| ०४ | १९९६-१९९७ | २४७७३ | २५०४ | ४४८७ | ६३६ |
| ०५ | १९९७-१९९८ | ४२८९५ | १८१२२ | ७३५९ | २८७२ |
| ०६ | १९९८-१९९९ | ४५४०७ | २५१२ | ७९१३ | ५५४ |
| ०७ | १९९९-२००० | ३६६३१ | -८७७६ | ७१५५ | -७५८ |
| ०८ | २०००-२००१ | ३७११० | ४७९ | ६८६१ | -२९४ |
| ०९ | २००१-२००२ | ४४४२९ | ७३१९ | ८०९९ | १२३८ |
| १० | २००२-२००३ | ३८००१ | -६४३८ | ८४१९ | ३२० |
| ११ | २००३-२००४ | ६०५५१ | २२५५० | ११०५२ | २६३३ |
| १२ | २००४-२००५ | ५३४८० | -७०७१ | ८९६१ | -२०९१ |
| १३ | २००५-२००६ | ६९६०६ | १६१२६ | १२८११ | ३८५० |
| १४ | २००६-२००७ | ७९०६० | ९४५४ | १४१९३ | १३८२ |
| १५ | २००७-२००८ | ५४३५१ | -२४७०९ | १२७४१ | -१४५२ |
| १६ | २००८-२००९ | ७३७०३ | २९३५२ | १७०७१ | ४३३० |
| १७ | २००९-२०१० | ७४४६० | -९२४३ | २००५३ | २९८२ |
| १८ | २०१०-२०११ | ५८८६३ | -१५५९७ | १६४८३ | -३५७० |
| १९ | २०११-२०१२ | ६३४४१ | ४५७८ | २०९७४ | ४४९१ |
| २० | २०१२-२०१३ | ५५५८५ | -७८५० | २६४७२ | ५४९४ |
| २१ | २०१३-२०१४ | ४१२८० | -१४३०५ | २८५४३ | १७७१ |
| २२ | २०१४-२०१५ | ४२९९८ | ४४१८ | ३०२५३ | १७१० |
| २३ | २०१७-२०१८ | ४९१८० | ------- | ३८२३४ | ------ |
| २४ | २०१८-२०१९ | ४६५१० | -२६७० | ४०६५० | २४१६ |
| २५ | २०१९-२०२० | ४९६५९ | ३१४९ | ४००२१ | -६२९ |

आधार : Export Statistics for APEDA.

वाढ सुमारे ९.१२ पट असल्याचे लक्षात येते. आंबा निर्यातीत या कालावधीत दोन पटींनी वाढ झालेली असताना त्यापासून मिळणाऱ्या परकीय चलनाच्या प्राप्तीत नऊ पटींनी वाढ झालेली आहे. याचाच अर्थ, भारतीय आंब्याची आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत मिळणारी किंमत दिवसेंदिवस वाढत आहे.

मागील आकडेवारीचा प्रतिवर्षी विचार करता त्यात मोठ्या प्रमाणावर चढ-उतार झाल्याचे दिसून येते. याचाच अर्थ, आंबा उत्पादन तसेच निर्यात याकडे चांगल्या प्रकारे लक्ष दिल्यास दरवर्षी गत वर्षापेक्षा आंबा निर्यात होण्यास अजूनही चांगली संधी आहे. मागील आकडेवारीमध्ये एकूण नऊ वर्षामध्ये (१९९५-१९९६, १९९९-२०००, २००२-२००३, २००४-२००५, २००७-२००८, २००९-२०१०, २०१०-२०११, २०१२-२०१३, २०१३-२०१४, २०१८-२०१९) गतवर्षीच्या तुलनेने आंबा निर्यातीत घट झालेली दिसून येते. तर आंबा निर्यातीपासून मिळालेल्या परकीय चलनाची मागील पानावरील आकडेवारी पाहाता एकूण सात वर्षांमध्ये (१९९५-१९९६, १९९९-२०००, २०००-२००१, २००४-२००५, २००७-२००८, २०१०-२०११, २०१९-२०२०) गतवर्षीच्या तुलनेने मिळालेल्या परकीय चलनात घट झालेली दिसून येते.

**तक्ता क्र. ४ : भारतातून झालेली देशपरत्वे आंबा निर्यात (२०१४ - २०१५)**

| अ.नं. | देश | आंबा निर्यात (टन्स) | प्राप्त परकीय चलनाचे मूल्य (लक्ष रुपये) |
|---|---|---|---|
| ०१ | यु.ए.इ. | २९२३१.९० | २१४९७.८५ |
| ०२ | नेपाळ | ३५७४.९३ | ६९५.४२ |
| ०३ | बांग्लादेश | २४७५.३३ | ४७३.४२ |
| ०४ | सौदी अरेबिया | २१७१.४९ | १४२८.५९ |
| ०५ | कतार | ९९८.१० | ८१०.८१ |
| ०६ | कुवेत | ७८७.२८ | १२३८.१८ |
| ०७ | कॅनडा | ६६९.२६ | ४२९.६३ |
| ०८ | बहारीन | ६५८.७१ | ५०५.३६ |
| ०९ | ओमान | ६०५.२० | ४६९.२७ |
| १० | सिंगापूर | ५६२.९५ | ५८८.३१ |
| ११ | इतर | १२६३.१६ | २११६.८१ |
| | एकूण | ४२९९८.३१ | ३०२५३.६५ |

आधार : १. APEDA website, accessed on 10 July 2015.

2. Horticultural Statistical at a glance 2015, P. 386.

तक्ता क्रमांक ४ मध्ये २०१४-२०१५ या वर्षात भारतातील आंबा निर्यातीची देशपरत्वे आकडेवारी दर्शविली आहे. या वर्षात भारताची सर्वाधिक आंबा निर्यात ही यु.ए.इ. या देशाकडे २९२३१.९० टन्स एवढी झालेली दिसते, या निर्यातीपासून भारत

सरकारला २१४९७.८५ लक्ष रुपयांचे परकीय चलन प्राप्त झाले होते. या वर्षात भारतातून झालेल्या एकूण आंबा निर्यातीपासून प्राप्त झालेल्या परकीय चलनात फक्त यु.ए.इ. या देशाकडून प्राप्त झालेल्या परकीय चलनाचे प्रमाण ७१.०५% एवढे होते. त्या मानाने उर्वरित देशांकडे झालेल्या निर्यातीपासून मिळालेल्या परकीय चलनाचे प्रमाण कमी असल्याचे दिसून येते.

**आंब्याचे प्रक्रियायुक्त पदार्थ :**

**कैरीचे लोणचे :** कैरी किंवा कच्चा आंबा यापासून तयार केला जाणारा आणि अत्यंत लोकप्रिय पदार्थ म्हणून कैरीचे लोणचे याचा उल्लेख करावा लागेल. आंब्याचा इतर कोणताही प्रक्रियायुक्त पदार्थ यापेक्षा अधिक प्रमाणावर वापरला जात नसेल एवढा वापर याचा केला जातो. घराघरांमध्ये महिलांना याची कृती अवगत आहे. त्यामध्ये मिरची, हळद, धने, जिरे, मिरे, मीठ, मोहरी, तेल या गोष्टींचा वापर करून स्वादिष्ट लोणचे तयार केले जाते.

**कैरीचे पन्हे :** कैरीच्या फोडी करून त्यात साखर, पाणी, मीठ, जिरे, सायट्रिक ॲसिड यांचा गरजेनुसार वापर करून कैरीच्या फोडी उकळत्या पाण्यात टाकून व त्यात इतर आवश्यक पदार्थ टाकून कैरीचे पन्हे तयार केले जाते. उन्हाळ्यात कैरीचे पन्हे नागरिक चवीने पितात. याची लोकप्रियतादेखील मोठ्या प्रमाणावर आहे.

**कैरीची चटणी :** कैरीची साल काढून टाकून व कोय बाजूला करून उरलेल्या घटकाचा वापर चटणी तयार करण्यासाठी केला जातो. कैरीच्या फोडी, जास्त साखर, किंचित मीठ व मसाला टाकून शिजवून घेतात. हा भाग घट्ट झाला की तयार होते ती कैरीची गोड चटणी. कैरीची तिखट चटणी तयार करताना कैरीच्या फोडींमध्ये जास्त मसाला, किंचित मीठ व साखर टाकून तिखट चटणी तयार केली जाते. ही चटणी जास्त कालावधी टिकण्यासाठी व्हिनेगरचा वापर केला जातो.

**कैरीचे आमचूर :** कैरीच्या फोडी करून त्या उन्हात वाळविल्या जातात व त्याची पावडर केली जाते. त्यातील जीवनसत्त्वे कायम राहण्यासाठी त्यावर सल्फायटेशन करणे आवश्यक असते. याच पावडरीला चूर्ण किंवा आमचूर असे म्हणतात.

**आंबा स्क्वॅश :** आंबा स्क्वॅशच्या निर्मितीसाठी आंब्याचा गर, साखर, पाणी, सायट्रिक ॲसिड यांचा वापर केला जातो. आंबा गर व साखरेचा पाक, सायट्रिक ॲसिड यांचे एकत्रिकरण केले जाते. हा तयार झालेला स्क्वॅश विविध आकारांच्या बाटल्यांमध्ये भरून विक्रीसाठी तयार होतो.

**आंबा गर :** आंब्याच्या कोयी व साली वेगळ्या करून त्याचा गर काढला जातो. तो एकजीव करून त्यातील तंतुमय पदार्थ वेगळे केले जातात. त्यात सोडियम बेंझोएटचा वापर करून हा गर दीर्घकाळपर्यंत टिकवला जातो. असा गर हवाबंद डबे, बाटल्या, पिशव्या यामध्ये पॅकिंग केला जातो. हंगामाव्यतिरिक्त असा गर आवडीने खाल्ला जातो.

**आंब्याचे पेय :** आंब्याचा वापर करून उत्कृष्ट अशा चवीचे पेय तयार केले जाते. विविध आकाराच्या बाटल्यांमध्ये हा ज्यूस किंवा पेय आपण चवीने पितो. आंब्याच्या प्रक्रिया पदार्थांपैकी हा ज्यूस मोठ्या प्रमाणावर लोकप्रिय आहे. देश-विदेशातील नागरिक याचे सेवन चांगल्याप्रकारे करतात.

**आंबा पोळी :** आंब्याचा रस ताटलीमध्ये किंवा पसरट भांड्यामध्ये घरगुती पद्धतीने वाळवून आंबा पोळी तयार केली जाते. तसेच ड्रायरमध्ये आंब्याचा रस ठेवूनही अशी पोळी तयार केली जाते. त्यात योग्य त्या प्रमाणावर पेक्टीनचा वापर केला जातो. आंबा पोळी हादेखील सर्वज्ञात व चांगल्याप्रकारे लोकप्रिय असणारा प्रकार आहे.

**आंबा चॉकलेट :** साखरेचा पाक, आंब्याचा गर, पेक्टीन एकत्र शिजवून नंतर जिलेटिन घालून शिजवावे. हा पदार्थ तूप लावलेल्या पसरट भांड्यात टाकून ही जेली सुकल्यावर नंतर त्याचे गरजेनुसार लहान-लहान तुकडे केले जातात. हेच तुकडे पॅकिंग केल्यावर तयार होतात ते चॉकलेट.

**आंबा बर्फी :** साखरेच्या पाकामध्ये आंब्याचा गर एकजीव करून घेतला जातो. त्यात आवश्यकतेनुसार खवा टाकावा. या मिश्रणातील पाण्याचे प्रमाण कमी झाल्यानंतर पसरट भांड्यात ओतले जाते. ते सुकल्यानंतर तयार होते ती आंबा बर्फी होय.

**आंबा जॅम :** इतर फळांप्रमाणेच आंब्याचादेखील जॅम तयार केला जातो. आंब्याचा गर, साखर, पेक्टीन, सायट्रिक ॲसिड यांना एकत्र करून शिजविले जाते. हा जॅम कोमट-गरम असताना विविध आकाराच्या बाटल्या व डब्यांमध्ये भरला जातो.

**आंबा प्रक्रिया उद्योग आणि निर्यात :**

ज्याप्रमाणे आंबा या फळाची मोठ्या प्रमाणावर निर्यात होते त्याचप्रमाणे त्यापासून तयार केलेल्या विविध प्रक्रियायुक्त पदार्थदेखील मोठ्या प्रमाणावर निर्यात होतात. भारतातून होणाऱ्या आंबा स्क्वॅश निर्यातीची प्रवृत्ती तक्ता क्रमांक ५ मध्ये दर्शविली आहे.

तक्ता क्रमांक ५ मध्ये भारतातून होणाऱ्या आंबा स्क्वॅश निर्यातीची प्रवृत्ती दर्शविली आहे. वर्ष २००९-२०१० मध्ये भारतातून ६५१३ मेट्रिक टन आंबा स्क्वॅश निर्यात झालेली दिसून येते. त्यापासून २९१ लक्ष रुपयांच्या परकीय चलनाची प्राप्ती भारत सरकारला झाली. या वर्षात आंबा स्क्वॅश निर्यातीला प्रति मेट्रिक टन ०.०४४ लक्ष रुपये दर मिळाला

**तक्ता क्र. ५ : भारतातून होणाऱ्या आंबा स्क्वॅश निर्यातीची प्रवृत्ती.**

| अ.नं. | वर्ष | आंबा स्क्वॅश (मेट्रिक टन) | निर्यात प्राप्त रक्कम (लक्ष रुपये) | मिळालेला दर (लक्ष रु./ मे. टन ) |
|---|---|---|---|---|
| ०१ | २००९-२०१० | ६५१३ | २९१ | ०.०४४ |
| ०२ | २०१०-२०११ | १४०१३ | ५७२ | ०.०४० |
| ०३ | २०११-२०१२ | ४४९६२ | २२२२ | ०.०४९ |
| ०४ | २०१२-२०१३ | ७०६७० | ३८१० | ०.०५० |
| ०५ | २०१३-२०१४ | ७९०६९ | ४८५१ | ०.०६१ |
| ०६ | २०१४-२०१५ | ८९६४३ | ५३८२ | ०.०६० |
| ०७ | २०१५-२०१६ | ८१७०५ | ५१९३ | ०.०६३ |
| ०८ | २०१६-२०१७ | १०२४३४ | ६४१६ | ०.०६२ |
| ०९ | २०१७-२०१८ | ६०८७६ | ३८५ | ०.००६ |
| १० | २०१८-२०१९ | ५६३४२ | २९९१ | ०.०५३ |
| ११ | २०१९-२०२० | ९०७२० | ५५३१ | ०.०६० |
| १२ | २०२०-२०२१ | ३६२६१ | ४६२७ | १.२६३ |

आधार : DGCIS Annual Export.

असल्याचे दिसून येते. तर वर्ष २०२०-२०२१ मध्ये ३६२६१ मेट्रिक टन आंबा स्क्वॅश निर्यात झालेली दिसून येते. त्यापासून ४६२७ लक्ष रुपयांच्या परकीय चलनाची प्राप्ती भारत सरकारला झाली. या वर्षात आंबा स्क्वॅश निर्यातीला प्रति मेट्रिक टन १.२६३ लक्ष रुपये दर मिळाला असल्याचे दिसून येते.

भारतातून होणारी ही निर्यात टिकवून ठेवणे किंवा वाढविणे या बरोबरच किंमतीत मोठ्या प्रमाणावर वाढ करणे आवश्यक आहे. असे झाल्यास भारतास उत्तरोत्तर अधिकाधिक आर्थिक प्राप्ती होण्यास मदत होईल.

**आंबा गर निर्यात :**

आहार व आरोग्यशास्त्राच्या दृष्टिकोनातून महत्त्वाच्या असणाऱ्या आंबा फळाला हंगामात मोठ्या प्रमाणावर मागणी येते. तसेच हंगामात त्याची उपलब्धतादेखील मोठ्या प्रमाणावर असते. याच्या विविध प्रक्रियायुक्त पदार्थापैकी एक महत्त्वाचा पदार्थ म्हणून आंबा गर या पदार्थाकडे पाहिले जाते. याची निर्मिती तर भारतात मोठ्या प्रमाणावर होतेच; पण त्याची निर्यातही चांगल्या प्रकारे होते. त्यातून आंतरराष्ट्रीय बाजारपेठेवर भारताचे वर्चस्व निर्माण होण्यास मदत होते.

**आंब्याचा गर :**

सर्वसाधारपणे आंब्याच्या हंगामात चांगल्या जातीचे आंबे यासाठी निवडले जातात. स्वच्छ अशा आंब्यापासून साल व कोयी वेगळ्या केल्या जातात आणि गर वेगळा केला जातो. तो एकत्र किंवा एकजीव करून घेतला जातो. त्यातील तंतुमय पदार्थ किंवा दशा गाळून वेगळ्या केल्या जातात. हा गर जास्त कालावधी टिकण्याकरिता त्यात 'सोडियम बेंझोएट'चा वापर केला जातो. असा गर हवाबंद डबा, बाटल्या, प्लॅस्टिकच्या विविध आकाराच्या डब्या तसेच प्लॅस्टिक पिशव्यांमध्ये भरला जातो. गर जास्त दिवस टिकण्यासाठी बाटल्या, डबा, पिशव्या यांचे निर्जंतुकीकरण महत्त्वाचे ठरते. असा आंबा गर आंब्याच्या हंगामाशिवाय आपणास वापरता येतो. त्याची चवही चांगली लागते. त्यामुळेच त्याची निर्यातही मोठ्या प्रमाणावर केली जाते. त्यापासून परकीय चलनाची प्राप्ती होते.

तक्ता क्रमांक ६ मध्ये भारतातून होणाऱ्या आंबा गर निर्यातीची प्रवृत्ती दर्शविली आहे. वर्ष २००९-२010 मध्ये भारतातून ४०८५ मेट्रिक टन आंबा गर निर्यात झालेला दिसून येतो. त्यापासून ६१४०८ लक्ष रुपयांच्या परकीय चलनाची प्राप्ती भारत सरकारला झाली. या वर्षात आंबा गर निर्यातीला प्रति मेट्रिक टन १५.०३ लक्ष रुपये दर मिळाला असल्याचे दिसून येते. तर वर्ष २०२०-२०२१ मध्ये ७१३८८ मेट्रिक टन आंबा गर निर्यात झालेली दिसून येते. त्यापासून ५०३४९ लक्ष रुपयांच्या परकीय चलनाची प्राप्ती भारत सरकारला झाली. या वर्षात आंबा गर निर्यातीला प्रति मेट्रिक टन ०.७० लक्ष रुपये दर मिळाला असल्याचे दिसून येते.

**समारोप :**

आंबा, आंबा स्क्वॅश, आंबा गर यांची निर्यात व त्यापासून मिळालेल्या परकीय चलनाची आकडेवारी पाहाता आंबा निर्यात हा भारतीय अर्थव्यवस्थेचा मोठा पैलू असल्याचे लक्षात येते. म्हणजेच भारत सरकारला परकीय चलन मिळवून देण्यात आंबा निर्यातीची महत्त्वाची भूमिका दिसून येते. जगातील अतिशय प्रगत अशा देशाकडे उदा. इंग्लंड, अमेरिका, यू.ए.इ., सौदी अरेबिया तसेच इतर देशाकडे ही आंबा निर्यात झालेली आहे. आंबा निर्यातीच्या बाबतीत केशर व हापूस या जाती मोठ्या प्रमाणावर निर्यातक्षम समजल्या जातात. असे असले, तरी एकूण आंबा निर्यात त्या मानाने कमी आहे. यामध्ये आगामी काळात वाढ

**तक्ता क्र. ६ : भारतातून होणाऱ्या आंबा गर निर्यातीची प्रवृत्ती**

| अ.नं. | वर्ष | आंबा गर निर्यात (मेट्रिक टन) | प्राप्त रक्कम (लक्ष रुपये) | मिळालेला दर (लक्ष रु./ मे. टन ) |
|---|---|---|---|---|
| ०१ | २००९-२०१० | ४०८५ | ६१४०८ | १५.०३ |
| ०२ | २०१०-२०११ | १३६५१३ | ६६३१७ | ०.४८ |
| ०३ | २०११-२०१२ | ११८६६७ | ४७९०७ | ०.४० |
| ०४ | २०१२-२०१३ | ११४१६५ | ४५०८३ | ०.३९ |
| ०५ | २०१३-२०१४ | १४८६७९ | ६१६२ | ०.०४ |
| ०६ | २०१४-२०१५ | १२६१३९ | ६६६२४ | ०.५३ |
| ०७ | २०१५-२०१६ | १०३४८९ | ६१७७० | ०.६० |
| ०८ | २०१६-२०१७ | १०१०८६ | ६४१०७ | ०.६३ |
| ०९ | २०१७-२०१८ | ८७०७८ | ५०९५६ | ०.५८ |
| १० | २०१८-२०१९ | ८४०६९ | ५१३३६ | ०.६१ |
| ११ | २०१९-२०२० | ६७७५८ | ४५३०० | ०.६७ |
| १२ | २०२०-२०२१ | ७१३८८ | ५०३४९ | ०.७० |

आधार : DGCIS Annual Export.

होणे आवश्यक आहे व त्यासाठी मोठा वावही आहे

**संदर्भ सूची -**


१) APEDA website, accessed on 10 July 2015.

२) Maharashtra Chamber Patrika, April 2015 VOL XXXXVI No. 1

३) Maharashtra Chamber Patrika, December 2016 VOL XXXXVII No. 09

४) Horticultural Statistical at a glance 2015, Page 386.

५) कृषिदूत - ऑगस्ट २०१४, वर्ष ५ वे, अंक ८ वा, पूर्वा प्रकाशन, नाशिक.

६) कृषिदूत - एप्रिल २०१५, वर्ष ६ वे, अंक ४ था, पूर्वा प्रकाशन, नाशिक.

७) प्राईम कोकण - जून २०१६, वर्ष १, अंक ३रा, प्राईम प्रकाशन, चरई, ठाणे, मुंबई


◆

नवप्रवर्तन हे आर्थिक विकासाचे एक अक्षम्य इंजिन आहे.

**- ली केकियांग**

# सार्वजनिक अंदाजपत्रक सिद्धांत आणि व्यवहार: केंद्रीय आणि महाराष्ट्र अंदाजपत्रक २०२१-२२

**पी. एस. कांबळे** †

**प्रस्तावना :**

जगातील प्रत्येक देशाला आपला जलद आणि सर्वांगीण विकास व्हावा असे वाटत असते. त्यासाठी ते आर्थिक विकास धोरण निश्चित करून त्याची अंमलबजावणी करण्याचा प्रयत्न करत असतात. अर्थात, देशाचे आर्थिक धोरण हे चलनविषयक धोरण, राजकोषीय धोरण, आंतरराष्ट्रीय व्यापार धोरण, शिक्षण धोरण, शेती धोरण, उद्योग धोरण, पर्यावरण धोरण, लोकसंख्या धोरण, महिला धोरण, सामाजिक कल्याण धोरण अशी अनेक धोरणे आणि उपधोरणे यांचे मिळून तयार होत असते. यातील राजकोषीय धोरण देशाच्या आर्थिक धोरणाचे एक अत्यंत महत्त्वाचे अंग असते. कारण ते थेट लोकांच्या आणि संस्थाच्या हातात पैसा आणि खरेदीशक्ती स्थलांतरित करून एकूण मागणीवर प्रभाव पाडून जलद आणि सर्वांगीण, आर्थिक आणि सामाजिक विकास गतिमान, व्यापक आणि वाढविण्याचा प्रयत्न करते. राजकोषीय धोरणाचे अंदाजपत्रकीय धोरण किंवा अंदाजपत्रक हे महत्त्वाचे आणि प्रभावी अंग असून त्याची कर, सार्वजनिक खर्च, कर्ज, महसूल, तुटीचा अर्थभरणा अशी साधने असतात. त्यामुळे त्याच्या परिणामाचा अभ्यास आणि विश्लेषण करणे आवश्यक समजले जाते. सार्वजनिक अंदाजपत्रक हे देशाच्या विकासाचे म्हणजेच आर्थिक आणि सामाजिक विकासाचे प्रभावी साधन असते. ते सरकारच्या येत्या आर्थिक वर्षातील विकास धोरणाची दिशा, चालू वर्षातील आवश्यक दुरुस्त्या आणि बदल दर्शविते. देशाने आपल्या विकास धोरणात आणि अंमलबजावणीत कोणते बदल करावेत ते दर्शविते. त्यामुळेच सार्वजनिक अंदाजपत्रकाचे विकासाचे प्रभावी साधन म्हणून महत्त्व अनन्यसाधारण असते. सार्वजनिक अंदाजपत्रक देशाच्या विकास धोरणाचे प्रतिबिंब असते. अर्थव्यवस्थेचा सामाजिक, आर्थिक विकास गतिमान करण्यासाठी येत्या आर्थिक वर्षात सरकार कोणते प्रयत्न आणि उपाय राबविणार आहे. त्यांचा समावेश अंदाजपत्रकात असतो. अर्थात, हे अंदाजपत्रक तयार करताना देशातील आर्थिक आणि सामाजिक परिस्थिती विचारात घ्यावी लागते. देशाच्या नागरिकांसमोर नेमके कोणते प्रश्न आहेत. अर्थव्यवस्थेसमोर कोणती आव्हाने उभी आहेत तेही लक्षात घ्यावे लागते. अंदाजपत्रकात आर्थिक सामाजिक प्रश्न आणि समस्या सोडविण्याचे उपाय आणि तरतुदींचा समावेश करणे अपेक्षित असते. तसेच समाजातील भिन्न गटातील लोकांच्या

† प्राध्यापक, अर्थशास्त्र विभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.
आजीव सभासद क्र. ४८७, भ्रमणध्वनी : ९४२३०३३१७९, ई-मेल : pskamble2006 gmail.com

कल्याणावर कोणता अनुकूल किंवा प्रतिकूल परिणाम होणार आहे तेही स्पष्ट होते. त्यामुळे सर्वच संस्था, समूह आणि व्यक्ती यांच्यासाठी अंदाजपत्रक महत्त्वाचे आणि उपयुक्त असते. त्यामुळे सर्वांचेच लक्ष सरकारच्या अंदाजपत्रकाकडे असते आणि सर्वजण त्याचा विचार आणि अभ्यासही करत असतात. या पार्श्वभूमीवर, सार्वजनिक अंदाजपत्रक तयार करून, अंमलबजावणी करून ते प्रश्न सोडविण्याचा आणि आव्हाने दूर करण्याचा प्रयत्न अपेक्षित असतो.

केंद्र सरकारने आपले आर्थिक वर्ष २०२०-२१साठीचे अंदाजपत्रक १ फेब्रुवारी, २०२१ रोजी मान्यतेसाठी संसदेत सादर केले आहे. या अंदाजपत्रकाची सैद्धांतिक पार्श्वभूमी आणि अर्थव्यवस्थेसमोरील समस्या आणि आव्हाने विचारात घेऊन विश्लेषण केले असता, केंद्रीय अंदाजपत्रक पायाभूत सुविधा सुधारणेतून भारतीय अर्थव्यवस्था सुधारण्याचा प्रयत्न करणारे वाटते. मात्र त्याच वेळी ते आरोग्य क्षेत्र वगळता इतर सामाजिक क्षेत्राकडे मोठ्या प्रमाणात दुर्लक्ष करणारे आहे, असे दिसून येते. तसेच मार्च २०२१ मध्ये महाराष्ट्राच्या अर्थमंत्र्यांनी आर्थिक वर्ष २०२१-२२ साठीचे राज्याचे अंदाजपत्रक विधानसभा आणि विधानपरिषदेत मान्यतेसाठी सादर केले आहे. या अंदाजपत्रकाचे विकास दृष्टिकोनातून विवेचन केले असता, ते कोरोना महामारीचा वाईट अनुभव विचारात घेऊन आरोग्यक्षेत्रात अधिक सुधारणा करून या क्षेत्राच्या विकासावर भर देणारे आणि आरोग्य सेवांची उपलब्धता आणि दर्जा वाढविण्यास पसंती देणारे आणि प्रयत्न करणारे आहे, असे दिसून येते.

**सार्वजनिक अंदाजपत्रकाची सैद्धांतिक पार्श्वभूमी:**

आपण एखाद्या धोरणाचे मूल्यमापन करताना त्याची सैद्धांतिक पार्श्वभूमी आणि चौकट आपणास माहीत असणे आवश्यक असते. कारण या चौकटीत मूल्यमापन करणे तटस्थ आणि योग्य होते.

सार्वजनिक अंदाजपत्रकास इंग्रजीमध्ये 'Public Budget' असे म्हणतात. यातील 'Budget' हा शब्द Bougett या फ्रेंच शब्दापासून आलेला असून, त्याचा इंग्रजीत अर्थ Leather Bag म्हणजे चामड्याची पिशवी असा आहे. यावरून त्या चामडी पिशवीत असलेल्या सरकारच्या कागदपत्रांनाच अंदाजपत्रक असे म्हणतात. सरकारची महसूल आणि खर्च याविषयीची असलेली कागदपत्रे किंवा दस्तऐवज म्हणजे सार्वजनिक अंदाजपत्रक होय, असा अर्थ ध्वनित होतो. सार्वजनिक अंदाजपत्रक या संकल्पनेचा अर्थ अधिक चांगल्या प्रकारे तिच्या व्याख्यांच्या आधारे अधिक सुस्पष्ट करता येतो. रेणी स्टवूर्ण यांच्या मते, A document containing a preliminary approval plan of public revenue and expenditure. म्हणजेच प्राथमिक मान्यताप्राप्त सार्वजनिक महसूल आणि सार्वजनिक खर्च योजना असलेला दस्तऐवज म्हणजे सार्वजनिक अंदाजपत्रक होय. यावरून हे स्पष्ट होते की, सरकारचे अंदाजपत्रक म्हणजे त्याच्या महसूल आणि खर्च याविषयीचा प्राथमिक मान्यता असलेला एक आराखडा असतो. यापेक्षाही अधिक व्यापक अर्थ आपणास सार्वजनिक अंदाजपत्रकाच्या  बिलिऊ यांच्या पुढील व्याख्येतून स्पष्ट होतो; A statement of the estimated expenses during fixed period; it is a comparative table giving the amounts of the receipt to be realised and the expenses to be incurred; it is further more an authorisation or command given by the authorities to incur the expenses and collect the revenues. म्हणजेच सार्वजनिक अंदाजपत्रक हे एका विशिष्ट कालावधीतील अंदाजित खर्चाचे विवरणपत्र असते. ते महसूल आणि खर्च रकमेचा एक तौलनिक तक्ता असतो. याच्यापुढे जाऊन, ते सरकारने करण्याचा खर्च आणि गोळा करावयाचा

महसूल याचा आदेश असतो. यावरून हे स्पष्ट होते की, सार्वजनिक अंदाजपत्रक म्हणजे एक वर्षाच्या काळात, सरकार किती महसूल गोळा करून कोणत्या बाबीवर खर्च करणार आहे याचा अधिकृत आणि मान्यताप्राप्त अधिकार आणि आदेश असतो.

सार्वजनिक अंदाजपत्रकाच्या सिद्धांताचा विचार करता त्याविषयीचे सनातन आणि आधुनिक असे दोन दृष्टिकोन किंवा सिद्धांत आहेत. सनातन दृष्टिकोन ॲडम स्मिथ यांसारख्या सनातन संप्रदायातील अर्थशास्त्रज्ञांनी विकसित केला आहे. त्यांच्या मते, सार्वजनिक अंदाजपत्रक हे समतोल किंवा संतुलित असावे. कारण तुटीमुळे अनुत्पादक कर्ज वाढत जाते. सरकारने अर्थव्यवस्थेत कमीत कमी कार्ये करावीत आणि उपक्रम हाती घ्यावेत. त्यांनाच संरक्षण कार्ये असे म्हणता येईल. विशिष्ट मर्यादेनंतर सार्वजनिक खर्च घटत आहे. तुटीच्या अंदाजपत्रकामुळे संसाधनाचे खाजगी क्षेत्राकडून सरकारकडे स्थलांतर होते, जे अनुत्पादक असते. त्यामुळेच सार्वजनिक अंदाजपत्रक हे संतुलित असावे. जे उत्तम अंदाजपत्रक आणि तटस्थ असते. अर्थात, हा दृष्टिकोन आधुनिक काळात मान्य होण्यासारखा नाही. त्यामुळेच सार्वजनिक अंदाजपत्रक विषयक आधुनिक दृष्टिकोन डाल्टन यासारख्या आधुनिक अर्थशास्त्रज्ञांनी विकसित केला आहे. आधुनिक दृष्टिकोनाप्रमाणे, संतुलित अंदाजपत्रक नेहमीच योग्य असते असे नाही. सार्वजनिक अंदाजपत्रक हे आर्थिक विकास आणि आर्थिक स्थैर्य साध्य करण्याचे साधन असते. ते उत्पन्न आणि संसाधने पुनर्वाटपाचे साधन असते. मंदीच्या खायीतून अर्थव्यवस्था बाहेर काढण्याचे ते तंत्र असते. तुटीचे अंदाजपत्रक रोजगार निर्मिती करू शकते. ते आर्थिक स्थैर्य प्रस्थापित करण्यास मदत करते. मंदीच्या काळात तुटीचे तर चलन वाढीच्या काळात शिलकीचे अंदाजपत्रक योग्य आणि उपयुक्त ठरते. सार्वजनिक अंदाजपत्रक धोरण निश्चित करून राबविण्याचे अनेक हेतू किंवा उद्दिष्ट्ये असतात. त्यात प्रामुख्याने आर्थिक नियोजनाची आखणी आणि अंमलबजावणी करण्यासाठी, वेळ किंवा कालावधीची गरज, आवश्यक निधी गोळा करणे, निधी संकलनात कार्यक्षमता आणण्यासाठी, सार्वजनिक खर्चात कार्यक्षमता आणण्यासाठी, भूतकाळाचा अनुभव विचारात घेऊन वर्तमान आणि भविष्यकाळात वाटचाल करण्यासाठी, वर्तमान कार्यक्रम आणि योजना राबविणे, व्यापारचक्रे नियंत्रण आणि आर्थिक स्थैर्य निर्माण करणे, सरकारची जबाबदारी निश्चित करून पूर्ण करण्यासाठी इत्यादींचा समावेश होतो. वेगवेगळ्या निकषाच्या आधारे, सार्वजनिक अंदाजपत्रकांचे अनेक प्रकार आहेत, त्यांचे प्रामुख्याने पारंपारिक आणि आधुनिक असे वर्गीकरण केले जाते. आज विशेषतः आधुनिक वर्गीकरणातील आर्थिक आणि कार्यात्मक, कामगिरी अंदाजपत्रक ज्यात उद्दिष्ट वर्गीकरण आणि कार्यक्रम वर्गीकरण यांचा समावेश होतो. याबरोबरच, शून्याधारित अंदाजपत्रक असाही एक प्रकार सांगितला जातो. सार्वजनिक अंदाजपत्रकाचे तुटीचा अर्थभरणा हे एक साधन असून त्याची महसुली तूट, प्रभावी महसुली तूट, अंदाजपत्रकीय तूट, भांडवली तूट, राजकोषीय/ राज्य वित्तीय तूट, प्राथमिक तूट, मौद्रीक तूट असे प्रकार किंवा मापके सांगितली जातात.

भारतासारख्या देशात सार्वजनिक अंदाजपत्रक हे संविधानकृत दस्तऐवज असतो. कारण अंदाजपत्रकाची तरतूद भारतीय राज्यघटनेत केली आहे, त्यामुळे संविधान कायदा मान्य दस्तऐवज आणि धोरण असते. भारतीय संविधानाच्या ११२ कलमाप्रमाणे केंद्र सरकारने अंदाजपत्रक म्हणजेच सरकारचा वित्तीय मसुदा मान्यतेसाठी संसदेत म्हणजेच लोकसभा आणि राज्यसभेत सादर करायचे असते, तर भारतीय संविधानाच्या २०२ कलमाप्रमाणे राज्य सरकारांनी

आपले अंदाजपत्रक राज्यसंसद म्हणजेच विधानसभा आणि विधानपरिषदेत मान्यतेसाठी सादर करावयाचे असते. केंद्र सरकारच्या राज्य वित्तीय व्यवहारांची एकत्रित संकलित निधी खाते, आकस्मिक निधी खाते आणि सार्वजनिक बचत खाते अशी एकूण तीन खाती असतात आणि त्याचे स्वरूप आणि वैशिष्ट्ये वेगवेगळी असतात. देशात सार्वजनिक अंदाजपत्रक निर्मिती प्रक्रिया तयार करणे, सादर करणे व कायदा करणे आणि अंमलबजावणी करणे या तीन टप्प्यांतून होते. पहिल्या टप्प्यात, वित्तमंत्रालय सूचना काढून सरकारची वेगवेगळी मंत्रालये आणि खाती यांच्याकडून अंदाजित खर्च आणि महसूल संकलनाच्या शक्यता येत्या वर्षासाठी आणि सुधारित चालू वर्षासाठी संकलित करून अंदाजपत्रक तयार केले जाते. दुसऱ्या टप्प्यात, लोकसभा आणि राज्यसभेत हा वित्तमसुदा मान्यतेसाठी सादर केला जातो आणि सखोल आणि व्यापक त्यावर चर्चा होऊन त्यास मान्यता मिळते आणि त्याचा कायदा तयार होऊन अंदाजपत्रक तयार होते. शेवटच्या टप्प्यात, या तयार अंदाजपत्रकाची अंमलबजावणी त्या त्या मंत्रालयाची आणि खात्यांची असते.

**भारतीय अर्थव्यवस्थेची वर्तमानस्थिती आणि तिच्यापुढील समस्या / आव्हाने :**

देशाचे स्थूल देशांतर्गत उत्पादन (GDP) वर्ष २०२०-२१ पहिल्या तिमाहीत २३.९% ने घटले. ती घट दुसऱ्या तिमाहीत ७.५% राहिली असली, तरी ती उल्लेखनीय आहे याकडे दुर्लक्ष करता येणार नाही. एकूणच या वर्षात देशाचा आर्थिक वृद्धिदर ७.७% ने घटणार म्हणजे, तो उणे किंवा वजा असणार ही चांगली गोष्ट नाही. म्हणजे आर्थिकवृद्धी सुधारणे आणि ती कोरोना पूर्वस्थितीत आणणे हे मोठे आव्हान देशापुढे आहे. शेती वगळता उद्योग आणि सेवाक्षेत्रात वृद्धी उणे राहिली असून, शेतीचे योगदान अल्प आणि मर्यादितच आहे. म्हणजेच शेतीची प्रगती करण्याबरोबरच उद्योग, वस्तू निर्माण आणि सेवाक्षेत्राचा विकास सुधारणे आणि गतिमान करण्याचे मोठे आव्हान आहे. आपणास ५ ट्रिलियन अमेरिकन डॉलरची अर्थव्यवस्था निर्माण करण्यासाठी किमान दोन अंकी वृद्धिदर साध्य करणे आवश्यक आहे. हा वृद्धिदर २०२१-२२ मध्ये ११% राहील असा सरकारचा अंदाज आहे, मात्र ते एक स्वप्नवत वाटते. टाळेबंदीमुळे मोठ्या प्रमाणात रोजगार निर्मिती घटून बेकारीचा दर २३% राहून तो हळूहळू घटत असला, तरी त्यावर नियंत्रण ठेवण्यात यश आले नाही. डिसेंबर २०२० मध्ये कमी झालेला बेरोजगारी दर वाढण्यास आणि सहभाग दर कमी होण्यास मदत झाली आहे. त्यामुळे स्त्री-पुरुष आणि ग्रामीण शहरी हा बेकारी दर वाढत असल्याचे दिसते. त्यामुळे गरीब लोकांची आणि बेकार कामगारांची संख्या वाढत आहे. गरिबी रेषा त्रोटक आणि अपुरी असतानाही कोटीच्या संख्येत असलेले गरीब या महामारीच्या काळात त्यात अनेक लाखांची भर पडली. टाळेबंदीने देशाची आर्थिक वृद्धी वेगाने घटली असली, तरी श्रीमंत अधिक श्रीमंत होत असून, आर्थिक विषमता विशेष करून उत्पन्न विषमता आपल्या देशात वेगाने वाढत असल्याचे आकडे ऑक्सफम अहवालाने दिले आहेत. १% कुटुंबाकडे ७३% एकूण उत्पन्न आणि संपत्तीचा हिस्सा केंद्रित झाला असून, तो वाढतच आहे. आरोग्यक्षेत्र विशेषतः सार्वजनिक आरोग्यक्षेत्र मोठ्या प्रमाणात अपुरे पडले असून, त्याच्या मर्यादा स्पष्ट झाल्या आहेत. शिक्षणक्षेत्र कोलमडले असून, त्याचे अनेक प्रश्न निर्माण झाले आहेत. आयात निर्यातीपेक्षा अधिक कमी झाली असली, तरी व्यापार अधिक्य निर्माण करता आले नाही. या समस्या आणि आव्हाने सोडविणाऱ्या तरतुदी आणि उपाय व धोरण प्रस्तावित अंदाजपत्रकात असणे अपेक्षित आहे.

**महाराष्ट्र राज्याची वर्तमान आर्थिक-सामाजिक स्थिती आणि समस्या :**

वर्ष २०२०-२१ पूर्वअंदाजानुसार राज्याच्या अर्थव्यवस्थेत -८% वृद्धी, तर देशाच्या अर्थव्यवस्थेतही तशीच स्थिती असणार आहे. शेती आणि संलग्न व्यवसायात ११.७% वाढ अपेक्षित आहे. तर उद्योग -११.३% आणि सेवाक्षेत्र -९% चिंताजनक वृद्धी दर्शविणारे आहेत. ते चालू किमतीनुसार २६६१६२९ कोटी रुपये, तर स्थिर किमतीनुसार १९६२५३९ कोटी रुपये अपेक्षित आहे. या वर्षात राज्याचे वास्तव दरडोई उत्पन्न १८८७८४ रुपये, तर ते चालू किमतीनुसार २६६१६२९ रुपये असेल असा अंदाज आहे. त्याच्या वास्तव दरडोई उत्पन्नाची इतर राज्याशी तुलना करता देशात महाराष्ट्राचा पाचवा क्रमांक लागतो. तर हरियाणा, तेलंगणा, कर्नाटक आणि तामिळनाडू अनुक्रमे महाराष्ट्राच्या वरच्या क्रमांकावर आहेत. कोरोना संकटाचा परिणाम राज्याच्या अर्थव्यवस्थेवर झाला आहे. वर्ष २०२० मध्ये आर्थिक वृद्धिदर सर्वांचाच उणे राहणार आहे . चलनवाढीचा दर जून २०१९ ते डिसेंबर २०१९ कालावधीत ग्रामीण भागासाठी ९.४%, तर शहरी भागासाठी तो ६.३% होता.

**केंद्रीय अंदाजपत्रकात पायाभूत सुविधा सुधारणेवर भर :**

वर्ष २०२१-२२ चे केंद्रीय अंदाजपत्रक देशात पायाभूत सुविधा सुधारण्याचा प्रयत्न करणारे आहे. असे स्पष्ट दिसून येते. त्यासाठी या अंदाजपत्रकाने त्यासाठीच्या आवश्यक तरतुदी अंतर्भूत केल्या आहेत. जम्मू आणि काश्मीरमध्ये गॅस पाईपलाईन प्रकल्प हाती घेतला जाईल. शहरी गॅस वाटप केंद्रे येत्या तीन वर्षात १०० जिल्ह्यात विस्तारित केली जातील. उज्वला योजना लाभार्थीत १ कोटी नवीन लाभार्थींची वाढ केली जाईल. खाजगी क्षेत्रामार्फत मुख्य बंदरांची सेवा पुरविली जाईल. गुजरातमधील अलंग येथे ९० जहाजांचे पुनर्चक्रीकरण केले जाईल आणि ही क्षमता २०२४ पर्यंत दुप्पट करण्याचा मानस आहे. वीज ग्राहकांना वीज वितरणाचे एकापेक्षा अधिक पर्याय उपलब्ध करून दिले जातील. जलऊर्जा निर्माण कार्यासाठी मोहीम सुरू केली जाईल. द्वितीय श्रेणी शहरात स्वस्त मेट्रो सुविधा उपलब्ध करून दिली जाईल. कोची, चेन्नई, बेंगलुरू, नाशिक आणि नागपूर मेट्रोसाठी वाढीव वित्तीय तरतूद केली जाईल. २७ शहरात सुरू असलेले मेट्रो रेल्वेप्रकल्प पूर्ण केले जातील. खाजगी सरकारी सहभागातून शहरातील बस वाहतूक सेवा सुधारण्याचा प्रयत्न केला जाईल. २०३० पर्यंत नवीन राष्ट्रीय रेल्वे योजना पूर्ण केली जाईल. २०२३ पर्यंत रेल्वे विद्युतीकरण पूर्ण केले जाईल. येत्या तीन वर्षांत तीन वस्त्रोद्योग पार्क पूर्ण केले जातील. रस्ते बांधणीचा भारतमाला प्रकल्प पुढेही चालू ठेवला जाईल. मुंबई ते कन्याकुमारी रस्ते कोरीडोर आणि कोलकत्ता, आसाम राष्ट्रीय महामार्ग पूर्ण केले जातील. त्यासाठी एकूण ११८१०१ कोटी रुपयांची तरतूद प्रस्तावित आहे.

पायाभूत सेवा देशाच्या आर्थिक विकासास मदत करतात. मात्र त्याबरोबरच आर्थिक विकास व्यापक आणि गतिमान करणाऱ्या शेती, उद्योग अशा क्षेत्रांच्या विकासासाठीही अंदाजपत्रकाच्या माध्यमातून प्रयत्न करणे आवश्यक ठरते. हे अंदाजपत्रक शेतमालाच्या आधारभूत किमतीत वाढ झाली असल्याचे नमूद करते. मात्र भविष्यात अजून वाढ होणार का आणि ही व्यवस्था चालू राहणार का, याविषयी काहीच बोलत नाही. शेतकऱ्याला शेतजमीन मालकीची कागदपत्रे उपलब्ध करून दिली जातील असे सांगते. शेती आणि पूरक व्यवसायांना कर्जपुरवठा लक्ष निश्चित करते; मात्र ते शेतीला पोहचेलच असे नाही. नाबार्डला सूक्ष्मसिंचन प्रकल्प निधीत वाढ केली आहे; मात्र गरज आहे ती असे प्रकल्प विकसित होण्याची.

शेतीमाल विपणन समित्यांना पायाभूत सुविधा निर्माण करण्यासाठी निधी उपलब्ध करून दिला जाईल, असे हे अंदाजपत्रक सांगते. मात्र नवीन शेती सुधारणात या समित्या अस्तित्वात राहतील याची हमी नाही. बंदरांचा विकास करून मासेमारी विकसित करण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. आत्मनिर्भर भारत अंतर्गत १३ क्षेत्रात वस्तू निर्माण क्षेत्रात उत्पादन संबंधित प्रोत्साहन योजना राबविली जाणार आहे आणि येत्या तीन वर्षांत ७ वस्त्रोद्योग पार्क निर्माण करण्याचा मानस वगळला तर उद्योग क्षेत्राच्या विकासासाठीचा प्रयत्न या अंदाजपत्रकात दिसून येत नाही.

**केंद्रीय अंदाजपत्रकात आरोग्य क्षेत्र सुधारणेस प्राधान्य :**

कोरोना संकटाने देशाचे आरोग्यक्षेत्र प्रामुख्याने सार्वजनिक आरोग्य क्षेत्रातील उणिवा आणि त्रुटी मोठ्या प्रमाणात दाखवून दिल्या आहेत. खाजगी क्षेत्राचे प्राबल्य असलेल्या आणि सार्वजनिक क्षेत्र विकासाकडे मोठ्या प्रमाणात दुर्लक्ष झाल्याने एकूणच आरोग्यक्षेत्र सुधारण्याची तातडीची गरज निर्माण झाली आहे. त्यासाठी हे अंदाजपत्रक आत्मनिर्भर स्वास्थ्य भारत योजना प्रस्तावित करते आणि त्यासाठी ६४१८० कोटी रुपये येत्या सहा वर्षांत खर्च करणार आहे. त्यातून १७००० ग्रामीण आणि ११००० नागरी आरोग्य केंद्रांना मदत करणार आहे. पूर्वीची राष्ट्रीय आरोग्य मोहीम तशीच सुरू राहणार आहे. ६०२ जिल्ह्यात गंभीर आजार सेवा देणारे दवाखाने स्थापन केले जाणार आहेत. तसेच ११२ महत्त्वाकांक्षी जिल्ह्यात पोषण सुधारण्यासाठी पोषण अभियान २ सुरू केले जाणार आहे. शहरी भागात पाणीपुरवठा सुधारण्यासाठी येत्या पाच वर्षांत २.८७ लाख कोटी रुपये खर्च करून नागरी जल अभियान राबविले जाणार आहे. तर नागरी स्वच्छ भारत अभियान पाच वर्षांसाठी राबविले जाणार आहे. शहरी हवा प्रदूषण समस्या सोडविण्यासाठी ३२ केंद्रामार्फत २२१७ कोटी रुपये खर्च केले जाणार आहेत. तर कोविड-१९ लसीसाठी ३५००० कोटी रुपयांची तरतूद केली आहे. कोरोना काळात शिक्षणक्षेत्र पूर्ण कोलमडले असताना त्याकडे मात्र मोठ्या प्रमाणात पूर्ण दुर्लक्ष या अंदाजपत्रकात झाले आहे. १०० सैनिक शाळा आणि ७५० एकलव्य शाळा आदिवासी क्षेत्रात स्थापन करणे, लडाख येथे एक केंद्रीय विद्यापीठ स्थापन करणे, राष्ट्रीय शिक्षण धोरणांतर्गत १५००० शाळांचे सबलीकरण करणे या तरतुदी वगळता शिक्षण क्षेत्रासाठी इतर कोणत्याच तरतुदी या अंदाजपत्रकात नाहीत. बेकारीचा प्रश्न अत्यंत गंभीर असताना आणि ग्रामीण आणि शहरी, तसेच स्त्रिया आणि पुरुषातील बेकारी उच्च पातळीवर पोहचली असताना रोजगारनिर्मितीसाठी आवश्यक तरतुदी या अंदाजपत्रकात केलेल्या नाहीत. त्यामुळे वाढत असलेल्या गरिबीचा प्रश्नही दुर्लक्षित झाला आहे. आर्थिक विषमता टोकाची असताना आणि ती वाढत असताना तिच्या नियंत्रणासाठी कोणतेही उपाय या अंदाजपत्रकात नाहीत.

**महाराष्ट्र राज्य अंदाजपत्रकात आरोग्य क्षेत्र विकासास प्राधान्य :**

महाराष्ट्र राज्याच्या अंदाजपत्रकात २०२१-२२ मध्ये कोरोना महामारीचा अनुभव लक्षात घेऊन आरोग्य सुधारण्यास प्राधान्य देण्यात आले आहे. सार्वजनिक आरोग्य विभागांतर्गत आरोग्य संस्थांचे बांधकाम आणि श्रेणीवर्धन करून उत्तम आरोग्य सेवासुविधा उपलब्ध करून देण्यासाठी ७५०० कोटी रुपयांचा प्रकल्प तयार केला असून, येत्या चार वर्षांत तो पूर्ण केला जाणार आहे. राज्यातील नागरी भागातील पायाभूत सुविधा सुधारून उत्तम दर्जाच्या आरोग्यसेवा उपलब्ध करून देण्यासाठी येत्या पाच वर्षांत ५ हजार कोटी रुपये उपलब्ध करून दिले जातील. त्यातील ८०० कोटी रुपये २०२१-२२ या वर्षात दिले जातील. साथरोग

सेवा अद्यावत करण्यासाठी औंध येथील जिल्हा रुग्णालय परिसरात अद्यावत रुग्णालय स्थापन करून त्याची विभागीय आणि जिल्हा पातळीवर उपकेंद्रे टप्याटप्याने सुरू केली जातील. हृदयविकाराच्या रुग्णांना २४ तासांत अँजिओग्राफी करावी लागत असल्याने ८ मध्यवर्ती कार्डियाक काथलॅब स्थापन करण्यात येणार आहेत. विविध प्रकारच्या कर्करोगाच्या निदानासाठी तालुका पातळीवर १५० रुग्णालयांत आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्यात येतील. ज्या सरकारी रुग्णालयात आग प्रतिबंधक उपाययोजनांची कमतरता आहे, तेथे आग प्रतिबंधक उपकरणे बसविण्यात येतील. सिंधुदुर्ग, उस्मानाबाद, नाशिक, रायगड, आणि सातारा, अमरावती, परभणी येथे नवीन शासकीय वैद्यकीय महाविद्यालये स्थापन करण्यात येणार आहेत. त्यामुळे पदवी पातळीवरील १९९० आणि पदव्युत्तर स्तरावरील १००० आणि विशेष तज्ज्ञांच्या २०० जागा वाढणार आहेत. मात्र त्यासाठी सार्वजनिक, खाजगी भागीदारी तत्त्वाचा अवलंब केला जाईल. परिचर्यांची कमतरता आणि संसर्गजन्य आजारांचा वाढता फैलाव विचारात घेऊन शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांशी संलग्न ११ शासकीय परिचर्या विद्यालयांचे महाविद्यालयात रूपांतर करण्यात येणार आहे. तसेच १७ शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांना जोडून भौतिकोपचार व व्यवसायोपचार महाविद्यालयांची टप्याटप्यांने स्थापना केली जाणार आहे. वर्ष २०२१-२२ साठी कार्यक्रम खर्चासाठी सार्वजनिक आरोग्य विभागास २ हजार ९६१ कोटी रुपये नियतव्यय, अनिवार्य खर्चास ५ हजार९९४ कोटी २८ लाख ८९ हजार रुपयांची तरतूद केली आहे.

**राज्य अंदाजपत्रक शेती आणि पायाभूत सुविधा केंद्रित :**

कोरोना संकटकाळात शेती आणि संलग्न व्यवसायांनीच राज्याच्या आर्थिक वृद्धीत उल्लेखनीय योगदान दिले आहे. या अंदाजपत्रकात तीन लाखपर्यंत पीककर्ज घेऊन वेळेवर परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना खरीप हंगाम २०२१ मध्ये शून्य व्याजदराने कर्जपुरवठा केला जाईल. कृषी बाजार समित्या आवारात मूलभूत सेवा विकसित करण्यासाठी दोन हजार कोटी रुपयांची योजना घोषित करण्यात आली आहे. शेतकऱ्यांना गरजेप्रमाणे वीज जोडणी उपलब्ध करण्यासाठी महावितरण कंपनीला दरवर्षी १ हजार ५०० कोटी रुपये निधी भागभांडवल स्वरूपात देण्याची तरतूद केली आहे. शेतकऱ्यांना वीज बिलात जवळ पास ६६% पर्यंत सूट देण्यात आली आहे. 'विकेल ते पिकेल' या योजनेअंतर्गत शेतमालाच्या बाजारपेठ आणि मूल्य साखळ्यासाठी २ हजार १०० कोटी रुपये प्रकल्प आणि त्यातील शेतमालाला योग्य भाव मिळावा म्हणून १ हजार ३४५ मूल्य साखळी प्रकल्प राबविला जाणार आहे. फळ व भाजीपाला उत्पादक, लहान व सीमांत शेतकऱ्यांसाठी माग्नेट (MAGNET) अंतर्गत एक हजार कोटी रुपये प्रकल्प सहा वर्षांसाठी राबविला जाणार आहे. अमरावती जिल्ह्यात संत्रे प्रक्रिया प्रकल्प आणि औरंगाबाद जिल्ह्यात सायट्रेट प्रकल्प राबविला जाणार आहे. भाजीपाला रोपांचा पुरवठा वाढविण्यासाठी प्रत्येक तालुक्यात एक अशा एकूण ५०० रोपवाटीका स्थापन केल्या जाणार आहेत. चार कृषिविद्यापीठांना कृषिसंशोधन वाढीसाठी दरवर्षी २०० कोटी रुपयेप्रमाणे येत्या तीन वर्षात ६०० कोटी रुपये उपलब्ध करून दिले जाणार आहेत. गाय, म्हशीसाठी पक्का गोठा, कुक्कुटपालन आणि शेळीसाठी शेड आणि कम्पोस्टिंगसाठी ग्रामसमृद्धी योजना राबविली जाणार आहे. मत्स्य व्यवसाय क्षेत्रात पायाभूत सुविधा योजनाअंतर्गत निधी उपलब्ध करून दिला जाणार आहे. पुणे येथे उच्च श्रेणीची जैवसुरक्षा प्रयोगशाळा स्थापन केली जाणार आहे. वर्ष २०२१-२२ मध्ये कार्यक्रम खर्चासाठी कृषी, पशुसंवर्धन, दुग्ध आणि मत्स्य व्यवसाय विभागास ३ हजार २७४

कोटी रुपये प्रस्तावित केले आहेत. वर्ष २०२१-२२ मध्ये जलसंपदा विभागास १२ हजार ९५१ कोटी रुपये तरतूद केले आहेत.

महाराष्ट्र अंदाजपत्रकात पायाभूत सुविधा विकसित करण्याकडे लक्ष देण्यात आले आहे. नांदेड ते जालना २०० कि.मी. लांबीचे ७ हजार कोटी रुपये अंदाजित रकमेचे द्रुतगती जोड महामार्गाचे नवीन काम हाती घेण्यात येणार आहे. मुंबई-पुणे द्रुतगती मार्गाचे सुरू असलेले काम पूर्ण केले जाणार आहे. रायगड जिल्ह्यातील रेवस ते सिंधुदुर्ग जिल्ह्यातील रेड्डी अशा ५०० कि. मी. लांबीच्या सागरी महामार्गाच्या कामासाठी ९ हजार ५७३ कोटी रुपये खर्च प्रस्तावित आहेत. पुण्याबाहेरून १७० किलोमीटर लांबीच्या २६ हजार कोटी रुपयाच्या चक्राकार मार्गाचे काम हाती घेतले जाईल. रस्त्यांच्या देखभालीसाठी आवश्यक निधी उभारण्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागांतर्गत वित्तीय विकास महामंडळ स्थापन केले जाईल. ग्रामीण सडक विकास योजना अंतर्गत या वर्षात १० हजार कि. मी. लांबीची कामे हाती घेतली जातील. या विभागास या वर्षात कार्यक्रम खर्चासाठी ७ हजार ३५० कोटी रुपयांची तरतूद केली आहे. पुणे नाशिक मध्यम अति जलद रेल्वे मार्गाचे काम हाती घेतले जाणार असून, त्यासाठीचा अपेक्षित खर्च १६ हजार ३९ कोटी रुपये आहे. ठाणे शहरांतर्गत मेट्रोलाईट प्रकल्पांतर्गत ७ हजार १६५ कोटी खर्चाचा वर्तुळाकार मेट्रो प्रकल्प आणि पिंपरी, चिंचवड, निगडी, कोरीडोर क्रमांक हा ९४६ कोटी ७३ लाख रुपयाचा प्रकल्प हाती घेण्यात आले आहेत. जुन्या बसेसचे पर्यावरणपूरक सी. एन. जी. आणि विद्युतमध्ये रूपांतर केले जाणार असून, त्यासाठी १ हजार ४०० कोटी रुपये उपलब्ध करून दिले जातील.

आर्थिक वृद्धी गतिमान करण्यासाठी आणि कोरोना संकटकाळात उद्योग क्षेत्र विकासावर अधिक भर देणे आवश्यक होते, मात्र त्यासाठीच्या तरतुदी या अंदाजपत्रकात मर्यादित आहेत. मुख्यमंत्री रोजगार कार्यक्रमांतर्गत प्रतिवर्षी १ हजार ५०० कोटी गुंतवणूक होण्यासाठी प्रयत्न केला जाणार असून, एस. सी., एस. टी. आणि महिलांना प्रतिनिधित्व देऊन २५००० उद्योग घटकांना मदत केली जाणार आहे. ५४ सामंजस्य करार झाले असून, १ लाख १२ हजार ९३९ कोटी रुपये गुंतवणूक अपेक्षित असून ३ लाख रोजगार निर्माण होईल, अशी अपेक्षा आहे. थेट परकीय गुंतवणूक आणि ५० कोटी रुपये आणि त्यापेक्षा जास्त गुंतवणुकीस प्रस्तावास थेट परवानगी दिली जाईल. रायगड जिल्ह्यातील बालक ड्रग पार्क आणि ऑरिक सिटी औरंगाबाद वैद्यकीय उपकरणे पार्क प्रकल्पांना प्रोत्साहन अनुदान दिले जाणार आहे. खादी आणि ग्रामोद्योग मंडळामार्फत मध उत्पादन आणि गांधी निलयस्मृती केंद्र स्थापन करण्यास ७०कोटी रुपये निधी दिला जाणार आहे. या वर्षात उद्योग विभागास खर्चासाठी ३२१ कोटी रुपये आणि प्रोत्साहन अनुदान देण्यासाठी ३ हजार ४३५कोटी रुपयांची तरतूद केली आहे.

**केंद्रीय अंदाजपत्रकात अपेक्षित सुधारणा / दुरुस्त्या :**

कांही शेतमालाच्या किमान आधारभूत किंमतीत वाढ, शेतमाल विक्री समितींना पायाभूत सुविधा उपलब्ध करणे, १००० अधिक बाजारपेठा इ-नाम बाजार ठिकाणांना जोडणे, चेन्नई-कोची प्रदीप येथे मासेमारी केंद्रे विकसित करणे आणि तमिळनाडूत समुद्रपार्क विकसित करणे या व्यतिरिक्त शेती आणि संलग्न सेवा विकास तरतुदी नाहीत. खाजगीकरण आणि निर्गुंतवणूक माध्यामातून महसूल उभा करण्याचा सरकारचा मानस आहे. या तरतुदी आर्थिक विकास सुधारण्यास अपुऱ्या पडतील, असे दिसते. म्हणून उद्योग क्षेत्र गतिमान करण्यासाठी उद्योगस्नेही धोरण अंतर्भूत करून अल्प व्याजदर कर्जपुरवठा

वाढविण्यासाठी तरतुदी करणे आवश्यक आहेत. उद्योग क्षेत्रातील गुंतवणूक वाढविण्यासाठी योजना प्रस्तावित करावी लागेल. शेतीतील अतिरिक्त श्रम बाजूला काढून बिगरशेती क्षेत्रात सामावून घेण्यासाठी उद्योग आणि सेवाक्षेत्रातील रोजगार संधी वाढवाव्यात. त्यासाठी रोजगारपूरक धोरण निश्चित करून राबवावे लागेल. महात्मा गांधी रोजगार योजना ग्रामीण आणि शहरी अशी व्यापक आणि अधिक कार्यक्षम करावी. स्थलांतरित कामगार, शेतमजूर, औद्योगिक कामगार आणि गरिबांना जगण्यासाठी किमान आवश्यक उत्पन्न योजना जी जगभरात राबविली जाते, ती राबवून महिन्याला किमान ९००० रुपये त्यांना देऊन त्यांचे पुनर्वसन होईपर्यंत ती सुरू ठेवावी. शिक्षणक्षेत्र मोडकळीस आल्याने त्यावरील खर्च किमान जीडीपीच्या ५% तरी करावा आणि पुढे भविष्यकाळात वाढवावा. शिक्षणक्षेत्रातील खाजगीकरण थांबवून खाजगी क्षेत्रावर सरकारचे नियंत्रण आणि नियमन ठेवावे. शेतीला उद्योगाचा दर्जा देऊन शेतमालाला उत्पादन खर्चाएवढा भाव मिळण्याची व्यवस्था करावी. आयात पर्यायीकरण करून निर्यात वाढवावी आणि निर्यातबंदी उठवावी. श्रीमंत, अति श्रीमंत लोकांवर अधिक कर आकारावा आणि तो गरिबांच्या कल्याणासाठी वापरावा, त्यातून आर्थिक विषमता कमी होण्यास मदत होईल. सामाजिक वंचित गट आणि बालक व स्त्रिया यांच्या कल्याणासाठी आवश्यक अंदाजपत्रकीय तरतूद करावी आणि ती न वळविता सर्वच्या सर्व खर्च करावी. गृहबांधणीसाठी फक्त कर सवलत न देता अल्प व्याजदराने कर्जपुरवठा आणि घरबांधणी कार्यक्रम समाविष्ट करणे आवश्यक आहे.

**महाराष्ट्र अंदाजपत्रकात आवश्यक सुधारणा :**

शासकीय दवाखाने आणि आरोग्य संस्थात सर्वच कर्मचाऱ्यांची संख्या अत्यंत अपुरी आहे. तसेच आजही यातील कांही कर्मचारी कंत्राटी तत्त्वावर काम करत आहेत. या सर्व कंत्राटी कर्मचाऱ्यांना नियमित आणि कायम करावे, त्यांना संप करण्याची वेळ येऊ देऊ नये, उपलब्ध उपकरणे आधुनिक आणि अद्यावत करण्याबरोबरच नवीन उपकरणांची भर या संस्थांमध्ये टाकावी. सर्व सरकारी आरोग्यसेवा मोफत करावी. ज्यांची आर्थिक कुवत आहे त्यांना अल्पकिमतीने या सेवांचा पुरवठा करणे आवश्यक आहे. येत्या वर्षात अपेक्षित महसुलाचा अंदाज अधिक विश्वसनीय आणि पक्का असेल याची काळजी घ्यावी आणि महसूल वृद्धीसाठी प्रयत्न करावा. सामाजिक कल्याण आणि न्याय विभागातील क्षेत्रे आणि उपक्रम यांना जेवढा खर्च दिला आहे तेवढा सर्व खर्च करावा. उच्च शिक्षणातील खाजगीकरण कमी करावे, खाजगी क्षेत्राचे नियमन सरकारने करावे आणि तासिका तत्त्वावर शिक्षकही पद्धत बंद करून महाविद्यालये आणि विद्यापीठातील पूर्णवेळ आणि नियमित शिक्षक भरती करावी. रोजगारपूरक विकास धोरण निश्चित करून राबवावे त्यामुळे बेकारी, गरिबी आणि विषमता कमी होण्यास मदत होईल. राष्ट्रीय शिक्षण धोरण भेदजन्य आणि वंचितता वाढविणारे असल्याने ते स्वीकारू नये. आर्थिक विषमता कमी करणारे धोरण आणि उपाय राबवावेत. स्वतंत्र उद्योग धोरण तयार करून त्याची अंमलबजावणी करावी. ज्यामुळे मोठे, मध्यम आणि लघु उद्योगांचा विकास होईल. महात्मा गांधी रोजगार हमी योजना अधिक व्यापक करून ती ग्रामीण आणि शहरी भागात व शेती, उद्योग क्षेत्रास सहाय्यभूत म्हणून राबवावी.

**समारोप :**

सार्वजनिक अंदाजपत्रक हे देशाच्या आर्थिक आणि सामाजिक विकासाचे आणि मानवी व सामाजिक कल्याणाचे प्रमुख साधन असते. अर्थव्यवस्थेच्या विकास धोरणाचे ते एक अत्यंत महत्त्वाचे अंग असते. त्यामुळे अंदाजपत्रकाच्या

कालावधीतील आर्थिक, सामाजिक विकास सुधारणे आणि गतिमान करणे आवश्यक असते. ते साध्य झाले तरच ते अंदाजपत्रक यशस्वी झाले असे समजावे. अर्थात, हे सर्व एका दमात शक्य नसले तरी ते एका विशिष्ट कालावधीत साध्य व्हावे, अशी किमान अपेक्षा असते. देशातील केंद्र सरकारचे आणि महाराष्ट्र राज्य सरकारच्या वर्ष २०२१-२२ च्या अंदाजपत्रकाचे तटस्थपणे, सखोल आणि व्यापक मूल्यमापन केल्यास असे दिसून येते की, सार्वजनिक अंदाजपत्रक सामाजिक आणि आर्थिक विकासाचे प्रभावी आणि खात्रीचे साधन असते हे उद्दिष्ट आणि तत्त्वज्ञान धोरणकर्त्यांमध्ये पोहचले नाही. एक तात्कालिक साधन नि उपाय या दृष्टिकोनातूनच आजतरी अंदाजपत्राकडे पहिले जाते असे दिसते. अंदाजपत्रकीय उद्दिष्टचे साध्य करण्यासाठीचे कालनियोजन करणे आवश्यक आहे, ते करण्यात आलेले नाही. केंद्र सरकार आणि राज्य सरकारे आणि त्यांची अंदाजपत्रके यांच्यात समन्वय अत्यावश्यक असतो, तो निर्माण करणे आवश्यक आहे.

**संदर्भ :**


१. Daily Economic Times Various Issues in February and March 2021.
२. Daily LoksattaVarious Issues in February and March 2021.
३. Economic and Political Weekly VariousIssues in February and March 2021.
४. Government of Maharashtra (2021-22), Budgetary Documents, Mumbai.
५. Government of Maharashtra (2021-22), Civil Budget Estimates, Mumbai
६. Government of Maharashtra (2021-22), Economic Survey, DES, Mumbai.
७. Government of India (2021), Budgetary Documents 2021-22, Ministry of Finance, New Delhi.
८. Government of India (2021), Economic Survey 2020-21, Ministry of Finance, New Delhi.
९. Herber, B. P. (1967), Modern Public Finance, Richard D. Irwin, Homewood.
१०. Jha, R. (1998), Modern Public Economics, Routledge, London.
११. Lekhi, R.K (2020) , Public Finance , Kalyani Publishers , Ludhiana.
१२. Mundell, S. (1999), Public Finance Policy: Issues for India, Oxford University Press, New Delhi.
१३. Musgrave, R. A. (1959), The Theory of Public Finance, McGraw Hill, Kogakhusa, Tokyo.
१४. Musgrave, R. A. and P. B. Musgrave (1976), Public Finance in Theory and Practice, McGraw Hill, Kogakusha, Tokyo.
१५. Shoup, C. S. (1970), Public Finance, Aldine, Chicago.
१६. Sreekantaradhya, B. S. (1972), Public Debt and Economic Development in India, New Delhi.
१७. Tyagi, B. P. (2020), Public Finance, Jai Prakash Nath Company, Meerut, UP.


◆

---

उच्च शिक्षण ही सामाजिक आणि आर्थिक हालचालीचा वेग
वाढविण्यासाठीची सर्वात मजबूत आणि सर्वात कठीण शिडी आहे.

**- ड्यू फॉस्ट**

---

# महाराष्ट्राच्या कृषी स्मशानाची राजकीय अर्थव्यवस्था : विदर्भ व मराठवाड्यातील सर्वाधिक शेतकरी आत्महत्याग्रस्त दोन जिल्ह्यांचा जनगणना अभ्यास (जानेवारी २०१४ - डिसेंबर २०१७)

**ज्ञानदेव तळुले** †

**प्राक्कथन :**

प्रस्तुत शोधनिबंधाचे मराठवाडा व विदर्भातील अठरा जिल्ह्यातील जानेवारी २००१ ते जुलै २०१८ पर्यंतच्या शेतकरी आत्महत्याविषयक द्वितीय माहितीवर आधारित अनुक्रमे अर्थसंवाद (खंड XXXXII, अंक IV, पृष्ठ ३२७-३५२) आणि इकॉनॉमिक ॲण्ड पॉलिटिकल विकली (खंड LV, अंक XXV, पृष्ठ ११६-१२५) असे दोन पूर्वागुंलीनिर्देश यापूर्वी प्रकाशित झालेले आहेत. प्रस्तुत शोधनिबंध मराठवाडा व विदर्भातील जानेवारी २०१४ ते डिसेंबर २०१८ या चार वर्षांच्या काळात सर्वाधिक शेतकरी आत्महत्या झालेल्या विदर्भ (यवतमाळ) व मराठवाड्यातील (उस्मानाबाद) प्रत्येकी एका जिल्ह्याच्या जनगणना सर्वेक्षणावर बेतला आहे. शोधनिबंध प्रामुख्याने शेतकरी आत्महत्याग्रस्त कुटुंबांच्या प्राथमिक सर्वेक्षणावर बेतला असून, याद्वारे मराठवाडा व विदर्भातील सर्वाधिक शेतकरी आत्महत्याग्रस्त कुटुंबांच्या आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक व मानसिक परिस्थितीवर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न करत आहे. जानेवारी २०१४ ते डिसेंबर २०१७ दरम्यानच्या काळात या दोन्हीही जिल्ह्यांमध्ये सर्वाधिक शेतकरी आत्महत्या घडून आल्या होत्या. अर्थात त्या अद्यापही सुरू आहेत. इतकेच नव्हे; तर या जिल्ह्यांतील शेतकरी आत्महत्यांमध्ये या काळात सातत्याने वाढ होत असल्याचेही दिसून आले आहे. महाराष्ट्रातील इतर जिल्ह्यांतही गेल्या चार दशकांहून अधिक काळ शेतकरी आत्महत्या होत असल्या तरी विदर्भ व मराठवाड्यातील आत्महत्यांची संख्या अधिक आहे. उस्मानाबाद आणि यवतमाळ हे दोन्ही जिल्हे शेतकरी आत्महत्यांच्या संख्येत तुलनात्मकदृष्ट्या सतत आघाडीवर असल्याचा अनुभव आहे.

शेतकरी आत्महत्यांच्या बाबतीत पश्चिम विदर्भातील यवतमाळ जिल्हा तर संपूर्ण देशपातळीवर सातत्याने उच्चांकावर असल्याचेच दिसून आले आहे. विरोधाभासी वास्तव म्हणजे जेव्हा देशातील इतर राज्यांत शेतकरी आत्महत्यांची संख्या घटत होती तेव्हा महाराष्ट्राच्या या दोन्हीही जिल्ह्यांत आत्महत्या वाढत होत्या. प्रस्तुत शोधनिबंधाचा प्रमुख उद्देश विदर्भ व मराठवाड्यातील शेतकरी आत्महत्या प्रामुख्याने कृषी वित्त समस्या आणि न्यून कृषी उत्पादनक्षमता

† प्राध्यापक व विभागप्रमुख, अर्थशास्त्र अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर-४१६००४.
आजीव सभासद क्र. ८१७, भ्रमणध्वनी :९४२३७५०५५५, ई-मेल : dnyanshrinit@gmail.com


निर्मित कास्तकारीच्या आतबट्ट्यामुळे होत आहेत काय हे तपासणे असाच आहे. शोधनिबंध आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या कर्जबाजारीपणातील संस्थात्मक व असंस्थात्मक वित्तीय मार्गांचे तुलनात्मक प्राबल्य आणि कर्जबाजारीपणाच्या कारणांचाही मागोवा घेण्याचा प्रयत्न करत आहे. याकरिता निवडलेल्या जिल्ह्यांच्या माध्यमातून प्रस्तुत अभ्यासात विदर्भ आणि मराठवाड्यातील कर्जबाजारीपणाची कारणेही तपासण्याचा प्रयत्न केला आहे. जानेवारी २००१ ते जुलै २०१८ या काळात उस्मानाबाद आणि यवतमाळ जिल्ह्यात अनुक्रमे ८२४ आणि ४०५६ शेतकरी आत्महत्या झाल्या होत्या. परंतु यापैकी कमीत कमी आत्महत्यांचाच समावेश पात्र शेतकरी आत्महत्यांमध्ये कसा होईल याकडेच प्रशासनाने अधिक लक्ष दिले (ज्ञानदेव तळुले; २०१९ व २०२०). याची प्रमुख कारणे आत्महत्याग्रस्त कुटुंबास द्यावयाचे एक लक्ष रुपये सानुग्रह अनुदान आणि महाराष्ट्रातील शेतकरी आत्महत्यांची आकडेवारी कमी करणे अशी होती. प्रस्तुत जनगणना अभ्यासकामी सर्वेक्षण केलेली सर्व आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबे विदर्भ व मराठवाड्याच्या यवतमाळ व उस्मानाबाद जिल्ह्यांच्या गावोगावी वसलेली आहेत. या दोन्हीही जिल्ह्यांत जानेवारी २०१४ ते डिसेंबर २०१७ या चार वर्षांच्या कालखंडात झालेल्या सर्व आत्महत्याग्रस्त (१५१९) कुटुंबांना प्रत्यक्ष भेटी देऊन व आवेदकांच्या मुलाखतींद्वारे शेतकरी आत्महत्याग्रस्त कुटुंबांची काळजीपूर्वक माहिती संकलित केली आहे. कारण प्रस्तुत अभ्यास महाराष्ट्रातील उपरोल्लेखित सर्वाधिक आत्महत्याग्रस्त जिल्ह्यांच्या जनगणना सर्वेक्षणावर बेतला आहे. अंतिमत: प्रस्तुत शोधनिबंध अशा अनुमानाप्रत पोहोचण्याचा प्रयत्न करतो की शेतकरी आत्महत्या या फक्त आर्थिक विवंचनानिर्मित समस्येमुळे होतात की त्या आर्थिक संत्रस्तता, कौटुंबिक व सामाजिक संघर्ष, सांस्कृतिक मागासलेपण आणि सामुदायिक व संस्थात्मक समर्थनाचा अभाव यातील क्रिया-प्रतिक्रियांचा परिणाम आहे? प्रस्तुत अभ्यासातील प्राथमिक माहिती निर्भर विश्लेषण आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबांच्या आर्थिक व सामाजिक सद्य परिस्थितीचाही अंदाज घेण्याचा प्रयत्न करते.

**प्रास्ताविक :**


भारतातील शेतकरी आत्महत्यांच्या इतिहासाची सुरुवात एकोणिसाव्या शतकापासून करावी लागते. एकोणिसाव्या शतकात प्रामुख्याने व्यापारी पिकांचे उत्पादक व प्रयोगशील शेतकरी आत्महत्येविषयी अधिक संवेदनक्षम असल्याचे उल्लेख सापडतात. त्यामुळे अधिकतम आत्महत्या मृत्यूदर व आर्थिक निराशेमुळे महाराष्ट्रातील शेतकऱ्यांनी ग्रामीण भागात सावकारांविरोधी उठाव पुकारले होते. त्या काळात अतिरिक्त जमीन महसूल दर आणि खाजगी कर्जाच्या लुबाडणुकीमुळे शेतकरीवर्गाचा आत्महत्या मृत्यूदर वाढला असल्याचे दिसून आले. १८७० च्या दशकात कृषी उत्पादकतेवरील दुष्काळाच्या परिणामस्वरूपतेची पर्वा न करता शेतकऱ्यांवरील करभार वाढवला गेला. विशेष म्हणजे शेतकऱ्यांनी सर्व करांचा भरणा रोखीने करणे बंधनकारक होते. दुष्काळ आणि कृषी उत्पादकतेतील घसरणीबरोबर सावकारांच्या जबर व्याज आकारणीस आणि जमीनदारी हक्कांस ब्रिटिशांच्या संरक्षणामुळे ग्रामीण भागातील आत्यंतिक दारिद्र्य व निराशेत कमालीची भर पडली होती. त्यामुळे १८५० ते १९४० च्या दरम्यान ब्रिटिश ग्रामीण भारतातील शेतकरी आत्महत्या मृत्यूदर सातत्याने अधिक राहिले. तथापि भूकबळी मृत्यूदराचे प्रमाण आत्महत्या मृत्यूदरापेक्षा अधिक दिसून आले. भारतीय कृषी व्यवसायाच्या स्वातंत्र्योत्तर व्यापारीकरणामुळे शेतकऱ्यांना बाजारपेठीय अनियमिततांचा सामना

करावा लागल्याने पुनश्च: आत्महत्या मृत्युदरात वृद्धी झाल्याचे निदर्शनास आले. १९६० आणि १९७० च्या दशकांत अशी प्रकरणे तामिळनाडू (गणपती आणि वेंकोबा राव; १९६६) पश्चिम बंगाल (नंदी व इतर; १९७९) आणि कर्नाटक (हेगडे; १९८३) मध्ये नोंदली गेल्याची दिसून येतात. या कालखंडात कर्नाटकातील आत्महत्या मृत्यूदर ५.७ इतका नोंदला गेला. १९९० च्या दशकात भारतातील सर्व शेतकरी आत्महत्याबहुल राज्यांत आत्महत्या मृत्युदरात अचानक उत्तेजना घडून आली. १९९० नंतरच्या काळात आंध्रप्रदेश, कर्नाटक, केरळ, महाराष्ट्र व पंजाब यासारखी तुलनेने अधिक विकसित राज्ये शेतकरी आत्महत्यांच्या केंद्रस्थानी आली. आणि याच कालखंडात महाराष्ट्रातील विदर्भ व मराठवाडा प्रांत शेतकरी आत्महत्यांमुळे सर्वाधिक प्रभावित बनले. संपूर्ण देशपातळीवर सर्वाधिक शेतकरी आत्महत्या विदर्भात घडून येऊ लागल्या. तसाच कल अद्यापपावेतो सुरू आहे. यानंतर क्रमांक लागला तो महाराष्ट्रातील मराठवाडा विभागाचा. २०१२ नंतर मराठवाड्यातील उस्मानाबाद आणि विदर्भातील यवतमाळ जिल्ह्यात सर्वाधिक शेतकरी आत्महत्या मृत्युंची नोंद झाली ती त्यामुळेच.


आलेख १: पश्चिम विदर्भ जिल्ह्यांमधील शेतकरी आत्महत्या २००१-२०२०*




आलेख १ (अ) पश्चिम विदर्भ जिल्ह्यांमधील शेतकरी आत्महत्यांचा वार्षिक वृद्धी दर २००१-२०२०**




आलेख २: पश्चिम विदर्भ जिल्ह्यांतील प्रतीदिन शेतकरी आत्महत्या २००१-२०२०***




***, ** व *** = राष्ट्रीय गुन्हे नोंद संस्थान, २०२०.**

१९९७ आणि २००५ दरम्यान भारतात प्रति ३२ मिनिटात एका शेतकरी आत्महत्येची नोंद झाली. [UNCSD / पश्चिम विदर्भासाठी सुद्धा पाहा आलेख १, १ (अ) व 2]. शेतकऱ्यांनी आत्महत्येसारख्या आत्यंतिक प्रवृत्तीचा आधार घेणे ही भयावह वर्तणूक मानवी लागेल. अखिल भारतीय पातळीवरील शेतकरी आत्महत्यांमध्ये उपरोल्लेखित राज्यांचा २००४ मधील वाटा ९०% इतका होता (राष्ट्रीय गुन्हे नोंद संस्थान / NCRB; २०२०). या राज्यांतील २०१४ मधील शेतकरी आत्महत्याविषयक आकडेवारीची तुलना करता २०१५ मध्ये त्यात ४२ टक्क्यांनी वृद्धी झाली होती. भारतात २०१४ मध्ये दररोज १५ शेतकरी आत्महत्यांची नोंद झाली. यात ७१.४२ टक्क्यांनी वाढ होऊन २०१५मध्ये दररोज २१ शेतकरी आत्महत्या घडून आल्या.

आर्थिक असहाय्यता आणि संचित कास्तकारी कर्जाचा भार ही या शेतकरी आत्महत्यांची महत्त्वाची कारणे दिसून आली. राज्यनिहाय कर्जबाजारीपणाच्या आकडेवारीवर दृष्टिक्षेप टाकल्यास प्रस्तुत परिकल्पनेस अधिक पाठबळ मिळते. २०१३ मध्ये तेलंगणातील ८९% शेतकरी कर्जबाजारी होते. यानंतर क्रमांक लागतो कर्नाटकाचा (७७%). याच काळात महाराष्ट्र, मध्यप्रदेश आणि छत्तीसगडमधील शेतकरी कर्जबाजारीपणाचे प्रमाण अनुक्रमे ५६, ४६ आणि ३७% इतके दिसून आले. भारतीय शेतकरी आत्महत्यांची प्रमुख कारणे अनुक्रमे कर्जबाजारीपणा (२६.६%), कौटुंबिक समस्या (२०.१%), नापिकी (१६.८%), आरोग्यविषयक समस्या (१३.२%) आणि व्यसनाधिनता (४.९%) अशी दिसून आली. २०१३ मध्ये सरासरी ५२% भारतीय शेतकरी कर्जबाजारीपणाच्या तणावाखाली होते (राष्ट्रीय नमुना पाहणी संघटन / NSSO; २०१३). नापिकीच्या अपयशामुळे मिळकत तुटीची व्याप्ती इतकी तीव्र होती की, शेतकऱ्यांना कौटुंबिक उदरनिर्वाहासाठी कर्ज काढणे भाग पडले. यामुळे निर्माण झालेला कर्जसापळा आणि मानसिक दु:खाच्या विपन्नावस्थेतून सुटका करून घेण्याचा आत्महत्या हा एक प्रभावी मार्ग ठरला.


**माहिती स्रोत व संकलन :**

प्रस्तुत शोधनिबंध हा एका प्रदीर्घ अभ्यासाचे उपफल असल्यामुळे जरी संबंधित अभ्यासाकरिता देश, राज्ये आणि जिल्हानिहाय मोठे आकडेवारी संच संकलित करून त्यास त्यांच्या विश्लेषणाची पार्श्वभूमी असली, तरीही प्रस्तुत शोधनिबंधाच्या संपूर्ण विश्लेषणाचा मध्यवर्ती गाभा शेतकरी आत्महत्याग्रस्त कुटुंबांच्या सर्वेक्षण संकलित प्राथमिक माहितीच्या पृथक्करणावर निर्भर आहे. त्यामुळे प्रामुख्याने प्रस्तुत शोधनिबंधाचे विश्लेषण महाराष्ट्रातील सर्वाधिक शेतकरी आत्महत्याग्रस्त उस्मानाबाद आणि यवतमाळ जिल्ह्यांच्या चार वर्षांच्या जनगणना सर्वेक्षणावर निर्भर आहे. सर्वेक्षणात जानेवारी २०१४ ते डिसेंबर २०१७ या चार वर्षांच्या काळात घडून आलेल्या दोन्ही जिल्ह्यांतील सर्व (१५१९) शेतकरी आत्महत्याग्रस्त कुटुंबांचा समावेश आहे. त्यामुळे प्रस्तुत अभ्यास हा महाराष्ट्रातील सर्वाधिक आत्महत्याग्रस्त दोन जिल्ह्यांचा जनगणना अभ्यास ठरतो. अनुक्रमे प्राथमिक माहितीचे संकलन मराठवाड्यातील उस्मानाबाद आणि विदर्भातील यवतमाळ जिल्ह्यांतून करण्यात आले आहे. प्राथमिक माहितीत प्रामुख्याने तीन पातळीवरील घटकांचा समावेश केला आहे. १) शासनाच्या एक लक्ष रुपये सानुग्रह अनुदानास प्रात्र शेतकरी आत्महत्याग्रस्त कौटुंबिक पातळीवरील माहिती, २) सानुग्रह अनुदानास अपात्र शेतकरी आत्महत्याग्रस्त कौटुंबिक पातळीवरील माहिती आणि ३) २०१४ ते


२०१७ या चार वर्षांच्या कालखंडात उपरोल्लेखित दोन्ही जिल्ह्यांतील सर्व पात्र व अपात्र शेतकरी आत्महत्याग्रस्त कुटुंबांची सामाजिक व आर्थिक माहिती. चार वर्षांच्या काळात घडून आलेल्या एकूण १५१९ शेतकरी आत्महत्याग्रस्त कुटुंबांचे प्रत्यक्ष सर्वेक्षण करून उपरोल्लेखित त्रिस्तरीय कौटुंबिक माहितीचे संकलन करण्यात आले. प्रस्तुत अभ्यास जनगणना स्वरूपाचा असल्यामुळे चार वर्षांच्या काळात झालेल्या दोन्ही जिल्ह्यांतील सर्व शेतकरी आत्महत्याग्रस्त कुटुंबांचे प्राथमिक माहिती संकलनकामी सर्वेक्षण केले आहे. जिल्हानिहाय तालुके, गावे आणि शेतकरी आत्महत्याग्रस्त कुटुंबसंख्या निम्नउर्ध्वृत आलेख ३ व ४ द्वारा अधिक स्पष्टतेने समोर येते.

यवतमाळ व उस्मानाबाद या दोन्ही जिल्ह्यांतील एकूण २२ तालुक्यांतून ११०५ गावांतील शेतकरी आत्महत्याग्रस्त कुटुंबांचे प्रस्तुत अभ्यासकामी सर्वेक्षण केले आहे. प्रस्तुत सर्वेक्षणात एकूण १५१९ शेतकरी

आलेख ३: यवतमाळ व उस्मानाबाद जिल्हयातील तालुकानिहाय सर्वेक्षित गावे व शेतकरी आत्महत्याग्रस्त कुटुबे.




आलेख ४: जनगणना सर्वेक्षणात अंतर्भूत यवतमाळ व उस्मानाबाद जिल्हानिहाय तालुके, गावे व शेतकरी आत्महत्याग्रस्त कुटुंबे.



आत्महत्याग्रस्त कुटुंबांचा समावेश आहे (आलेख ३ व ४). दोन्ही जिल्ह्यांतील शेतकरी आत्महत्यांच्या आकडेवारीचा विचार करता २०१४ ते २०१७ या काळात प्रत्यक्षात १५१९ पेक्षा अधिक शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहेत. परंतु यापैकी अनेक आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबे उदरनिर्वाहासाठी स्थलांतरित झाली असल्याने त्यांच्याशी संपर्क होऊ शकला नाही. त्यामुळे जिल्हानिहाय संबंधित गावांत उपलब्ध आत्महत्याग्रस्त सर्वेक्षित शेतकरी कुटुंबांची संख्या अनुक्रमे १०६३ (यवतमाळ) आणि ४५६ (उस्मानाबाद) अशी होती. पूर्वसंरचित प्रश्नावलीचा वापर करून मुलाखत तंत्राद्वारे प्राथमिक माहितीचे संकलन करण्यात आले. आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबांना आमच्या अन्वेषकांनी प्रत्यक्ष भेटी देऊन सामाजिक-आर्थिक आणि मानसिक संत्रस्ततेची पातळी समजून घेण्याचा प्रयत्न केला. कौटुंबिक आर्थिक माहितीत प्रामुख्याने संस्थात्मक व खाजगी कर्ज आणि थकबाकीची पातळी, उत्पन्न आणि मालमत्ता, कर्जफेडीसाठी मालमत्ता तसेच जमिनीची संत्रस्त विक्री इत्यादीविषयक बाबींचा काळजीपूर्वक समावेश करण्यात आला होता. तर आत्महत्याग्रस्त कुटुंबांच्या सामाजिक माहितीत सामाजिक बेबनाव, आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या वर्तणुकीतील बदलाचा अनुभव, सामाजिक अलगीकरण, समाजात किंवा कुटुंबातील भांडणे, कुटुंब व गावाची आत्महत्येची पार्श्वभूमी, व्यसनाधिनता इत्यादी घटकांवर लक्ष केंद्रित केले होते. आर्थिक पैलूंवरील माहितीचे संकलन तुलनेकरिता करण्यात आले. तर सामाजिक पैलूंमुळे आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबांची सामाजिक, सांस्कृतिक व मानसिक स्थिती समजण्यास मदत झाली. या सर्व पैलूंवरील संपूर्ण माहितीची गावातील वयस्क व्यक्ती, निर्वाचित प्रतिनिधी इत्यादींबरोबर अनौपचारिक चर्चा करून सत्यता तपासून प्रामाणिकीकरण करून घेतले. याव्यतिरिक्त आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या गावांच्या पायाभूत विकासविषयक माहितीचेही वेगळेपणाने संकलन करण्यात आले. प्रस्तुत माहितीच्या माध्यमातून सर्वेक्षित ११०५ गावांचा विकास निर्देशांक समजण्यास मदत झाली. गाव पातळीवरील माहितीचे संकलन पंचायत अथवा तलाठी कार्यालयामार्फत पार पाडले.

**पूर्वसूरी व परिप्रेक्ष्य :**

महत्त्वाच्या राज्यांतील शेतकरी आत्महत्यांच्या घटना असे स्पष्टपणे अधोरेखित करतात की, भारतीय कृषी क्षेत्र गेली किमान चार दशके कठीण परिस्थितीतून मार्गक्रमण करीत आहे. प्रतिकूल किंमत व्यवस्था व न्यूनतम मूल्यवर्धनामुळे कृषी अर्थव्यवस्थेत एक प्रकारचा बेबनाव निर्माण झाला आहे. त्यामुळे ग्रामीण भागातून लोक स्थलांतरित होताना दिसून येतात. प्रस्तुत संकटाचे आत्यंतिक प्रकटीकरण म्हणजे भारतीय शेतकऱ्यांच्या आत्महत्या मानावे लागेल (स्वामीनाथन एम. एस.; २००६). एकोणिसाव्या शतकातील ब्रिटिश कालखंड आणि त्यानंतरही भारतीय शेतकऱ्यांनी कर्जबाजारीपणा, रोख जमीन महसुलाची लुबाडणूक अशा अनेक संकटांचा सामना केला. परंतु त्यांनी कधीही आत्महत्येचा मार्ग अवलंबला नव्हता. कृषिक्षेत्रातील संरचनात्मक परिवर्तनामुळे जमीन धारणा पद्धतीत व पीक संरचेनत अन्नधान्य ते व्यापारी पिके असे संक्रमण घडून आले. तद्नंतरच्या उदारीकरणाच्या धोरणामुळे भारतीय शेती अकालीपणे जागतिक बाजारपेठेत ढकलली गेली. परंतु हे घडत असताना दुर्दैवाने भारतीय शेतकरी व शेतीच्या रक्षणासाठी काहीही केले गेले नाही. महाराष्ट्रात सुरू झालेली शेतकरी आत्महत्यांची साथ महाराष्ट्र व केरळातून उत्तरेकडील पंजाब व तेथून दक्षिणेकडील कर्नाटक व

आंध्रप्रदेश अशी पसरत गेली. विशेष म्हणजे ही सर्व राज्ये त्यांच्या विकासाभिमुख परिप्रेक्ष्याकरिता प्रसिद्ध आहेत.

१९९१ नंतरची आर्थिक धोरणे कर्नाटकातील कृषी संत्रस्ततेची प्रमुख कारणे बनली (मुझफ्फर आस्सादी; १९९७). कृषी बाजारातील अपूर्णतेमुळे उत्तर कर्नाटकातील शेतकऱ्यांसमोरील संकटाने त्यांना आत्महत्येस प्रवृत्त केले (ई. रेवथी; १९९९). जेव्हा केरळातील शेतकऱ्यांनी आत्महत्या करण्यास सुरुवात केली तेव्हा राज्य सरकारने त्यावरील अभ्यासांची मालिकाच सुरू करून त्याअंती सुचविलेल्या उपायांची कठोर अंमलबजावणी करून शेतकरी आत्महत्येची समस्या सोडविण्याचा प्रयत्न केला. परिणामस्वरूपत: केरळातील शेतकरी आत्महत्यांमध्ये कमालीची घट झाली. २००४ मध्ये मुंबई उच्च न्यायालयाने सहा महिन्यात महाराष्ट्रातील शेतकरी आत्महत्यांवर तपशिलवार अहवाल सादर करण्याचे राज्य सरकारला आदेश दिले. परिणामत: राज्य सरकारने टाटा सामाजिकशास्त्र संस्था व इंदिरा गांधी इन्स्टिट्यूट ऑफ डेव्हलपमेंट रिसर्च या दोन संस्थावर ही जबाबदारी सोपविली. अभ्यासाअंती विदर्भ व मराठवाड्यातील कर्जबाजारीपणा निर्मित कृषी संकट हे शेतकरी आत्महत्यांचे प्रमुख कारण असल्याचे निदर्शनास आले (IGIDR; 2004dTISS; 2004). अपर्याप्त सिंचन सुविधा व संस्थात्मक पाठिंब्याचा अभाव आणि चुकीच्या आर्थिक धोरणामुळे कृषिक्षेत्राची हेळसांड ही महाराष्ट्रातील कृषी संकटाची प्रमुख कारणे होती (स्वामीनाथन एम. एस.; २००४). अर्थात प्रत्येक राज्याच्या कृषिक्षेत्राची लक्षणे विभिन्न आहेत. कर्जबाजारीपणा हे जरी शेतकरी आत्महत्यांचे प्रमुख कारण असले, तरी राज्यनिहाय इतर अनेक कारणेही निदर्शनास येतात. महाराष्ट्रात जेव्हा अपर्याप्त सिंचन सुविधा, औपचारिक वित्तपुरवठ्यातील घसरण आणि किंमत अस्थिरता इत्यादींमुळे शेतकरी विवंचना वाढत होती तेव्हा केरळातील शेतकऱ्यांपुढे स्पर्धाभक्षी अमेरिकी शेतकऱ्यांचे प्राबल्य असलेल्या अनिश्चित आंतरराष्ट्रीय बाजारपेठेचे आव्हान उभे होते. आंध्रप्रदेश, कर्नाटक, केरळ, महाराष्ट्र आणि पंजाबमधील एकूणच सरकारचे दुर्लक्ष, बाजारपेठीय अनिश्चितता, उत्पादकेतेतील घट, अनौपचारिक कर्जातील वाढ, अतिरिक्त व्याजदर, असमायोजित पीकपद्धती आणि जमीन महसुलामुळे कृषी संत्रस्ततेत कमालीची भर पडली (मुझफ्फर अस्सादी; १९९८). ज्या काळात वारंगल जिल्ह्यातील कृषी आदान किमती ४००% वाढल्या त्याच काळातील उत्पादन किमतीतील वृद्धी ६२% इतकी मर्यादित राहिली. अशा प्रकारच्या कृषी आदान-प्रदान किंमत तफावतीमुळे शेतकरी संत्रस्त होते (जी. पार्थसारथी आणि शमिम; १९९८). वातावरणीय, आर्थिक आणि सामाजिक समस्यांवरील दुर्लक्षामुळे कर्नाटकातील बिदर जिल्ह्यात शेतकरी आत्महत्या वाढल्या (मुझफ्फर अस्सादी; १९९८ आणि ए. आर. वसावी; १९९९). पंजाबमधील अमेरिकन बोंडआळीचा प्रादुर्भाव आणि भूगर्भ जलपातळीतील घसरणीच्या समस्येमुळे अनेक शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या (जी. के. ग्रोवर, संजय कुमार आणि कर्नल वरदा; २००२). कर्नाटकात सावकारांनी कर्ज वसुलीकामी जबरदस्तीने जमिनी बळकावल्या. अशा प्रकारचा सक्तीचा संपत्ती त्याग आणि मानहानीमुळे तेथील शेतकऱ्यांवर कमालीचा मानसिक ताण येऊन त्याचे रूपांतर शेतकरी आत्महत्यांमध्ये झाले (आर. एस. देशपांडे; २००२). १९९० नंतरच्या आर्थिक सुधारणा निर्मित सामाजिक-मानसिक संत्रस्ततेचा आंध्रप्रदेशच्या कृषी अर्थव्यवस्थेवर दूरगामी परिणाम होऊन शेतकरी

आत्महत्यांच्या प्रकरणांत कमालीची वाढ झाली (जी सत्यनारायना, एम. व्ही. राघवूलू आणि राम मोहन; २००३). अतिरिक्त पाणी धारण होऊन जमिनी नापीक झाल्याने आर्थिकदृष्ट्या त्रस्त झालेल्या हरियाणातील रोहतक, सिरसा व जिंद जिल्ह्यांत अनेक शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या (एस. आर. अहलुवालिया; २००३) असे निदर्शनास आले. एकंदरीत काय तर देशातील सर्व शेतकरी आत्महत्याग्रस्त राज्यांतील शेतकरी आत्महत्यांची कारणे विविध स्वरूपाची असली तरीही ती सर्व कृषी संत्रस्ततेतून निर्माण झाली आहेत हे निश्चित.

**जनणगना सर्वेक्षण प्राप्त आकडेवारीचे पृथक्करण आणि विश्लेषण :**


यापूर्वीच उल्लेख केल्याप्रमाणे प्रस्तुत शोधनिबंधाचे संपूर्ण विश्लेषण प्रामुख्याने मराठवाडा व विदर्भातील अनुक्रमे उस्मानाबाद आणि यवतमाळ जिल्ह्यातील २०१४ ते २०१७ दरम्यानच्या शेतकरी आत्महत्याग्रस्त कुटुंबांच्या प्राथमिक सर्वेक्षणवर बेतले आहे. अर्थात, या कालखंडात दोन्हीही जिल्ह्यातील शेतकरी आत्महत्यांची संख्या संपूर्ण महाराष्ट्रात सर्वाधिक होती. आणि यवतमाळ जिल्हा देशपातळीवर सर्वाधिक शेतकरी आत्महत्यांची आकडेवारी नोंदवित होता. २००८ च्या कर्जमाफीनंतर २०१२ व २०१४ मध्ये मराठवाडा आणि विदर्भातील शेतकरी आत्महत्या पुन्हा वाढल्या. त्यामुळे प्रस्तुत अभ्यासाचा कालावधी २०१४ ते २०१७ असा निवडला आहे. कारण प्राथमिक सर्वेक्षणाचे काम जुलै २०१८ मध्ये सुरू होऊन जून २०२० मध्ये पूर्ण करण्यात आले. त्यामुळे निम्नउर्ध्वृत प्राथमिक माहितीचे विश्लेषण या दोन जिल्ह्यांमधील शेतकरी आत्महत्याग्रस्त कुटुंबाच्या सखोल जनगणना सर्वेक्षणावर बेतले असून त्यास प्राथमिक सत्यतेचा आधार आहे.

**शेतकरी आत्महत्याबाधित सर्वेक्षित गावांचा पायाभूत सुविधांविषयक लेखाजोखा :**

एकूण सर्वेक्षित ११०५ पैकी ७४८ (६७.६५ टक्के) शेतकरी आत्महत्या बाधित गावांची लोकसंख्या २००० पेक्षा कमी आहे. यापैकी बहुतांश गावांमध्ये पक्का रस्ता (१०.७३%), बस सेवा (३५.४८%), दूरध्वनी व पोस्टाची सेवा (अनुक्रमे १०.६५ व ५९.९७%), बँक शाखा व पोलीस ठाणे (अनुक्रमे ७८.११ व ९३.२९%), कृषी सेवा केंद्र (६८.०७%) समाजसेवी संस्था (८७.४९ टक्के), खाजगी व सरकारी आरोग्य सेवा (अनुक्रमे ७३.४०% व ७३.९३%), कृषी उत्पन्न बाजार समिती (९२.६३%), शेतकरी मंडळ (६५.५०%) आणि शैक्षणिक प्राथमिक (१२.७७%), माध्यमिक (६८.९९%), उच्च माध्यमिक (९१.२४%) व उच्च शिक्षण (९४.४०%) यासारख्या मूलभूत पायाभूत सुविधा उपलब्ध नाहीत. काही गावांना स्थानिक पातळीवर खाजगी व सरकारी आरोग्य सुविधा उपलब्ध आहेत (अनुक्रमे २६.६०% व २६.०७%). परंतु त्यांचे प्रमाण अत्यल्प असल्याचे दिसून आले. त्यामुळे विष प्राशन करून आत्महत्येचा प्रयत्न केल्यास अशा आणीबाणीच्या प्रसंगी बाधिताचा जीव वाचविणे अत्यंत जिकिरीचे काम आहे. कारण किटकनाशकाचे सेवन करून आत्महत्येचा प्रयत्न करणाऱ्याचे प्राण वाचविण्यासाठी तात्काळ वैद्यकीय मदतीची आवश्यकता असते.

सर्वेक्षित गावांमधील सार्वजनिक पायाभूत सुविधा अत्यंत कमकुवत आहेत. दोन तृतीयांशपेक्षा जास्त (८३.००%) गावांना कोणत्याही प्रकारची सरकारनिर्मित पाणीपुरवठ्याची सुविधा उपलब्ध नाही. ज्यामुळे या शेतकऱ्यांचा कास्तकारीतील आत्मविश्वास बळकट होऊ शकला असता. अनुक्रमे ७७.०२, ७७.०९, ८१.९६, ९१.६६ आणि ९७.७७% गावांत

आलेख ५: उपलब्ध पायाभूत सुविधांनुसार सर्वेक्षित आत्महत्याग्रस्त गावांचे विवरण




**संदर्भ:** क्षेत्र सर्वेक्षण

पाझर तलाव, नाला बंडीग, कोल्हापूर बंधारा, सिंचन धरण प्रकल्प किंवा पाटपाण्याच्या सुविधा उपलब्ध नाहीत. पर्यायाने या सर्व गावांतील शेतकऱ्यांची शेती अनियमित पावसावर अवलंबून आहे. पीक पद्धतीत कापसाचे प्राबल्य आणि या पिकाची उत्पादकता जलनिर्भर असल्याने कोरडवाहू शेती लागवडीतून या शेतकऱ्यांना किंचितसा नफा मिळविणेही महत्प्रयासाचे ठरते. सर्वेक्षित गावांतील नागरिकांना प्राथमिक कृषी वित्त सेवा संस्था (८१४/७३.६७%), सहकारी बँक शाखा (९७५/८८.२२%), सहकारी पतसंस्था (९८४/८९.०७%) आणि सहकारी दूध संस्था (९६४/८७.२३%) यासारख्या वित्तीय सेवा किंवा उत्पादन विक्री सुविधाही उपलब्ध नाहीत. सर्वेक्षित गावांमध्ये दुग्ध व्यवसाय किंवा कुक्कुटपालनासारख्या कृषी संलग्न व्यवसायांचे सर्वदूर अस्तित्व नसल्याचे दिसून आले.

**आत्महत्याबाधित शेतकऱ्यांचे जात वर्गीकरण :**

महाराष्ट्रातील व्यवसाय संरचना निश्चितीत जातीसंस्थेची भूमिका महत्त्वाची आहे. महाराष्ट्राच्या कृषी समुदायात प्रामुख्याने मराठा, कुणबी, माळी, धनगर इत्यादी समुदायांचा समावेश होतो. तर विदर्भात यामध्ये पेरकी, तेली, कुणबी, मराठा, परदेशी भामटा, परीट इत्यादी जाती येतात. आंध्रप्रदेशातील रेड्डी आणि काम्मा व पंजाब आणि हरियाणातील शेतकरी समुदायात प्रामुख्याने जाटांचा भरणा असल्याचे दिसून येते. त्यामुळे जर एखाद्या राज्याच्या कृषिक्षेत्रात

संत्रस्तता निर्माण झाली तर त्या राज्यातील कृषी समुदायांत परिणामस्वरूप औदासिन्य येणे साहजिक असते. त्यामुळे मराठवाडा व विदर्भातील शेतकरी आत्महत्याग्रस्त कुटुंबात मराठा, कुणबी, माळी, बंजारा, तेली, पेरकी इत्यादी जातींचा समावेश असल्याचे निदर्शनास येते. यवतमाळ व उस्मानाबाद या दोन्हीही जिल्ह्यांमधील सर्व गावांमध्ये शेतकरी आत्महत्यांची समस्या एकसारखेपणाने सर्व शेतकरी जातींमध्ये पसरलेली दिसून येते. जिल्हानिहाय शेतकरी आत्महत्यांची संख्या व याद्या औरंगाबाद, अमरावती व नागपूर विभागीय आयुक्तालयातून प्राप्त केल्या होत्या. यापैकी अधिकतम शेतकरी आत्महत्या विभक्त कुटुंबात (१०२४/६७.४१%) घडून आल्या आहेत. विशेष बाब म्हणजे कुणबी (१३१), माळी (९३), मराठा (३५१), बौद्ध (६९), ब्राह्मण (०२), चांभार (०६) आणि धोबी (०६) अशा एकूण ७५७ (४९.८४%) आत्महत्या वगळता उर्वरित ६६१ (४५.५४%) शेतकरी आत्महत्या विविध आदिवासी जमातीच्या कुटुंबातून झाल्याचे दिसून येते. पारंपारिकदृष्ट्या विचार केला तर आदिवासी समाजाला कास्तकारीचा अनुभव नाही. त्यामुळे सातत्यपूर्ण कृषी संत्रस्ततेच्या काळात शेती करणे व टिकाव धरणे उस्मानाबाद व यवतमाळ जिल्ह्यांतील आदिवासी समाजास कठीण जाते असे दिसून आले. त्यामुळे या दोन्हीही सर्वेक्षित जिल्ह्यांमधील कार्यकारी लोकसंख्येत आदिवासी युवकांचे प्रमाण अधिक असल्याने या समाजातून अधिक प्रमाणात शेतकरी आत्महत्या घडून आल्याचे निष्पन्न झाले. प्रकर्षाने यवतमाळ जिल्ह्याचा अनुभव असा आहे. कारण तुलनेने या जिल्ह्यात अधिक आदिवासी समाजाचे लोक शेतीवर निर्भर आहेत.


अधिकतम आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबे लघु व सीमांत जमीनधारक आहेत. हा सातत्यपूर्ण कृषी विभाजन व तुकडीकरणाचा पुरावा मानला जाऊ शकतो. फक्त १२३ (०८.१०%) आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबे स्वत:च्या कौटुंबिक गुंतवणुकीतून पाणीपुरवठ्याच्या सुविधा निर्माण करू शकले. उर्वरित सर्व १३९६ (९१.९०%) आत्महत्याग्रस्त कुटुंबाची कृषी लागवड पावसाच्या लहरीपणावर अवलंबून आहे. सर्वेक्षित दोन्ही जिल्हे महाराष्ट्राच्या जलदुर्भिक्ष पट्ट्यात येतात. जिरायत पट्ट्यातील कास्तकारीमुळे आत्महत्याग्रस्त कुटुंबांना शेतीलागवडीतून निव्वळ ऋण मिळकतीचा सामना करावा लागतो. आत्महत्याग्रस्तांची कापूस, तूर, सोयाबीनसारखी जिरायत पिके बागायती पट्ट्यातील उत्पादनक्षमतेच्या पातळीपर्यंत पोहचू शकत नाहीत. परंतु उत्पादन व्यय मूल्य मात्र अधिक उत्पादकतेच्या बागायती पट्ट्याइतकेच आहे.

**आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबाची जमीन भाडेपट्ट्याने देणे व घेणे :**


स्थलांतर, विभाजन व तुकडीकरणामुळे गैरहजेरी जमीनदारी (Absentee Landlordism) पद्धती निर्माण झाली. यातूनच पुढे जमीन भाडेपट्टा बाजाराची निर्मिती झाली. पंजाबमधील ग्रामीण शहरी व परदेशी स्थलांतरामुळे कृषी जमीन भाडेपट्टा बाजार अधिक जोरकसपणे प्रचलित असल्याचे दिसून येते. महाराष्ट्रात याचा अंतिम परिणाम आत्महत्याग्रस्त कुटुंबाकडून जमिनी भाडेपट्ट्याने देणे व घेणे सुरू झाले. व्यवहार्यदृष्ट्या कास्तकारी किफायतशीर होण्यासाठी सर्वेक्षित दोन्हीही जिल्ह्यांत जमीन भाडेतत्त्वाचा आधार घेतला जात असल्याचे दिसून आले. कारण आर्थिकदृष्ट्या अत्यल्प जमीनधारणेवरील कास्तकारी किफायतशीर असूच शकत नाही.

तुकडीकरण व विभाजनामुळे आत्महत्याग्रस्त

आलेख ६: आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांचे जातनिहाय वर्गीकरण




आलेख ७: आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबांची जमिनधारणा (टक्के)




**संदर्भ:** क्षेत्र सर्वेक्षण

शेतकरी कुटुंबांच्या जमिनी आधुनिक यंत्रसामग्री व तंत्रज्ञानाच्या वापराकरिता व्यवहार्य व पर्याप्त राहिल्या नाहीत. जमीन भाडेपट्टा पद्धती प्रामुख्याने उत्पादन व्यय व परतावा मूल्य सामायीकरण पद्धतीवर आधारित असल्याचे दिसून आले. काही कुटुंबाच्या बाबतीत वार्षिक जमीन खंड निश्चित केला जातो. सर्वेक्षित गावांमध्ये जमीन खंडाचा दर एकरी ३००० ते ८००० रुपये इतका आहे. निश्चित केलेल्या दराप्रमाणे जमीन मालकाला वर्षाकाठी खंड मिळतो. खंडाचे दर प्रामुख्याने मृदा प्रकार, उत्पादकता व जमीनदाराने पाईपलाईन, विहीर, पंपसेट इत्यादी प्रकारच्या पाणीपुरवठा संसाधनांवरील गुंतवणुकीवर निर्भर असतात. उत्पादनातील समान हिश्श्यावर आधारित भाडेपट्टा पद्धतीस अधिक प्राधान्य दिसून येते. कारण या पद्धतीत जमीनदार व भाडेकरू यांच्यात उत्पादन व्यय व लाभ मूल्याचे समान वाटप होत असते. अकिफायतशीर जमीनधारणेतून होणारे तोटे दूर करण्यासाठी आत्महत्याग्रस्त कुटुंबाकडून जमीन भाड्याने देणे व घेण्याचा अवलंब केला जातो. परंतु यामुळेही त्यांचा धोका संपूर्णपणे टळत नाहीच. कारण जमीनदार व भाडेकरू अशा दोन्ही प्रकारच्या शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्याची अनेक उदाहरणे आहेत. जमीन भाडेकरू शेतकऱ्यांकडे जमिनीची कायदेशीर मालकी नसल्यामुळे वास्तवात शेतकरी असूनही अशा शेतकऱ्यांच्या आत्महत्या अपात्र म्हणून घोषित केल्या जातात. त्यामुळे अशी आत्महत्यापश्चात कुटुंबे राज्य सानुग्रह अनुदानापासून वंचित राहतात. भाडेपट्ट्याने जमिनी घेणाऱ्या शेतकऱ्यांची सामाजिक-

आलेख ८: आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबांनी भाडेपट्ट्याने घेतलेली व दिलेली जमिन (टक्के)




**संदर्भ:** क्षेत्र सर्वेक्षण

आर्थिक परिस्थिती गावातील इतर शेतकऱ्यांशी एकसंघच असते. त्यामुळे कास्तकारीतील आतबट्ट्यामुळे त्यांची आत्महत्येच्या सापळ्यातून मुक्तता होणे शक्य नाही. जमीन खंड व उत्पादन व्यय असा दुहेरी भार असल्यामुळे त्यांना अधिक तोटा सहन करावा लागतो.

**आत्महत्याग्रस्तांचे पीक संयोजन :**

तूर व सोयाबीन व्यतिरिक्त अर्ध्याहून अधिक (८३२/५४.७७%) आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबांच्या पीक संरचनेत कापूस पिकाचे प्राबल्य आहे. परंतु कापूस लागवडीसाठी किटकनाशके व रासायनिक खतांसारख्या महागड्या आदानांची अतिरिक्त आवश्यकता भासते. अधिकतम आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबे लहान व सीमांत कास्तकार असल्याने त्यांच्या न्यूनतम क्रयशक्तीमुळे ते ही आदाने उधारीवर खरेदी करतात. या शेतकऱ्यांची पीक संरचना एक पीक प्राबल्य स्वरूपाची आहे. अशाच प्रकारची पीक संरचना अनेक वर्षे अंमलात आणली जात असून, त्यात कापसासारख्या व्यापारी पिकाचे मोठ्या प्रमाणात प्राबल्य आहे. अशा पीक संरचनेस आवश्यक महागड्या आदानामुळे त्यांची कास्तकारी आतबट्ट्याची ठरते. त्याच त्या पिकांचे अनेक वर्षे पुनरावृत्त परिभ्रमण व रासायनिक खतांच्या प्रशस्त वापरामुळे जमिनीची उत्पादकता व पिकांची रोगप्रतिकारक शक्ती कमी झाली. कापूस लागवडीच्या पुनरावृत्तीमुळे जमीन उत्पादकतेवर हानीकारक परिणाम होऊन परतावा प्रमाण घटले. सर्वेक्षित आत्महत्याग्रस्त कुटुंबाच्या एकूण ४२ पीक संरचना दिसून आल्या. यापैकी ८३२ (५४.९६%) कुटुंबांच्या पीक संरचनांत कापूस पिकाचे प्राबल्य आहे. यानंतरचा क्रमांक लागतो तूर व सोयाबीन या पिकांचा. प्रामुख्याने व्यापारी कास्तकारीत कापूस, सोयाबीन, उडीद, मूग व तूर या पिकांचे प्राबल्य आहे. ही सर्व हंगामी पिके असून प्रामुख्याने पावसावर निर्भर आहेत. कारण विदर्भ व मराठवाड्याच्या सर्वच जिल्ह्यांत पाणीपुरवठ्याच्या सुविधांचा अभाव आहे.


विदर्भ व मराठवाड्यातील कृषी वातावरणीय परिस्थिती कापसासाठी नव्हे तर इतर २७ प्रकारच्या तृण, कडधान्य, तेलबिया व द्विदल पिकांसाठी अधिक योग्य आहे. परंतु अपर्याप्त पीक शिक्षण, विस्तार सेवा व कौशल्यांच्या अभावामुळे आत्महत्याग्रस्त कुटुंबे पिकांच्या पुनरावृत्त परिभ्रमणावरच अवलंबून राहिली. त्यामुळे पीक व जमिनीची उत्पादकता घटून कास्तकारीतून आतबट्ट्याची स्थिती निर्माण झाली.

**आत्महत्याग्रस्त कुटुंबांच्या असमाधानकारक पीक उत्पादकतेची कारणे**

न्यूनतम सिंचन सुविधांमुळे आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबांची कास्तकारी पावसाच्या लहरीपणावर अवलंबून राहिली. सर्वेक्षित जिल्हे महाराष्ट्राच्या दुर्बल सिंचन पट्ट्यात येत असल्यामुळे शेतकऱ्यांना सिंचन सुविधा उपलब्ध करून घेण्यात समस्या आहेत.


सिंचन सुविधांच्या अभावामुळे पर्जन्यमानातील जराशी कमतरताही नापिकीस कारणीभूत ठरते. याव्यतिरिक्त खोटी बियाणे, भांडवलाची कमतरता, अपर्याप्त उत्पादनक्षमता, कीड व रोगांचा प्रादुर्भाव यांसारख्या इतर समस्यांचाही सामना करावा लागतो. आत्महत्याग्रस्त कुटुंबांनी विहिरी, पंपसेट व पाईपलाईनसारख्या पाणीपुरवठा सुविधांवर गुंतवणूक केली आहे. अनेकांच्या बाबतीत स्वगुंतवणूकनिर्मित सिंचन सुविधा उपलब्ध आहेत. त्यांच्या विहिरीत पाणी पातळीही पर्याप्त आहे. पंपसेट व पाईपलाईन सुसज्यताही आहे. परंतु सुरळीत वीजपुरवठा नसल्याने पिकांना वेळेवर पाणी देता येणे शक्य नाही. पिकांना वेळेवर पाणी देण्याच्या असमर्थतेमुळे पीक उत्पादकतेत

आलेख ९: आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबांची पिक संरचना (टक्के)




**संदर्भ:** क्षेत्र सर्वेक्षण

आलेख १०: आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबांच्या असमाधानकारक पिक उत्पादकतेची कारणे (टक्के)




**संदर्भ:** क्षेत्र सर्वेक्षण


घट होऊन कास्तकारी आतबट्ट्याची बनली. २९९ (१९.६८%) आत्महत्याग्रस्त कुटुंबांना बियाणे न उगवल्यामुळे नापिकीचा सामना करावा लागला. तर १२९ (८.४९%) व १२८ (८.४३%) कुटुंबांना अनुक्रमे न्यून पीक उत्पादन दर्जा व अपर्याप्त पावसाच्या समस्या भेडसावल्या. १०६ (६.९८%) कुटुंबांची पिके वाढलीच नसल्याने नुकसान झाले. तर काहींना अतिरिक्त पावसाचा फटका सहन करावा लागला. यवतमाळ जिल्ह्यातील अनेक आत्महत्याग्रस्तांची शेती जंगल/वन समीप असल्याने अनेकदा जंगली प्राण्यांनी त्यांच्या पिकांचे नुकसान केले (६.९८%). परंतु वन विभागाकडून त्यांना कोणतीही नुकसान भरपाई मिळाली नाही. ६५ (४.२८%) आत्महत्याग्रस्त कुटुंबांना बनावट बियाणांची समस्या तर १०७ (७.०४%) कुटुंबांना अपर्याप्त भांडवल समस्येचा सामना करावा लागला. अनेक कुटुंबांना पुन्हा पुन्हा बनावट बियाणांची विक्री केली गेली. त्यामुळे त्यांचे पीक व उत्पन्न वाया गेले. परंतु अशा व्यापाऱ्यांविरोधात कोणतीही शिक्षा अथवा न्यायालयीन कार्यवाहीचे एकही उदाहरण नाही.

**कर्ज, परतफेड व थकबाकीविषयक निर्देशांक :**

आत्महत्याग्रस्त कुटुंबांना उपभोग व पीक लागवड अशा दोन्हीही कारणांसाठी कर्जाची निकड भासते. दुष्काळ व बिगर पीक काळात उपभोग कर्जाची आवश्यकता भासते. तर नित्यक्रम लागवड व्यय आणि गुंतवणुकीकरिता कृषी कर्जांची आवश्यकता असते. औपचारिक वित्तीय संस्था सर्वेक्षित आत्महत्याग्रस्त गावांच्या अर्थव्यवस्थेतील अनौपचारिक वित्तीय मध्यस्थांचे उच्चाटन करू शकल्या नाहीत. याउलट औपचारिक वित्तीय संस्थाकडून मिळणाऱ्या भेदभावी वर्तणुकीमुळे आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबे अनौपचारिक मध्यस्थांच्या सापळ्यात ढकलली गेली. सहकारी वित्त व्यवस्थेतील राजकीय हस्तक्षेपामुळे आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबे सावकारी शोषणास बळी पडली. खाजगी सावकारांच्या अतिरिक्त अघोरी व्याजदरामुळे अनेक आत्महत्याग्रस्त कुटुंबांची लुबाडणूक झाली. त्यामुळे उपलब्ध सर्व अनौपचारिक मध्यस्थांकडून आत्महत्याग्रस्त कुटुंबाचे कर्ज प्रमाण सतत वाढत गेले. कर्जाचे प्रमाण व थकबाकी संचयामुळे ही शेतकरी कुटुंबे सातत्यपूर्ण कर्ज सापळ्यात अडकली.


आत्महत्याग्रस्त कुटुंबावरील सरासरी कर्जे (रु.१००४६३.७७) त्यांच्या कौटुंबिक उत्पन्न क्षमतेपेक्षा अधिक दिसून आली. कर्ज व थकबाकीच्या भाराने या शेतकऱ्यांना आत्महत्येच्या सापळ्यात ढकलले गेले. कर्जाचा वास्तव वापर, त्याची पर्याप्तता,

आलेख ११: आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुबाची उद्देशनिहाय एकूण कर्जे, परतफेड व थकबाकी (रूपये).





**संदर्भ:** क्षेत्र सर्वेक्षण

आलेख १२: आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबाचे उद्देशनिहाय कर्ज परतफेड व थकबाकीचे प्रमाण (टक्के)





**संदर्भ:** क्षेत्र सर्वेक्षण

आलेख १३: आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबाचे एकूण कर्ज, परतफेड व थकबाकी




**सदर्भ:** क्षेत्र सवेक्षण

आलेख १४: आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबाचे सरासरी कर्ज, सरासरी परतफेड व सरासरी थकबाकी (प्रती कुटुंब व प्रती एकर / रूपये)





**संदर्भ:** क्षेत्र सर्वेक्षण

व्याजदर आणि असमयसूचकतेचे मराठवाडा व विदर्भातील शेती व्यवसायावर दूरगामी परिणाम झाले. आत्महत्याग्रस्त शेतकरी व त्यांच्या कुटुंबावरही या सर्व बाबींचा अपेक्षित परिणाम झाला. प्रकर्षाने लघु व सीमांत शेतकऱ्यांचे कर्जावरील अवलंबित्व अधिक असल्याने त्यांचे अनौपचारिक कर्जावरील निर्भरत्वही अधिक असल्याचे स्पष्ट आहे. एकाच वेळी अनेक स्त्रोतांकडून कर्ज घेतल्याने या शेतकऱ्यांच्या कर्जफेड क्षमतेवर मर्यादा येऊन ते कर्जबाजारी बनले. तसेच थकबाकीदारांच्या यादीत त्यांची गणना झाली. आत्महत्याग्रस्त कुटुंबाचे बहुविध कर्ज प्रमाण ७१.२३% (१०८२) आहे. तर १०८२ (७१.२३%) बहुविध कर्जदारांची कर्जे कृषी व बिगर कृषी अशा दोन्ही उद्देशांसाठी होती. या सर्व कर्जदार (१०८२) आत्महत्याग्रस्त कुटुंबांची एकूण कर्ज रक्कम रुपये १२०२३९३०१ इतकी प्रचंड असल्याने प्रतिकुटुंब सरासरी कर्जाचा (रु.१११११२६.९०) भारही जास्त होता. या सर्व कुटुंबांची (१०८२) एकूण कृषी कर्ज रक्कम रुपये ५३३१३३.०० इतकी असून त्यापैकी फक्त १०.६१% रक्कमेची परतफेड झाल्याने ८९.३९% मुद्दल रक्कमेची थकबाकी असल्यामुळे भविष्यातील कर्जाचा मार्ग आपोआप बंद पडला. विशेष म्हणजे अनिर्दिष्ट कर्जाचे प्रमाण ५७.६२% इतके प्रचंड असल्याने या कर्जास एकप्रकारे अनुत्पादक कर्ज संबोधले जाऊ शकते. आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबांनी लग्न (३७.८४%) व आरोग्य (६२.५०%) यासारख्या कारणांसाठीही कर्जे घेतल्याचे दिसून आले (पाहा : आलेख क्रमांक ११, १२, १३ व १४).

भारताचे खाजगी आरोग्य खर्चाचे राष्ट्रीय उत्पन्नाशी प्रमाण २०% पेक्षाही अधिक आहे. याचा अनुभव आत्महत्याग्रस्त कुटुंबांच्या आरोग्य कर्जातही प्रतिबंधित होताना दिसतो. या सर्व कर्जदार कुटुंबांची (१०८२) एकूण गुंतवणूक कर्जे रुपये २७७१६००१ इतकी असून त्यापैकी फक्त ९.००% कर्जाची परतफेड झाली असल्याने ९१.००% गुंतवणूक कर्जे थकित होती. गुंतवणूक कर्जे प्रामुख्याने सिंचन सुविधा निर्मितीसाठी काढली होती. कारण यवतमाळ व उस्मानाबाद जिल्ह्यात सार्वजनिक सिंचन सुविधा उपलब्ध नाहीत. आत्महत्याग्रस्त कुटुंबाचे प्रतिएकर सरासरी कर्ज रुपये १९३०६.१२ इतके तर त्यापैकीची सरासरी प्रतिएकर परतफेड १८५२.५१ (९.९५%) रुपये इतकी मर्यादित असल्याने प्रतिएकर ९०.४०% थकबाकी शिल्लक होती. अशा प्रकारचे वित्तीय निर्देशांक आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबासाठी चांगला भविष्यकाळ वर्तवू शकत नाहीत (पाहा : आलेख क्रमांक १२).

सर्व कर्जदार आत्महत्याग्रस्त (१०८२) कुटुंबाची प्रतिएकर उद्देशनिहाय कर्जे अनुक्रमे कृषी लागत (८५६०.२१), अनिर्दिष्ट अलागत (५६९९०७१), लग्न (४६७.५६), आरोग्य (४४.९६), उत्सव (१९.१७) आणि शिक्षण (६४.२३) अशी आहेत. याच क्रमाने प्रति आत्महत्याग्रस्त कुटुंब कर्जाची सरासरी अनुक्रमे रुपये ४९२७२.९२, ३२८०७.७६, २६९१.३१, २५८.७८, ११०.९१ आणि रुपये ३६९.६९ अशी निदर्शनास येते (पाहा : आलेख क्रमांक १६). एक मात्र निश्चित आहे की लग्न, आरोग्य, सण-उत्सव व शिक्षण यासारख्या बिगर कृषी कर्जांचे प्रमाण तुलनेने अत्यल्प आहे. याचाच अर्थ विदर्भ व मराठवाड्यातील शेतकरी कुटुंबाची अनुत्पादक कर्ज उभारणी किंवा बिगर कृषी अनुत्पादक कर्ज वापर अत्यल्प आहे. प्रस्तुत निष्कर्ष अत्यंत महत्त्वाचा असून असाच निष्कर्ष आमच्या २०१२ मधील यवतमाळ जिल्ह्यातील शेतकरी आत्महत्यांच्या अभ्यासावेळी मिळाला होता (पाहा :परचुरे आणि तळुले; २०१२, गोखले राज्यशास्त्र व अर्थशास्त्र संस्था,

**आलेख १५: आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबाचे उद्देशनिहाय प्रती कुटुंब व प्रती एकर सरासरी कर्ज प्रमाण (रूपये).**





**संदर्भ:** क्षेत्र सर्वेक्षण

**आलेख १६: आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबाचे संस्थात्मक व खाजगी कर्ज प्रमाण (टक्के)**




**संदर्भ:** क्षेत्र सर्वेक्षण

**आलेख १७: आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबांच्या कर्जाचे स्रोतनिहाय विवरण (टक्के)**




**संदर्भ:** क्षेत्र सर्वेक्षण

नाबार्ड). त्या वेळच्या अभ्यासांती असे निदर्शनास आले होते की, शेतकरी आत्महत्याग्रस्त कुटुंबांनी आपली ९६.७२% कर्ज रक्कम फक्त कृषी उत्पादक कार्यासाठीच वापरली होती.


यवतमाळ आणि उस्मानाबाद जिल्ह्यातील आत्महत्याग्रस्त कुटुंबांनी आपली भांडवली निकड पूर्ण करण्यासाठी बँक (५.०८%) आणि स्वयं सहाय्यता बचतगट (३८.९८%) यासारख्या औपचारिक कर्ज मार्गांचाही अवलंब केला होता. तर अनौपचारिक कर्जमार्गांत मित्र (०.८४%), नातेवाईक (१३.९८%) आणि सावकार (२८.३८%) इत्यादी मार्गांचा वापर केला. जिरायत व सिंचित शेती असणाऱ्या दोन्हीही प्रकारच्या कुटुंबांनी वेगवेगळ्या मार्गांचा वापर करून आपली कर्जाची निकड पूर्ण करण्याचा प्रयत्न केला आहे. प्रामुख्याने ही कर्जे सिंचन सुविधा निर्मितीसाठीची गुंतवणूक कर्जे होती

(पाहा : आलेख क्रमांक १६ व १७). अधिकतम कर्जे अनौपचारिक स्वरूपाची किंवा खाजगी होती. अशा अनौपचारिक कर्जांमध्ये प्रामुख्याने सावकारी कर्जाचे प्राबल्य निदर्शनास येते. कारण विदर्भ व मराठवाड्याच्या ग्रामीण कृषी अर्थव्यवस्थेत सावकारांचे पारंपारिक प्राबल्य आहे. विशेषकरून असे प्राबल्य विदर्भात अधिक प्रमाणात दिसून येते. शेतकऱ्यांचे सावकारांकडून कर्ज घेणे अविरत सुरू आहे. कारण सावकारी कर्जे मागेल तेव्हा व कमी वेळात उपलब्ध असतात. शेतकऱ्यांना बँक कर्जाकरिता मध्यस्थांनाही पैसे आदा करावे लागतात. हे कमिशन साधारणपणे कर्ज मुद्दलाच्या १०.००% असते. बँका व सहकारी संस्थात असे मध्यस्थ कार्यरत असतात. याव्यतिरिक्त औपचारिक किंवा बँक कर्जाची कागदपत्रे पूर्ण करणे व त्यावरील प्रक्रिया वेळकाढू असल्याने शेतकरी कंटाळतात. तसेच या सर्व लघु व सीमांत शेतकऱ्यांची औपचारिक कर्जक्षमताही कमी असते. त्यांची पूर्वीच्या कर्जांची परतफेड झालेली नसते. त्यामुळे त्यांना नवीन कर्जे मिळू शकत नाहीत किंवा नवीन औपचारिक कर्जास ते पात्र नसतात.

**प्रतिएकर व प्रतिक्विंटल A2+FL प्रमाणे प्रत्यक्ष उत्पादन व्ययमूल्य आणि किमान आधारभूत व प्रचलित बाजार किंमतीनुसार आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबांना मिळणारा निव्वळ मोबदला :**


आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबांनी उत्पादित केलेल्या बहुतांशी पिकांकरिता प्रचलित बाजार किंमतीनुसार निव्वळ ऋणात्मक परतावा प्राप्त होतो. तर किमान आधारभूत किंमतीनुसार प्रतीकात्मक धनात्मक परतावा मिळतो हे नमूद करावे लागेल. कारण महाराष्ट्रात पंजाब किंवा हरियाणाप्रमाणे किमान आधार किंमतीची अंमलबजावणी केली जात नाही. महाराष्ट्रातील किमान आधार किंमत यंत्रणेच्या अनुपस्थितीमुळे बाजार किंमतीवर उर्ध्वगामी दबाव निर्माण होऊ शकत नाही. पर्यायाने महाराष्ट्रातील बहुतांश कृषी बाजार किंमती प्रतीकात्मक किमान आधार किंमतीपेक्षा कमी राहतात. त्यामुळे शेतकऱ्यांना

आलेख १८: आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबाचे $A_2$+FL प्रमाणे प्रती एकर उत्पादन व्यय मूल्य, किमान आधार किंमती, बाजार किंमती व पिकनिहाय किमान आधार व बाजार किंमतीनुसार निव्वळ मिळकत (रूपये).




**संदर्भ:** क्षेत्र सर्वेक्षण

**आलेख १९: आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबांचे $A_2$+FL प्रमाणे प्रती क्विंटल उत्पादन व्यय मूल्य व किमान आधार आणि बाजार किंमतीनुसार निव्वळ परतावे (रूपये).**




**संदर्भ:** क्षेत्र सर्वेक्षण

**टिप :**

१. ***,**** = कापूस व ज्वारीच्या लांब व आखूड धागा व संकरीत आणि मालदांडी वाणांच्या किमान आधारभूत किंमतीच्या सरासरी आहेत.

२. **किआकिं** = किमान आधारभूत किंमती

लागत मूल्यापेक्षा कमी किंमती मिळून आतबट्टा सहन करावा लागतो. बहुतांश वेळा कृषी उत्पन्न बाजार समितीतील प्रचलित कृषी बाजार किंमती प्रतीकात्मक किमान आधार किंमतीपेक्षा कमी दिसून येतात. आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबांच्या मिळकतीपेक्षा आदान किंमती व कृषिमूल्य लागत अतिरिक्त असल्यामुळे शेती उत्पादनातून ऋणात्मक परतावा मिळून त्यांना कर्जाच्या सापळ्यात ढकलले जाते. यवतमाळ व उस्मानाबाद जिल्ह्यातील १५१९ आत्महत्याग्रस्त कुटुंबांच्या सर्वेक्षणाधारित प्रचलित A2+FL प्रमाणे सरासरी कृषी लागत व्ययाची गणना करून त्याची किमान आधार व प्रचलित बाजार किंमतीशी तुलना केली तर बहुतांश पीक उत्पादनांकरिता शेतकऱ्यांना निव्वळ ऋणात्मक परतावा मिळताना दिसून आला. प्रतीकात्मक किमान आधारभूत किंमतीनुसार ज्वारी, बाजरी आणि गहू पिकांकरिता शेतकऱ्यांचे प्रतिएकर निव्वळ ऋणात्मक परतावे अनुक्रमे २३८९.७३, १६५०.८६ आणि १४२३.१२ रुपये इतके होते. तर प्रचलित बाजार किंमतीनुसार याचे प्रमाण कापूस, तूर व सोयाबीन या पिकांकरिता अनुक्रमे रुपये ४७७५.२९, ४५१२.९८ आणि २८६५.६१ इतके दिसून आले. नगदी पिकांच्या फाजिल पुरवठा काळात बाजार किंमती तीव्रपणे कोसळतात. तेव्हाही महाराष्ट्रात किमान आधार किंमतीस खरेदीच्या सुविधा क्वचितच उपलब्ध असतात. अर्थात, अशी उपलब्धता अडचणीतील शेतकऱ्यांच्या आंदोलनावर निर्भर असल्याचे अनेकदा सिद्ध झाले आहे. यापूर्वी मराठवाडा व विदर्भातील शेतकरी आत्महत्याग्रस्त कुटुंबांनी असा अनुभव कापूस, तूर, सोयाबीन व हरभरा पिकांच्या बाबतीत घेतला आहे. आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबांच्या पीक संरचनेत कापूस, तूर, सोयाबीन, भूईमूग या पिकांचे प्राबल्य असल्याने पीक उत्पादनातून होणारे बहुतांश तोटे या पिकांमुळे होतात. ज्वारी व बाजरी सारख्या पिकांचे उत्पादन प्रामुख्याने कौटुंबिक उपभोगाकरिता घेतले

जाते. यामुळे या पिकांच्या बाबतीत बाजाराधिक्य क्वचितच अनुभवास येते. कापूस, तूर, बाजरी, गहू, हरभरा व सूर्यफूल या पिकांच्या बाबतीत वास्तव उत्पादन व्यय लागत व किमान आधारभूत व बाजार किंमतीत अधिक तफावत आहे. पर्यायाने या पिकांपासून प्रतिएकर निव्वळ ऋणात्मक मिळकतीचा यवतमाळ व उस्मानाबाद जिल्ह्यातील आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबांना अधिक खडतर सामना करावा लागला.

पावसाच्या लहरीपणामुळे पीक उत्पादनातील घट हे उपरोल्लेखित प्रतिएकर निव्वळ ऋणात्मक परताव्याचे प्रमुख कारण आहे. कारण विदर्भ व मराठवाड्यातील दोन्ही अभ्यास जिल्ह्यांमध्ये सिंचन सुविधांचा अभाव आहे. परंतु प्रतिएकर वास्तव उत्पादन लागत मूल्याची प्रचलित बाजार किंमतीशी तुलना केल्यास सोयाबीन (४५७५.०६), मूग (९१५.४५), उडीद (५८५५.५१), ऊस (१७३६६.१७), भूईमूग (२३३५०.५९) आणि कांदा (१३२९८.०९) या पिकांपासून सर्वेक्षित आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबांना प्रतिएकर निव्वळ धनात्मक परतावे मिळू शकले.


कापूस, तूर, ज्वारी, बाजरी, गहू, हरभरा आणि सूर्यफूल या पिकांकरिताचे A2 + FL प्रमाणे सरासरी प्रतिएकर उत्पादन व्ययमूल्य अनुक्रमे २६१३५.२९, २५५८०.१८, १४६९८.१३, ११७१२.८६, १५७०२.३७, १७४९९.७६ आणि रुपये १४०१९.६१ इतके आहे. प्रस्तुत सरासरी उत्पादन खर्च यवतमाळ व उस्मानाबाद जिल्ह्यातील सर्वेक्षित आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबाच्या (१५१९) A2 + FL प्रमाणे प्रतिएकर उत्पादन खर्चांची सरासरी आहे. अल्पशः प्रमाणातील कापसाच्या एकाधिकार खरेदीचा अपवाद वगळता इतर पिकांकरिता राज्य शासनाचा किमान आधार किंमतीअन्वये कृषी बाजारातील हस्तक्षेप शून्य आहे. कृषी बाजारातील किमान आधार किंमतीच्या अनुपस्थितीमुळे या सर्व पिकांच्या प्रचलित बाजार किंमती किमान आधार किंमतीपेक्षा कमी राहतात. त्यामुळे या सर्व पिकांवरील बाजार किंमतीनुसार प्रतिएकर निव्वळ परतावे काल्पनिक किमान आधार किंमत परताव्यांपेक्षा कमी राहतात. त्यामुळे कापूस, तूर आणि करडईच्या काल्पनिक किमान आधार किंमतीपेक्षा कमी बाजार किंमतीस झालेल्या विक्रीतून आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबांना प्रतिएकर अनुक्रमे ४७७५.२९ (कापूस), ४५१२.९८ (तूर) आणि रुपये २८६५.६१ (करडई) इतके ऋणात्मक परतावे मिळाले. परंतु जर या पिकांकरिता किमान आधार किंमतीस विक्री सेवा उपलब्ध असती तर आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबांना प्रतिएकर रुपये १०८०.७१, २१३९.८३ आणि ४६६१.६५ इतके निव्वळ धनात्मक परतावे मिळाले असते. जर सोयाबीन, मूग, उडीद आणि भुईमूगाकरिता किमान आधार किंमतीस खरेदी सेवा उपलब्ध असत्या तर या आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबाचा प्रतिएकर निव्वळ नफा अनुक्रमे रुपये ३४८०.६६, ५६०६.०५, ५२७९.५१ आणि ५०३४४६.८४ इतका असू शकला असता. अर्थात, हे नफ्याचे आकडे प्रचलित बाजार किंमत नफ्यापेक्षा अधिक आहेत (पाहा : आलेख १८ व १९). परंतु किमान आधार किंमतीच्या गैरहजेरीत असे धनात्मक परतावे किंवा नफ्याचे दर प्रतीकात्मक ठरतात यात शंका नाही. आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबाचे कृषी उत्पादनावरील धनात्मक व ऋणात्मक परतावे प्रामुख्याने प्रचलित बाजार किंमत निर्भर आहेत. कारण कृषी बाजार किंमती प्रतीकात्मक किमान आधार किंमतीपेक्षा नेहमीच कमी असल्याच्या दिसून आल्या. कारण किमान आधार किंमत यंत्रणेचे अस्तित्व प्रतीकात्मकच राहिले. या शेतकरी कुटुंबांची शेती

पर्जन्यमान निर्भर असल्याने पाऊसमानातील कमतरतेमुळे उत्पादन कमी होऊन त्यांचे तोटेही वाढताना दिसून आले. अनुमान काय तर प्रचलित बाजार किंमतीन्वये शेतकऱ्यांच्या अपेक्षेपेक्षा कमी परताव्याची प्रमुख कारणे उत्पादन व्ययमूल्य वृद्धी, न्यून उत्पादकता व किमान आधार किंमतीपेक्षा कमी बाजार किंमती ही होत. त्यामुळे महाराष्ट्राच्या शेतकरी आत्महत्याग्रस्त जिल्ह्यांतील कृषी संकट हे प्रामुख्याने कृषी बाजार अपयश, कापणी उपरांत व्यवस्थापन अभाव आणि किमान आधार किंमत अभावनिर्मित आहे. यामुळे या सर्व शेतकऱ्यांना पीक उत्पादनातून सतत तोटे होत राहिल्याने त्यांच्या कर्जबाजारीपणात वाढ झाली आणि अंतिमतः कर्जबाजारीपणा हे शेतकरी आत्महत्यांचे प्रमुख कारण बनले. त्यामुळे कृषी उत्पादनातील तोटे कमी करण्यासाठी आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबांनी सर्व पिकांकरिता किमान आधार किंमतीच्या अंमलबजावणीची मागणी केली. परंतु महाराष्ट्राचे प्रशासन व राजकीय दुर्लक्षाचा अनुभव पाहता हे अशक्यप्राय वाटते.

**शेतकरी आत्महत्यांच्या जोखीम घटकांचा मागोवा :**

आत्महत्या ही जरी वैयक्तिक कृती असली तरी ती बहुविध व सातत्यपूर्ण सामाजिक, आर्थिक आणि मानसिक कष्टप्रद जीवनमानातून मार्ग काढण्याकरिता संत्रस्त व्यक्तीने घेतलेला आत्यंतिक कमालीचा निर्णय असतो. त्यामुळे आत्महत्येसारख्या निर्णयाच्या एकच एक कारणाकडे अंगुलीनिर्देश करणे सोपे नाही. सर्वेक्षित यवतमाळ व उस्मानाबाद जिल्ह्यांतील शेतकरी आत्महत्यांस जबाबदार घटक प्रामुख्याने आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक व मानसिक स्वरूपाचे होते. या शेतकऱ्यांच्या आत्महत्यांस एकूण बावीस (२२) घटक कारणीभूत होते. या कारक घटकांची ढोबळ

आलेख २०: सर्वेक्षण आधारित शेतकरी आत्महत्याच्या जोखीम घटकाचा मागोवा





**संदर्भ:** क्षेत्र सर्वेक्षण

वर्गवारी अनन्य आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक, सामाजिक-मानसिक, सामाजिक-राजकीय, आर्थिक-सामाजिक-राजकीय व सांस्कृतिक अशी करण्याचा प्रयत्न केला आहे. अशी वर्गवारी करताना आम्हांस आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबे व गावातील ज्येष्ठांशी केलेल्या संभाषणाचा उपयोग झाला. आर्थिक कारणांत संपूर्ण किंवा आंशिक नापिकी (१२२८/८०.८४% व १०५८/६९.६५%), कर्ज वसुलीचा दबाव (९६२/६२.६७%), आत्महत्या आपदग्रस्ताचे आजारपण (८२/५.४०%) आणि कुटुंबातील प्रदीर्घ आजारपणाचा असह्य औषध खर्च (९६/६.३२%) इत्यादी बाबींचा समावेश होता. आर्थिक-सामाजिक-राजकीय व सांस्कृतिक वर्गवारीत कुटुंबप्रमुख आपदग्रस्त (१२८६/८४.६६%), आपदग्रस्ताची लग्नायोग्य मुलगी किंवा बहीण (२८७/१८.८९%), कुटुंबातील आत्महत्येची पार्श्वभूमी (६७/४.४१%) आणि आपदग्रस्ताचे गाव व शेजारच्या गावातील शेतकरी आत्महत्येची पार्श्वभूमी (३४४/२२.६५%) इत्यादी कारणांचा समावेश होता. या सर्व कारणांचा संचयी परिणाम होऊन आपदग्रस्त शेतकऱ्यांच्या मनावर प्रचंड मानसिक ताण येऊन त्यांच्या वर्तणुकीत बदल घडून आला. आपदग्रस्तांच्या वर्तणुकीतील बदलांचे स्वरूप; अचानक अबोलपणा (११४०/७५.०५%), एकंदरीत वर्तणुकीत बदल (४०८/२६.८६%), मद्यपानास सुरुवात (३११/२०.४७%), आत्महत्येसंबंधी चर्चा (१७७/११.६५%), पती-पत्नी व कौटुंबिक विवादास सुरुवात (७६/६.१९% व ७६/५.००%) आणि शेजारी व गावातील लोकांबरोबर भांडणतंटा (अनुक्रमे ७३/४.८१% व ४२/२.७६%) अशा प्रकारचे होते (पाहाः आलेख क्रमांक २०). अशा सर्व जोखीम संयोगाच्या पार्श्वभूमीमुळे शेतकरी आत्महत्येची कृती एकप्रकारे जटिल व क्लिष्ट समस्या बनली आहे. अशा प्रकारची गुंतागुंत सोडविण्यासाठी सार्वजनिक धोरण, समाजाची भूमिका व स्वयंसेवी संस्थांचा हस्तेक्षप अशा प्रकारच्या बहुविध गुणकीय दृष्टिकोनाची आवश्यकता आहे. असे घडले तरच तीन दशकांहून अधिक काळ सुरू असलेले महाराष्ट्रातील शेतकरी आत्महत्यांचे दृष्टचक्र भेदता येऊ शकते.

**महिला व पुरुष शेतकरी आत्महत्या :**

ग्रामीण समाजरचनेत पितृसत्ताक कुटुंब पद्धतीचे प्रचलन अगदी सामान्य मानले जाते. शेतकरी समाजात कुटुंब प्रमुखपदी शक्यतो कुटुंबातील ज्येष्ठ पुरुष असतो. त्यामुळे कुटुंबातील सर्व जबाबदाऱ्या या कुटुंबप्रमुखांच्या खांद्यावर असतात. त्यामुळे संकटसमयी कुटुंबप्रमुख एकप्रकारे तणावाखाली असतो. परंतु सर्वेक्षित आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबे शक्यतो विभक्त असून त्यांचे कुटुंबप्रमुख तरुण व्यक्ती असल्याचे दिसून आले. त्यांचा कुटुंबाची जबाबदारी सांभाळण्याचा व कास्तकारीचा अनुभवही कमीच होता (आलेख क्रमांक २१). त्यामुळे उपरोल्लेखित ताणतणावांमुळे त्यांच्यावर (पाहा : आलेख क्रमांक





संदर्भः क्षेत्र सर्वेक्षण

२०) दबाव येऊन असे तरुण शेतकरी आत्महत्यांस बळी पडले. त्यामुळे बहुतांशी आपदग्रस्त (१५१९ पैकी १३८३/९१.०५%) शेतकरी पुरुष असल्याचे दिसून आले. या सर्व (१३८३) कुटुंबांनी आत्महत्येमुळे अपल्या विभक्त कुटुंबातील जबाबदार व्यक्ती गमाविल्यामुळे अनुभवी व तरुण महिला शेतकरी विधवांची स्थिती अधिकच दयनीय बनली. कारण त्यांची कुटुंबे विभक्त होती व त्याचे कुटुंबप्रमुख नुकतेच शेती व्यवसायात उतरलेले तरुण पुरुष होते. एकत्र कुटुंब पद्धतीत उपलब्ध असलेला मानसिक व सामाजिक पाठिंबा अशा विभक्त व छोट्या कुटुंबात अपेक्षिता येऊ शकत नाही. त्यामुळे अशा शेतकरी कुटुंबातील आत्महत्या मृत्यूदराचे प्रमाणही अधिक असल्याचे दिसून आले.

**आपदग्रस्त शेतकऱ्यांचा वयोगट :**

एकूण १५१९ आपदग्रस्त शेतकऱ्यांपैकी १०६५ (७०.११%) आपदग्रस्त पन्नास वर्षांपेक्षा कमी वयाचे होते. तर २५२ (१६.५९%) आपदग्रस्त शेतकरी पन्नास ते साठ वर्षे वयोगटात येत होते. १४७ (९.६८%) आत्महत्याग्रस्त शेतकरी वयोमानाने ज्येष्ठतेच्या गटात येत होते. कारण त्यांचे वय साठ वर्षांपेक्षा अधिक होते. विशेष म्हणजे २१ (१.३८%) आत्महत्याग्रस्त





संदर्भ: क्षेत्र सर्वेक्षण

शेतकरी अठरा वर्षांपेक्षा कमी वय असलेली तरुण मुले होती. एकूण ४५१ (२९.६९%) आत्महत्याग्रस्त शेतकरी अठरा ते पस्तीस अशा साहसी वयोगटातील असल्यामुळे त्यांच्या आत्महत्यांमुळे संबंधित कुटुंबाची अपरिमित हानी झाली. तरुण शेतकरी जेव्हा त्यांच्या अपेक्षित उत्पन्न क्षमतेस धक्का बसतो व इच्छित सामाजिक व आर्थिक जीवनमान जगणे अशक्य बनते तेव्हा वैफल्यग्रस्त होऊन आत्महत्येचा मार्ग निवडताना दिसून आले.

विशेष म्हणजे यवतमाळ व उस्मानाबाद जिल्ह्यातील या आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांचे सरासरी वयोगामन ४२.३२ वर्षे असे तरुण वयोगटात मोडणारे होते. अशा वयात त्यांनी शेती व्यवसायात नुकताच प्रवेश केलेला असतो (आलेख क्रमांक २२). या वयात एका विशिष्ट दर्जाचे जीवनमान व उत्पन्नाचे स्वप्नही असते. परंतु ते अपूर्ण राहिल्यामुळे निर्माण झालेल्या व संचयित निराशेमुळे हे तरुण शेतकरी आत्महत्येच्या सापळ्यात ढकलले गेले होते.

**पात्र-अपात्र शेतकरी आत्महत्या व शासकीय सानुग्रह अनुदान :**

आत्महत्योपरांत आपदग्रस्त शेतकरी कुटुंबास महाराष्ट्र शासनाकडून एक लक्ष रुपये सानुग्रह अनुदान देण्याची योजना आहे. परंतु प्रशासनाचे लक्ष हे सानुग्रह अनुदान कसे टाळता येईल याकडेच अधिक असल्याचा अनुभव येतो. याकरिता तसेच आत्महत्यांची संख्या कमी दाखविण्याकरिता या आत्महत्यांचे पात्र, अपात्र,




**संदर्भ:** क्षेत्र सर्वेक्षण

एकूण व चौकशीसाठी प्रलंबित प्रकरणे अशा चार वर्गवारी केल्या जातात.

पात्र व अपात्र शेतकरी आत्महत्यांची बेरीज एकूण शेतकरी आत्महत्येपेक्षा नेहमीच कमी असते. कारण प्रत्येकवेळी मोठ्या प्रमाणात शेतकरी आत्महत्यांची प्रकरणे चौकशीकरिता प्रलंबित ठेवली जातात. अशी चौकशी सानुग्रह अनुदानाची पात्रता निश्चित करण्यासाठी केली जाते. याकरिता आपदग्रस्त शेतकरी गृहितकी (Presumptive) जमीनमालक असणे आवश्यक मानले जाते. अन्यथा संबंधित प्रकरण सानुग्रह अनुदानासाठी अपात्र मानून ती आत्महत्या 'अपात्र शेतकरी आत्महत्या' म्हणून घोषित केली जाते. म्हणजेच असे प्रकरण बिगर शेतकरी आत्महत्या मानले जाते. यामुळे राज्य प्रशासनाला राज्यातील शेतकरी आत्महत्यांची संख्या तांत्रिकदृष्ट्या कमी करून सानुग्रह अनुदानाची रक्कम वाचविणेही शक्य झाले. याला फक्त प्रशासकीय लबाडी असेच नामाभिधान दिले जाऊ शकते. आत्महत्या आपदग्रस्त शेतकऱ्याच्या नावे जर जमीनमालकी निर्देशक ७/१२ उतारा नसेल तर प्रशासन त्यास बिगर शेतकरी घोषित करते. त्यामुळे अशा शेतकऱ्याची आत्महत्या 'अपात्र आत्महत्या' ठरल्याने अशा आपदग्रस्ताच्या कुटुंबास एक लाख रुपयांचे सानुग्रह अनुदान नाकारले जाते. कारण भारतातील जमीनमालकी अनुमानित (Conclusive) नसून गृहीत (Presumptive) स्वरूपाची आहे. अशी गृहीत स्वरूपाची जमीनमालकी महसुली खात्याच्या जमीन ७/१२ उताऱ्यामार्फत निश्चित केली जाते. महाराष्ट्रात प्रशासनाने आपदग्रस्त शेतकऱ्यांचे शेतकरी व बिगर शेतकरी असे वर्गीकरण करण्यासाठी अशा प्रकारच्या गृहीत जमीनमालकी पद्धतीचा अवलंब केल्याने अनेक शेतकरी आत्महत्या 'अपात्र आत्महत्या' ठरल्या. त्यामुळे राज्यातील शेतकरी आत्महत्यांची संख्याही चलाखीने कमी करणे शक्य झाले. तसेच ७/१२ चा उतारा नावे नसणाऱ्या आपदग्रस्त शेतकऱ्यांच्या कुटुंबीयांना सानुग्रह अनुदानापासूनही वंचित ठेवले गेले. यामुळे अनेक कुटुंबांना आत्महत्योपरांत मनःस्ताप सहन करावा लागला. पंजाब सरकारने शेतकरी आत्महत्या सानुग्रह अनुदानाची रक्कम दोन लाख रुपये केली आहे. एकूण १५१९ शेतकरी आत्महत्याग्रस्त कुटुंबांपैकी फक्त ६०० (३९.५० टक्के) कुटुंबांना राज्य शासनाचे सानुग्रह अनुदान मिळू शकले. उर्वरित पैकी ४०५ (२६.६६%) आत्महत्या अपात्र ठरविल्या गेल्या व ५१५ (३३.८४%) प्रकरणे चौकशीसाठी प्रलंबित होती (आलेख क्रमांक २३). प्रलंबित प्रकरणातील आपदग्रस्त शेतकरी कुटुंबांना सरकारी भ्रष्टाचाराचा सामना करावा लागतो. बहुतांशी अपात्र आत्महत्या प्रकरणे महिला शेतकरी आत्महत्यांची आहेत. कारण

पितृसत्ताक ग्रामीण समाजात महिलांच्या नावे जमीन असणे तसे दुरापास्त असते. आपदग्रस्त महिला खऱ्या शेतकरी असूनही प्रशासकीयदृष्ट्या बिगर शेतकरी ठरतात. कारण त्यांच्या नावे जमीन नसल्याने त्यांच्या आत्महत्याही अपात्र शेतकरी आत्महत्या गणल्या जाऊन आत्महत्योपरांत कुटुंबाला सानुग्रह अनुदान मिळत नाही.

**अनुमान व धोरणात्मक दूरदृष्टी :**

१९८० नंतरचे भारतीय कृषीचे सीमांतीकरण आणि कृषी पायाभूत गुंतवणुकीतून सार्वजनिक क्षेत्राच्या माघारीमुळे कृषी उत्पादन व्ययमूल्यात वाढ होऊन कृषी क्षेत्राच्या अवनतीस कारक ठरले. परिणामी, भारताच्या अनेक राज्यांत शेतकरी आत्महत्यांचे सत्र सुरू झाले व त्यात सातत्याने वाढ होत गेली. महाराष्ट्रातील शेतकरी आत्महत्या दारिद्र्य किंवा गरिबीमुळे घडून येत नाहीत. त्या शेतकऱ्यांच्या किंवा त्यांच्या जमिनीच्या उत्पादक अकार्यक्षमतेमुळे होतात. तर प्रामुख्याने या आत्महत्या अपेक्षित व प्रत्यक्ष उत्पादन मूल्यातील तफावतीतून आलेल्या विफलतेतून होतात असे वास्तव आहे. उत्पादनवाढीच्या लाभाने सुधारित शेतीच्या प्रयत्नांत कृषी आदानांची मागणी वाढून त्यांच्या किंमती भरमसाठ वेगाने वाढल्या. त्यामुळे उत्पादन लाभापेक्षा आदान व्ययमूल्य वाढून उत्पादक मिळकतीपेक्षा अधिक झाले. परिणामतः कर्जफेड अशक्य झाल्याने कर्जसंचय वाढीस लागून हे शेतकरी कर्जबाजारी बनले. वर्षानुवर्षे अशीच स्थिती राहिल्याने विदर्भ व मराठवाड्यातील शेतकऱ्यांना आत्महत्येच्या मार्गाने त्यांचे जीवनमान संपवावे लागत आहे. विदर्भ व मराठवाड्याच्या पीक आकृतीबंधात कापसाचे प्राबल्य आहे. या पिकासाठी खात्रीलायक सिंचन सुविधा, रासायनिक खते व किटकनाशकांची अधिक आवश्यकता असते. परंतु सिंचन दुर्भिक्षामुळे उत्पादकता कमी होऊन कृषी उत्पन्न अनिश्चितता निर्माण झाली. कापसासारख्या व्यापारी पिकाच्या पुनरावृत्ती व उत्पादन लोभापायी अतिरिक्त खते व किटकनाशकांच्या वापरामुळे शेतीतून घटत्या उत्पादन फलाचा प्रत्यय आला. २०१९ मध्ये A2 + FL प्रमाणे कापसाचा प्रतिएकर उत्पादन खर्च रुपये २६१३५.२९ इतका असताना प्रतिक्विंटल किंमत मात्र ४४५० रुपये इतकी होती. त्यामुळे आपदग्रस्त शेतकरी कुटुंबांचा कापूस पिकाचा एकरी तोटा ४७७५.२९ रुपये होता (पाहा : आलेख क्रमांक १८ व १९). राज्य सरकारची कापूस एकाधिकार योजना अपयशी ठरल्यामुळे महाराष्ट्रातील शेतकऱ्यांचे बाजार व खाजगी व्यापाऱ्यांवरील अवलंबित्व वाढले. सोयाबीन, तूर, ज्वारी, गहू, बाजरी, भुईमूग, कांदा आणि हरभरा इत्यादी पिकांच्या बाबतीतही आपदग्रस्त शेतकरी कुटुंबांना शेतमाल विक्रीच्या अडचणींचा सामना करावा लागला. या सर्व पिकांसाठी आधार किंमती कागदावरच अस्तित्वात आहेत. परंतु वास्तवात मात्र उपलब्ध नाहीत. कृषी मालांच्या प्रचलित बाजार किंमती शक्यतो किमान आधार किंमतीपेक्षा कमीच दिसून येतात. परिणामतः आपदग्रस्त शेतकरी कुटुंबांचा प्रचलित बाजार किंमतीनुसार प्रतिएकर पीकनिहाय तोटा अनुक्रमे कापूस (४७७५.२९), तूर (४५४१.९८), ज्वारी (२०६२.१३), बाजरी (३५२२.८६), गहू (१२४२.३७), हरभरा (२८३८.२६) आणि करडई (२८६५.६१) असा राहिला. परंतु जर किमान आधार किंमत विक्री सेवा उपलब्ध असती तर आपदग्रस्त शेतकरी कुटुंबांचे कापूस, सोयाबीन, तूर, मूग, उडीद आणि करडई या पीक उत्पादनांचे एकरी धनात्मक परतावे १९८०.७१, ३४४०.६६, २१३९.८४, ५६०५.०५, ५२७९.५१ आणि रुपये ४६६१.६५ इतके असले असते.

औपचारिक वित्तीय संस्थांच्या असमाधानकारक कामगिरीमुळे निम्म्याहून अधिक (८४९/५५.९१%) आपदग्रस्त शेतकरी कुटुंबांना सावकारी कर्जाचा छळ सहन करावा लागला. अनौपचारिक कर्जदारांत प्रामुख्याने व्यापारी, मित्र, नातेवाईक व सावकारांचे प्राबल्य आहे. सावकारी कर्जावरील व्याजदर किमान ३६ व कमाल १२०% इतके प्रचंड असल्याचे दिसून येतात. कारण हे व्याजदर प्रतिमाह आकारले जातात. विशेष म्हणजे १११८ (७३.६०%) आत्महत्या आपदग्रस्त शेतकरी कुटुंबांना किमान आधार किंमत संरचना ज्ञात नव्हती (सुद्धा पाहा : Situation Assessment Survey, NSSO; 2013). ६५ (४.२८%) आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबांना बनावट बियाणांमुळे नापिकीचाही सामना करावा लागला. १०६ (६.९८%) आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या पिकांची योग्य प्रमाणात वाढ न झाल्यामुळे तोटा झाला आणि २१ (१.३८%) शेतकऱ्यांना वेळेवर कृषी आदाने खरेदी करू न शकल्यामुळे तोटा झाला. कर्जाचा वापर, उपलब्धतेची वेळ, पर्याप्तता व व्याजदरामुळे आत्महत्या आपदग्रस्तांच्या आर्थिक जीवनमानावर दूरगामी परिणाम झाले. अतिरिक्त (किमान ३६ ते कमाल १२०%) खाजगी व्याजदरामुळे कर्ज मुद्दल अल्प कालावधीत दुप्पट होत असल्याने अशा कर्जांच्या थकबाकीत कमालीची वाढ झाली. त्यामुळे या शेतकऱ्यांच्या आत्महत्या दारिद्र्यामुळे नव्हे तर कृषी लागवडीतून धनात्मक मिळकतीअभावी होत आहेत. मराठवाडा व विदर्भाच्या पीक आकृतीबंधाने तृणधान्ये, कडधान्ये, द्विदल पिके, तेलबिया व भाजीपाल्याच्या दिशेने संक्रमण करणे आवश्यक आहे. कारण मराठवाडा व विदर्भाची कृषी वातावरणीय परिस्थिती या पिकांकरिता अनुरूप आहे. याकरिता राज्य सरकारने प्रभावी हस्तक्षेप करून कृषी माहिती व विस्तार कार्यक्रम हाती घेऊन दर्जेदार ग्रामीण कृषी पायाभूत सुविधा निर्माण करणे काळाची गरज आहे. औपचारिक कर्जाच्या उपलब्धतेमुळेही कृषी संसाधन वापराची कार्यक्षमता वाढू शकेल. अखिल भारतीय पातळीवर सार्वजनिक बँकांचे कृषी कर्ज नेहमीच १८ टक्क्यांपेक्षा कमी राहिले. या सर्व बाबी सार्वजनिक नियोजन पातळीवरील गांभीर्याला आमंत्रित करतात. मराठवाडा व विदर्भ हे प्रदेश महाराष्ट्राचे कापूस, कडधान्ये व तेलबियांचे आगार आहे. त्यामुळे कापूस प्रक्रिया, कापड गिरण्या, तेल व दाळ मिल यासारखे कृषी पीक आकृतीबंध संलग्न उद्योग मूल्य वृद्धी व बिगर कृषी रोजगार संधी मोठ्या प्रमाणात निर्माण करू शकतात. यामुळे मराठवाडा व विदर्भाच्या ग्रामीण भागातील परिस्थिती बदलून पुणे व मुंबई किंवा इतर शहरांच्या दिशेने होणारे स्थलांतर थांबेल. यापूर्वीच्या सरकारी आर्थिक शमन कार्यक्रमांचे परिणामही तात्पुरत्या स्वरूपाचे राहिले. कारण दीर्घकाळात असे त्रस्तता शमन कार्यक्रम अपरिणामकारकच ठरले (उदा. १९८७, २००४, २००८, २०१७......इत्यादी). आर्थिक कार्यक्रमांचे उद्दिष्ट ग्रामीण अर्थव्यवस्थेच्या कणा भक्कमीकरणाचे नसेल तर त्यांची सकारात्मक फलश्रुती अशक्य आहे. त्रस्तता शमन कार्यक्रम अंमलबजावणीतील भ्रष्टाचार दूर करणेही महत्त्वाचे आहे. मराठवाडा व विदर्भातील शेतीवरचा भार कमी करण्यासाठीच्या सार्वजनिक योजना अत्यावश्यक तर आहेतच आहेत. या दोन्ही प्रदेशांत बिगर कृषी रोजगार संधी निर्माण केल्या तर शेतीवरील निर्भरत्व कमी होऊ शकते. अकराव्या पंचवार्षिक योजनेने ८.५% समग्रलक्षी आर्थिक विकास व शेवटच्या दोन वर्षांकरिता तो १० टक्के आणि संपूर्ण योजनाकाळात कृषी विकासाचा दर ४% अपेक्षिला होता. परंतु हे सर्व अवास्तव ठरले. कारण

२००९-२०१० च्या तिसऱ्या व चौथ्या तिमाहीत कृषिक्षेत्राचा वृद्धिदर ऋणात्मक राहिला. यावरून भारतातील कृषी क्षेत्राचे अनन्यसाधारणत्व अधोरेखित होते. नियोजनपूर्वक महत्त्व बहाल करून विशेष लक्ष्यीकरणाचे धोरण अंगिकारल्याशिवाय कृषिक्षेत्राच्या अपेक्षित वृद्धीचे लक्ष्य साध्य करणे शक्य नाही. मराठवाडा व विदर्भाच्या पीक आकृतीबंधातील अपेक्षित संक्रमणामुळे जमीन व श्रमिकांची उत्पादकता सुधारू शकते. यामुळे कृषी उत्पादन लागत मूल्यही घटू शकते. पशुपालन, दुग्ध व्यवसाय, कुक्कुटपालन, कृषिप्रक्रिया आणि विस्तार सेवांसह ग्रामीण औद्योगिक पाया विकसित केला तर विदर्भ व मराठवाड्यातील शेतकऱ्यांना मुख्य प्रवाही आर्थिक क्रियाकलापात सामाविष्ट करता येऊ शकते. यामुळे शेतीवरील प्रत्यक्ष अवलंबित्व कमी होऊन कृषी उत्पन्न दुप्पटीसह सर्वसमावेशक वृद्धीचे दृष्टिपथातील अपेक्षित उद्दिष्ट साध्य करता येऊ शकेल.

**संदर्भ सूची**


१. Dnyandev C. Talule (2020), Farmer Suicides in Maharashtra, 2001-2018: Trends Across Marathwada and Vidarbha, Economic and Political Weekly, Vol. LV, No. XXV, ISSN: 0012-9976, OCLC: 46735231, pp. 116-125.

२. E. Revathi (2004), Suicide as a Vulnerability: Some Dimensions of Agrarian Distress in Andhra Pradesh Center for Economics and Social Sciences, Hyderabad.

३. G. K. Grover, Sanjay Kumar, and Kamal Vatta (2002), Market Imperfections and Farmers' Distress in Punjab" Glimpses of Indian Agriculture; Micro Aspects, PP. 765-778.

४. G. Parthasarathy and Shameem (1998), Suicides of Cotton Farmers in Andhra Pradesh: An exploratory Study" Economic and Political Weekly. March 28, 1998, ISSN: 0012-9976, OCLC: 46735231, Vol. XXXIII No. XIII, PP. 720-726.

५. G. Satyanarayana, M.V. Raghavulu and A. Ram Mohan (2003), Causes for Farmers' Suicides: A Study of Anantapur district of Andhra Pradesh, PP. 318-325.

६. Ganapati, M.N. and Venkoba Rao (1966), A Study of Suicide in Madurai, Journal of Indian Medical Association, Vol. 46, PP. 18-23.

७. GoI (2013), Situation Assessment Survey, National Sample Survey Organisation, New Delhi.

८. GoI (2015), National Crime Records Bureau.

९. Hegde R S (1980), Suicide in Rural Community, Indian Journal of Psychiatry, Vol. 22, PP. 368-370.

१०. M. S. Swaminathan (2006), Commission on Farmers Welfare, Planning Commission.

११. Muzaffar Assadi (1998), Farmers' Suicides: Signs of Distress in Rural Economy" Economic and Political Weekly. Vol. III. No. XIV, ISSN: 0012-9976, OCLC: 46735231, April 4, PP.747-48. 2.2.

१२. Muzaffar Assadi (1998), Farmers' Suicides: Signs of Distress in Rural Economy" Economic and Political

Weekly. Vol. III. No. XIV, ISSN: 0012-9976, OCLC: 46735231, April 4, PP.747-48. 2.2.

१३. Nandi et. al. (1979), Is Suicide Preventable by Restricting the Availability of Lethal Agents? A Rural Survey of West Bengal, Indian Journal of Psychiatry, Vol. 21, PP. 251-255.

१४. R. S. Deshpande (2002), Suicide by Farmers' in Karnataka: Agrarian Distress and possible Alleviatory Steps, Economic and Political Weekly, ISSN: 0012-9976, OCLC: 46735231.

१५. Rajas Parchure and Dnyandev Talule (2012), Agrarian Distress and Farmer Suicides in Yavatmal District, NABARD Study, Gokhale Institute of Politics and Economics, Pune, India.

१६. S. R. Ahlawat (2003), Sociology of Agrarian Crisis: Peasant Suicides and Emerging Challenges, Man and Development, Vol. XXV, Sep 2003 PP. 97-110.

१७. Vasavi, A R (1999), Agrarian Distress in Bihar, Economic and Political Weekly, Vol. XXXIV, No. XXXII, ISSN: 0012-9976, OCLC: 46735231, Aug. 07, 1999, PP. 2263-2268.

१८. ज्ञानदेव चि. तळुले (२०१९), महाराष्ट्रातील शेतकरी आत्महत्या; २००१-२०१८: मराठवाडा आणि विदर्भातील आत्महत्यांचे जिल्हानिहाय संख्यात्म, स्थलवास्तव, नियोजन व संकल्पनात्म परिप्रेक्ष विश्लेषण, अर्थसंवाद, खंड XXXXII, अंक IV, पृष्ठ३२७-३५२.

◆

## निवेदन : अर्थसंवाद वर्गणी

अर्थसंवाद अंकाचे वर्गणीदार होऊ इच्छिणाऱ्या महाविद्यालय / शैक्षणिक संस्था / व्यावसायिक संस्था/ग्रंथालये यांच्यासाठी **त्रैवार्षिक वर्गणी रु. २०००/- तर पंचवार्षिक वर्गणी रु. ३०००/-** आहे. ही वर्गणी कृपया 'मराठी अर्थशास्त्र परिषद' या नावाने राष्ट्रीयीकृत बँकेच्या डिमांड ड्राफ्टद्वारे किंवा संपादकांशी संपर्क साधून NEFT (मराठी अर्थशास्त्र परिषद, बँक ऑफ इंडिया, राजारामपुरी, कोल्हापूर. खाते क्र. : 094720110000368, IFSC : BKID0000947) द्वारे पाठवावी. **मनिऑर्डर व वार्षिक वर्गणी स्वीकारली जात नाही.** सदर वर्गणी कृपया प्रमुख संपादकाच्या पुढील पत्त्यावर कव्हरिंग लेटरसह पाठवावी.

**डॉ. राहुल शं. म्होपरे**

'सर' निवास, री.स.नं. ३३/क/२, प्लॉट नं. १८, लेक व्ह्यू कॉलनी, दीपा गॅस गोडावूनच्या पाठीमागे, उजळाईवाडी, ता. करवीर, जि. कोल्हापूर - ४१६ ००४ भ्रमणध्वनी : ९९२३८७९०२०

**- प्रमुख संपादक, अर्थसंवाद**

# ब्रेकींग थ्रू (Breaking Through)

**संतोष दास्ताने** †

लेखक : ले. इशर जज अहलुवालिया
रूपा पब्लिकेशन्स इंडिया लि. नवी दिल्ली, २०२०
ISBN : 978-93-90260-28-7
पृष्ठ संख्या : १७३
किंमत : रु. ३९५/-

आर्थिक सिद्धांत व आर्थिक धोरण यांचा समन्वित विचार ज्यांनी सतत मांडला अशा भारतातील मोजक्या अर्थतज्ज्ञांमध्ये श्रीमती इशर जज अहलुवालिया यांची गणना होते. त्यांना सुमारे पाऊण शतकाचे आयुष्य लाभले. अर्थशास्त्राच्या विविध उपशाखांमध्ये त्यांनी मुशाफिरी केली. त्या त्या ठिकाणी आपले संशोधन व विचार त्यांनी निर्भीडपणे मांडले. अनेक शोधनिबंध, वृत्तपत्रीय लेख, पुस्तके, समित्यांचे अहवाल त्यांच्या नावावर जमा आहेत. प्रस्तुत पुस्तक हे त्यांचे शेवटचे-सातवे पुस्तक असून, आपल्या एकूण वैचारिक प्रवासातील आठवणी यात गुंफल्या आहेत. एका अभ्यासू, प्रामाणिक, सोज्वळ आणि हृद्य व्यक्तिमत्त्वाची ओळख या पुस्तकात वाचकाला होत जाते.

पुस्तकाचे साधारणपणे तीन स्थूल भाग पडतात. पहिल्या भागामध्ये लेखिकेची कौटुंबिक पार्श्वभूमी, बालपण, विद्यार्थी जीवन यांचे वर्णन आहे. त्यांचा जन्म १ ऑक्टोबर १९४५ रोजी झाला. त्यांना नऊ बहिणी आणि एक भाऊ होता. त्यांचे बालपण प्रथम इंदौर व नंतर कोलकता येथे गेले. अर्थशास्त्र घेऊन त्यांनी बी. ए. पदवी प्रेसिडेन्सी कॉलेज, कोलकता येथून मिळवली. तेथे त्या सुखमोय चक्रवर्ती यांच्या विद्यार्थिनी होत्या. त्यांनी एम. ए. पदवी 'दिल्ली स्कूल ऑफ इकनॉमिक्स' येथून मिळवली. तेथे अनेक नावाजलेल्या शिक्षकांच्या अध्यापनाचा त्यांना लाभ घेता आला. त्यात अमर्त्य सेन, सुखमोय चक्रवर्ती (त्या वर्षी ते कोलकता येथून दिल्ली स्कूलच्या प्राध्यापक वर्गात रुजू झाले होते), के. एन. राज, जगदीश भगवती, पद्मा देसाई, धर्मा कुमार, मृणाल दत्त चौधरी, सुरेश तेंडुलकर, के. सुंदरम यांचा समावेश होता. त्या एम्. ए. पहिल्या वर्गात उत्तीर्ण झाल्या. त्या वर्षी आठ जणांना पहिला वर्ग मिळाला, त्यापैकी सात विद्यार्थिनी व एक विद्यार्थी होता, अशीही आठवण त्या देतात!

पीएच. डी. करण्यासाठी त्यांनी अमेरिकेतील 'मॅसेच्युसेटस् इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी' या प्रसिद्ध

† माजी अध्यक्ष, माजी विश्वस्त, मराठी अर्थशास्त्र परिषद.
आजीव सभासद क्र.: ६२, भ्रमणध्वनी : ९८२२००९९५४ ई-मेल: santosh.dastane@gmail.com

संस्थेत प्रवेश घेतला. स्टॅनले फिशर हे त्यांचे पीएच. डी. पदवीचे मार्गदर्शक होते. त्यांना त्या संस्थेमध्ये जगदीश भगवती, पॉल सॅम्युअलसन, रॉबर्ट सोलो, रिचर्ड एकौस अशा विख्यात अर्थतज्ज्ञांचेही मार्गदर्शन लाभले. त्या सर्वांशी त्यांचे अनौपचारिक व जिव्हाळ्याचे संबंध होते. तेथे अमेरिकेत आजारपणानिमित्त हॉस्पिटलमध्ये असताना जगदीश भगवती यांनी रोज त्यांची हॉस्पिटलमध्ये भेट देऊन त्यांना दिलासा दिला, तर सॅम्युअलसन यांनी हॉस्पिटलचे बिल भागवले, अशी आठवणही इशर देतात.

इथून पुढे साधारणपणे त्यांच्या पुस्तकाचा दुसरा भाग सुरू होतो. त्यांचा पीएच. डी. संशोधनाचा अभ्यास चालू असतानाच त्यांनी तेथे आंतरराष्ट्रीय नाणेनिधीच्या वॉशिंग्टन येथील कार्यालयात पॉलिसी इकनॉमिस्ट या पदावर काही काळ काम केले. तो अनुभव त्यांनी थोडक्यात दिला आहे. त्या कामाचा एक भाग म्हणून त्यांनी वेस्टइंडिज बेटांमधील विविध देशांना भेटी दिल्या. तेथील सरकारी अधिकारी, बँकांचे पदाधिकारी यांच्याशी होणाऱ्या चर्चा, वैचारिक देवाणघेवाण यांचा धोरण ठरवण्यासाठी नाणेनिधीस कसा उपयोग होतो ते त्यांनी दिले आहे. त्या देशातील संगीताच्या कार्यक्रमांचा कसा काय आस्वाद घेतला तेही इशर यांनी दिले आहे. त्याच सुमारास दोन मोठ्या घटना इशर यांच्या आयुष्यात घडून गेल्या. एक म्हणजे सन १९७१ साली त्यांचा माँटेक सिंह अहलुवालिया यांच्याशी विवाह झाला. माँटेक यांनी केंद्र सरकारमध्ये विविध उच्चपदीय जबाबदाऱ्या सांभाळल्या. ते देशाच्या नियोजन मंडळाचे उपाध्यक्षही होते. तसेच सन १९७६ मध्ये इशर यांनी पीएच.डी. साठीचा प्रबंध सादर करून ती पदवी प्राप्त केली. भारतीय अर्थव्यवस्थेचे समग्रलक्षी अर्थमितीय प्रतिमान असा काहीसा विषय त्यांच्या प्रबंधाचा होता.

सन १९७९ साली भारतात परतल्यावर त्यांनी संशोधन-लेखन क्षेत्रात जी बहुमोल कामगिरी केली त्याचे तपशील त्यांनी पुस्तकाच्या पाच प्रकरणांमध्ये विस्ताराने दिले आहेत. समग्रलक्षी अर्थशास्त्र व त्यावर बेतलेले देशाचे आर्थिक धोरण हा त्यांच्या अभ्यासाचा व संशोधनाचा मुख्य विषय. पुस्तके, शोधनिबंध, व्याख्याने, सर्वेक्षणांचे अहवाल यांच्यामार्फत त्यांचा व्यासंग बहरत गेला. याच काळात त्यांनी अनेक शैक्षणिक आणि प्रशासकीय जबाबदाऱ्या निभावल्या. दिल्ली येथील सेंटर फॉर पॉलिसी रिसर्च येथे त्या दीर्घकाळ प्राध्यापक पदावर होत्या. 'इंडियन कौन्सिल फॉर रिसर्च ऑन इंटरनॅशनल इकनॉमिक रिलेशन्स' या संस्थेच्या संचालकही होत्या. केंद्र सरकारच्या नॅशनल मॅन्युफॅक्चरिंग कॉम्पिटिटिव्हनेस कौन्सिलच्या सदस्य होत्या. तसेच इंटरनॅशनल फूड पॉलिसी रिसर्च इन्स्टिट्यूट, वॉशिंग्टन याच्या अध्यक्षा, पंजाब राज्य नियोजन मंडळाच्या उपाध्याक्षा, इंटरनॅशनल वॉटर मॅनेजमेंट इन्स्टिट्यूटच्या नियामक मंडळाच्या सदस्या अशी विविध मानाची पदे त्यांनी भूषविली. सन २००९ साली त्यांना पद्मभूषण या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

नजिकच्या काळात त्यांचे संशोधनाचे क्षेत्र काहीसे बदललेले दिसते. शाश्वत नागरीकरण, नागरी भागातील पायाभूत सोयी, नागरी परिवहन यंत्रणा, तेथील पेयजल पुरवठा, घन कचरा व्यवस्थापन या विषयांवर त्यांनी विपुल लेखन-चिंतन केलेले आढळते. त्यासाठी त्यांनी भारतभर प्रवास केला. स्थानिक पातळीवरील नगरपालिका-नगरपरिषदा यांच्या पदाधिकाऱ्यांशी चर्चा केल्या. या संदर्भात केंद्र सरकारने एक उच्चस्तरीय समिती नेमली होती. त्या समितीचे अध्यक्षपदच इशर यांच्याकडे होते. या विषयावरील प्राथमिक सांख्यिकी माहितीचे संकलन करणे, तिचे विश्लेषण करणे,

त्यानुसार जरूर त्या शिफारशी करणे अशी कामे त्यांनी निगुतीने केली. देशामध्ये ७३व्या व ७४व्या संविधान सुधारणांनी सत्तेचे विकेंद्रकरण केले खरे; पण प्रत्यक्षात ते कसे राबवयाचे, त्यासाठी आवश्यक ती पथ्ये कोणती, विकेंद्रीत सत्तेचा विकासासाठी नेमका कसा उपयोग करून घ्यायचा याचा वस्तुपाठच इशर यांच्या विचारातून आणि कृतीतून दिसून येतो. या कार्यक्रमाद्वारे नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या सबलीकरणाचा कार्यक्रम आखून दिला, असे म्हटले पाहिजे.

त्यांच्या एकूण करियरच्या आठवणी मांडणारे प्रस्तुत पुस्तक वगळून आणखी इतर सहा पुस्तके त्यांच्या नावावर आहेत. त्यातले पहिले पुस्तक - 'बिहेवियर ऑफ प्राइसेस अँड आउटपुट इन इंडिया' हे त्यांचे १९७९ सालचे पुस्तक म्हणजे त्यांच्या पीएच. डी. प्रबंधाची सुधारित आवृत्ती होय. त्यांची नंतरची दोन पुस्तके म्हणजे १९८९ सालचे 'इंडस्ट्रियल ग्रोथ इन इंडिया....'व १९९१ सालचे 'प्रॉडक्टिव्हिटी अँड ग्रोथ इन इंडियन मॅन्युफॅक्चरिंग.' देशातील दुय्यम क्षेत्रात पुरेशी गुंतवणूक होत नाही, उत्पादकतेत वाढ होत नाही व त्यामुळे एक प्रकारची कुंठितावस्था आली आहे असे अभ्यासपूर्ण प्रतिपादन त्यांच्या या पुस्तकांमध्ये आहे. औद्योगिक क्षेत्रावर अनेक नियंत्रणांचे ओझे असल्याने अशी अवस्था असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

अर्थव्यवस्थेतील परवाने-नियंत्रणे कमी करून उदारीकरण आणि खुलेपणा आणला जावा, आर्थिक सुधारणांना चालना मिळावी हा विचार इशर यांनी निरनिराळ्या मार्गाने त्या काळी मांडणे सुरू ठेवले. तशी आणखी एक संधी त्यांना १९९८ साली मिळाली. डॉ. मनमोहन सिंग यांच्या पासष्टाव्या वाढदिवसाच्या निमित्ताने एका गौरवग्रंथाचे संपादन इशर व इयान लिटल यांनी मिळून केले. भारताचा आर्थिक विकास व देशातील आर्थिक सुधारणा या विषयावर देशातील-विदेशातील आघाडीच्या अर्थतज्ज्ञांनी लिहिलेल्या शोधनिबंधांचे यात संकलन होते. अमर्त्य सेन, जगदीश भगवती, सी. रंगराजन अशा तज्ज्ञ मंडळींचे यात लेख होते व पुस्तकाची प्रस्तावनाही अभ्यासपूर्ण अशी होती. आर्थिक सुधारणांमागील तात्त्विक विचार, या प्रयत्नांची चिकित्सा, त्यातील अडचणी हे सर्व मुद्दे काही काळ चर्चेत राहिले.

आपल्या वैचारिक प्रवासातील शेवटची काही वर्षे देशातील नागरीकरण या विषयाचा इशर पाठपुरावा करीत होत्या हे वर आले आहेच. त्यातील अनुभव, त्या संदर्भातील संशोधन यावर त्यांनी २०१४ साली दोन पुस्तके प्रसिद्ध केली. एक म्हणजे अर्बनायझेशन इन इंडिया व दुसरे म्हणजे ट्रान्स्फॉर्मिंग अवर सिटीज्. याच मुद्यावर त्यांची व्याख्याने, वृत्तपत्रीय लेखन हेही त्या काळात सतत चालू राहिले. इंडियन एक्प्रेस, फिनान्शियल एक्स्प्रेस या वृत्तपत्रांमध्ये त्यांचे लेखन नियमितपणे प्रसिद्ध होत असे. नागरीकरणाकडे सकारात्मक दृष्टीने कसे पाहावे व ती एक विकासाची संधी मानून विकासाची गुणवत्ता कशी सुधारत न्यावी हे इशर यांच्या भूमिकेतून स्पष्ट होते. त्यांचे लेखन, संशोधन, चिंतन हे सगळे याची साक्ष आहे. देशातील ६९ शहरांमध्ये २००५ ते २०१४ या दरम्यान जी जवाहरलाल नेहरू नागरी पुनर्निर्माण मोहीम राबवण्यात आली तिची प्रेरणा इशर यांच्या संशोधन अभ्यासात होती.

पुस्तकाचा तिसरा भाग अगदी त्रोटक झाला आहे. त्यात त्यांचे शेवटचे लिखाण, कौटुंबिक तपशील, त्यांची आणि माँटेक यांची सेवानिवृत्ती, इशर यांचे स्वत:चे गंभीर आजारपण यांचे उल्लेख आहेत. अहलुवालिया कुटुंबाची आणि माजी पंतप्रधान मनमोहन सिंग यांची अगदी घनिष्ट मैत्री. त्यामुळे काँग्रेस सरकारच्या - संपुआ सरकारच्या कारकिर्दीत

इशर आणि माँटेक यांनी अनेक महत्त्वाच्या जबाबदाऱ्या सांभाळल्या. पण रालोआ सरकार आल्यानंतर हे कुटुंब सत्तेपासून दूर झाले. सेवानिवृत्ती हे एक निमित्त झाले इतकेच. पुस्तकाच्या शेवटच्या प्रकरणात अहलुवालिया दांपत्याने आपली पवन आणि अमन ही दोन मुले, सारा आणि शिल्पा या सुना आणि पाच नातवंडे यांच्या आठवणी दिल्या आहेत. व्यक्तिगत आठवणींचा हा भाग वाचकाला सुखावून जातो.

एका पारंपरिक मध्यमवर्गीय पंजाबी कुटुंबातील महिला कष्टाने व जिद्दीने अमेरिकेत जाऊन उच्च शिक्षण घेते, नोबेल पुरस्काराने सन्मानित अर्थतज्ज्ञांमध्ये वावरते, आपल्या व्यासंगी संशोधनाने सार्वजनिक क्षेत्रात आपले अनोखे स्थान निर्माण करते हे सारे विलक्षण आहे! अतिशय प्रामाणिक व पारदर्शी स्वरूपाच्या या आठवणी वाचकाला खिळवून ठेवतात. आर्थिक सिद्धांत व धोरण या क्षेत्रात लेखिकेचे व्यक्तिमत्त्व कसे घडत गेले ते सर्व येथे नितळपणे स्पष्ट होते. त्यांच्या निवेदनातील सच्चेपणा व वस्तुनिष्ठता मनाला भिडत जातात. अमर्त्य सेन, मनमोहन सिंग अशा दिग्गज व्यक्तींबरोबरील साहचर्याचे यात कितीतरी अनुभव दिलेले असले तरी त्यात त्यांनी आपला मोठेपणा मिरवला आहे, असे मुळीच दिसत नाही. जसे प्रसंग घडले तसे दिल्यामुळे थोडेसे खटकून गेलेले प्रसंगही लेखिकेने मोकळेपणाने दिलेले आहेत. सुखमोय चक्रवर्ती यांच्याबद्दलची एक आठवण या सदरात मोडते.

अर्थशास्त्राच्या अभ्यासकाला आणि संशोधकाला इशर यांच्या पुस्तकातून आठवणींच्या बरोबरीने कितीतरी जास्त वैचारिक खाद्य मिळते. सुरुवातीच्या भागात त्यांनी कोलकत्याचे प्रेसिडेन्सी कॉलेज व दिल्ली स्कूल ऑफ इकनॉमिक्स या दोन संस्थांमध्ये कशी निरनिराळी वैचारिक भूमिका जोपासली जात होती ते दिले आहे. प्रेसिडेन्सी येथे गणिती प्रतिमान व अमूर्त आर्थिक सिद्धांतनावर भर असे. तर दिल्ली येथील अभ्यासात अर्थशास्त्रातील सामाजिक पैलू व त्याबद्दलची आंतरक्रिया यावर भर असे. एक बौद्धिक आणि तार्किक शिस्त म्हणून सिद्धांतनावर भर असला, तरी अर्थशास्त्र हे शेवटी मानवकेंद्रित सामाजिकशास्त्र आहे हे विसरता कामा नये, असा संदेशच त्यांच्या भूमिकेतून मिळतो. हार्वर्ड व एमआयटी ही अर्थशास्त्राच्या क्षेत्रातील जगातील अव्वल विद्यापीठे. पण तेथेही हार्वर्ड येथे औपचारिकता व व्यावहारिकता जास्त तर एमआयटीमध्ये अनौपचारिक व व्यक्तिगत संबंधांवर भर असा फरक त्यांनी स्पष्ट केला आहे. टर्म पेपर तयार करताना सॅम्युअलसन कसे तपशीलवार मार्गदर्शन करीत व त्यामुळे अभ्यास करण्यास उत्साह व आनंद वाटत असे, शेवटी त्यांच्या टर्म पेपरलाच कशी अ श्रेणी मिळाली हे इशर आवर्जून नमूद करतात. इशर यांचे निष्कर्ष तितकेसे मान्य नसले, तरी त्यांनी आपले विवेचन तर्कशुद्ध पद्धतीने मांडावे याचा आग्रह किंडलबर्जर यांनी कसा धरला होता तीही आठवण इशर यांनी दिली आहे.

बाजारकेंद्रीत आर्थिक उदारीकरणाचे युग भारतात जुलै १९९१ नंतर अवतरले असे सर्वसाधारणपणे मानले जाते. पण अशा महत्त्वाच्या धोरणाची पूर्वपीठिकाही तितकीच महत्त्वाची असते. तथापि त्या संदर्भाकडे फारसे लक्ष जात नाही. देशातील आर्थिक आणि औद्योगिक क्षेत्रातील जाचक निर्बंध हटवण्याची गरज आहे असे एल. के. झा या अधिकारी व्यक्तीने १९८० सालच्या एका शोधप्रबंधात मांडले होते, हे इशर दाखवून देतात. अर्थशास्त्राच्या अभ्यासकांना हा संदर्भ मोलाचा वाटेल यात शंका नाही! तीच गोष्ट इशर यांच्या १९८९ च्या भारतातील औद्योगिक विकासाच्या कुंठितावस्थेबद्दलच्या पुस्तकाची. या विषयावर १९८३

साली इशर यांनी एक शोधनिबंध अमेरिकेतील एका आंतरराष्ट्रीय परिसंवादात वाचला होता. त्याच परिसंवादात त्या वेळेस प्रणब बर्धन यांनीही आपला शोधनिबंध वाचला होता व त्याचे निष्कर्षही जवळपास तसेच होते, असे श्रेयही इशर बर्धन यांना खुल्या मनाने देतात. हा प्रामाणिकपणा दुर्मिळ आहे हे खरे!

आपल्या आठवणी वाचकांसमोर उलगडताना लेखक, प्राध्यापक, संशोधक, व्यावसायिक, प्रशासक अशा अनेक भूमिकांचा समतोल इशर यांनी व्यवस्थितपणे साधलेला आढळतो. एक कुटुंबवत्सल गृहिणी, प्रेमळ आई, जबाबदार पत्नी, साक्षेपी संशोधक, अभ्यासू प्राध्यापक, विश्वासू सहकारी, यशस्वी लेखिका अशी त्यांची विविध रूपे वाचकाला स्तिमित करतात. संसार व करियर यांचा तोल कसा साधायचा याचा वस्तुपाठच इशर यांच्या पुस्तकातून मिळतो. देशातील व विदेशातील अनेक अर्थतज्ज्ञ, राजकारणी, मुत्सद्दी यांच्याशी त्यांच्या वैयक्तिक ओळखी होत्या; पण त्याचा त्यांनी बडेजाव मिरवला नाही का गैरफायदाही उठवला नाही. इशर व माँटेक यांची कारकीर्द एकाच क्षेत्रातील. पण त्यात स्पर्धा, टीका, असूया, व्यक्तिपूजा यांचा लवलेश नव्हता. त्यांचे संबंध पतीपत्नी, सहकारी, लेखनाचा चिकित्सक वाचक असे बहुपदरी होते. त्यात सहिष्णुता, परस्पर समजूत, आदरभाव, एकमेकांना मानसिक आधार देणे अशा सर्व भावना प्रतीत झालेल्या आढळतात. एक सुखद योगायोग असा की इशर यांचे प्रस्तुतचे पुस्तक लिहिले जात असतानाच माँटेक यांचेही त्यांच्या करियरचे अनुभव व आठवणी यांचे पुस्तक प्रसिद्ध झाले. त्यांच्याही इशर यांच्याबद्दलच्या भावना परस्पर सहकार्य, समजूतदारपणा, सहकारी, मित्र अशाच होत्या. त्यांनी आपले पुस्तक इशर यांनाच समर्पित केले आहे.

अर्थशास्त्र, आर्थिक धोरण, आर्थिक प्रशासन, भारताची आर्थिक प्रगती यात स्वारस्य असणाऱ्याने इशर अहलुवालिया यांचे पुस्तक जरूर वाचावे.

इशर यांचे २६ सप्टेंबर २०२० रोजी कर्करोगाने दुःखद निधन झाले.

◆

## निवेदन

मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या सर्व आजीव सदस्यांना व अर्थसंवाद लेखकांना कळविण्यात येते की, कार्यकारिणीच्या ठरावानुसार दि. १ एप्रिल २०२० पासून अर्थसंवाद हा '**तज्ज्ञ परिक्षित नियतकालीक**' करण्यात आलेला आहे. त्यामुळे यापुढील काळात अर्थसंवादचे लेख हे तज्ज्ञांकडून परिक्षण करुन घेऊन, गरजेनुरूप त्यामध्ये लेखकांकडून योग्य त्या सुधारणा करुन घेऊनच अर्थसंवादमध्ये प्रसिद्ध केले जातील. युजीसीचे बदलते धोरण आणि गुणवत्ता वाढीच्या अनुषंगाने सदर हितावह बदल अर्थसंवादमध्ये करण्यात आलेला आहे, याची सर्वांनी नोंद घ्यावी.

**- प्रमुख संपादक, अर्थसंवाद**

# काही नवीन आर्थिक संज्ञा

**शि. ना. माने** †

अवाढव्य मानवी आंतरक्रिया ही एक टाकसाळ आहे. भाषा ही एक त्या टाकसाळीतील चलन आहे. मागील एक-दीड वर्षात कोरोना काळात पुढील काही आर्थिक संज्ञा साकारल्या. त्या संज्ञांचा निव्वळ नामनिर्देश करण्याचा हा एक प्रयत्न.

थोडक्यात त्याचे स्वरूप असे : मूळ इंग्रजी संज्ञा, तिचा मराठी अर्थ आणि अखेरीस तिचा मराठी पर्याय दिला आहे.

१) Mask **अर्थ : मुसके**

बकरी किंवा बैल यांच्या तोंडावर बांधलेले एक प्रकारचे जाळे.

उभ्या पिकाची नासधूस होऊ नये म्हणून केलेली ही एक उपाययोजना. हळूहळू कोरोनाकाळात मनुष्यप्राण्यांपर्यंत तिचा प्रसार व वापर सुरू झाला. शक्यतो, गरजेनुसार मनुष्यप्राण्यांनी व्यक्त व्हावे. वाचाळपणाला वेसन घालावी. जेणे करून कोरोनाच्या जंतुंचा फैलाव रोखला जाईल. थोडक्यात, शक्यतो सर्वांनी मौनीबाबा व्हावे. मुसके हा मराठी पर्याय योग्य वाटतो.

२) Lockdownimics : मूळशब्द लॉकडाऊन तिचा मराठी अर्थ टाळेबंद.

संपूर्ण संज्ञेचा मराठी पर्याय म्हणून टाळेबंदाभिमुख आर्थिक धोरणाचे राज्यार्थकारण किंवा राज्यार्थशास्त्र.

कोरोनाचे संकट आकस्मिकपणे कोसळले. शासनाची तारांबळ उडाली. त्या संकटाची साखळी तोडण्याची धावाधाव सुरू झाली. तिचे स्वरूप थोडक्यात पुढीलप्रमाणे : तात्पुरते उपाय व दीर्घकालीन उपाय. सद्यस्थितीत तात्पुरत्या उपायांवर शासनाला जोर देणे भाग पडले.

३) Covidisation : या संज्ञेचे श्रेय कोविड टास्कफोर्सचे अध्यक्ष डॉ. संजय ओक यांना दिले पाहिजे. मूळ संज्ञा कोविड. तिचा मराठी अर्थ : कोविड विषाणू असा करता येईल. संपूर्ण संज्ञेचा पुढील मराठी पर्याय योग्य ठरवा. कोविडीकरण ही संज्ञा सुचवू इच्छितो. जसे मनमोहनॉमिक्स, रेगनॉमिक्स किंवा प्रोटिनॉमिक्स. कोरोना विषाणू महामारी रोखण्यासाठी काही सामाजिक अंतर ठेवण्याची तसेच आरोग्यविषयक सेवांची काळजी घेण्याची पथ्ये पाळणे अपेक्षित आहे. त्यात सर्वांचे हित आहे.

◆

† माजी अध्यक्ष, मराठी अर्थशास्त्र परिषद, निवृत्त प्राध्यापक, धनंजयराव गाडगीळ वाणिज्य महाविद्यालय, सातारा.
आजीव सभासद क्र. : १०८, भ्रमणध्वनी : ७७३८३५६७८१

# हिस्टेरेसिस (Hysteresis)

**जे. एफ. पाटील** †

## Hysteresis

हिस्टेरेसिस हा शब्द श्रमबाजाराच्या संदर्भात येतो. पण त्याची मूळ उत्पत्ती Hyster या शब्दातून होते. Hyster चा अर्थ गर्भाशय (Womb) असा आहे. गर्भाशयाच्या विकृतींना Hysteria असा शब्द वापरला जातो. त्यातून Hysteresis at Labour Market असा शब्दप्रयोग रूढ झाला आहे.

श्रम बाजारातील उच्चतर प्रदीर्घ बेरोजगारी दरामुळे नैसर्गिक बेरोजगारीच्या दरात वाढ होण्याची जी प्रवृत्ती आढळते त्याला हिस्टेरेसिस असे संबोधले जाते.

प्रदीर्घ मंदीच्या काळात श्रमिकांची कौशल्य घट होते. तसेच रोजगार शोधण्याची इच्छाही दुर्बल होते. कांही लोक रोजगार शोध थांबवितात. काही बेकायदेशीर मार्गाकडे वळतात. श्रमप्रवृत्तीमधील या विकृतीला Hysteresis असा शब्द आहे. यासाठी पुढील मराठी शब्दरचना सुचतात.

श्रम शैथिल्य

श्रम पराभूतता

श्रम वैफल्य / श्रम विफलता

श्रम उदासिनता

त्यापैकी ''श्रम वैफल्य'' ही शब्दरचना मूळशब्दाच्या अर्थाशी सुसंगत वाटते.

◆

### चूक दुरुस्ती

अर्थसंवादच्या जाने-मार्च २०२१ (खंड ४४-अंक४)च्या अंकात पृ. क्र. ३६३ वर अर्थ शब्दांची वाट पाहे यामध्ये जे. एफ. पाटील यांनी दिलेल्या असेट मॉनेटिझेशन या शब्दामधील मॉनेटिझेशन या शब्दाचे स्पेलींग Monitization असे नसून Monetization असे आहे. कृपया सर्व वाचकांनी नोंद घ्यावी.

**- प्रमुख संपादक, अर्थसंवाद**

† माजी अध्यक्ष, कार्याध्यक्ष व विश्वस्त, मराठी अर्थशास्त्र परिषद.
आजीव सभासद क्र. : ६२, भ्रमणध्वनी : ९४२२०४६३८२, ई-मेल : jfpatil@rediffmail.com

# महाराष्ट्र शासन
# महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ

(स्थापना : १९ नोव्हेंबर, १९६०)

**रवींद्र नाट्यमंदिर इमारत, दुसरा मजला, पु. ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी आवार, सयानी रोड, प्रभादेवी, मुंबई – ४०० ०२५**

दूरध्वनी : ०२२-२४३२५९२९/३१ फॅक्स : ०२२-२४३२ ५९३१ ई-मेल : secretary.sblc-mh@gov.in

संकेतस्तळ : https://msblc.maharashtra.gov.in


**मंडळाच्या योजना**

१. पुस्तक प्रकाशन योजना-विविध विषयांवरील बृहद्ग्रंथ प्रकाशित करणे
२. महाराष्ट्राचे शिल्पकार चरित्रमाला योजना
३. उत्कृष्ट ग्रंथांची भाषांतरे योजना
४. ललित व ललितेतर वाङ्मयाच्या प्रकाशनार्थ अनुदान योजना
५. नवलेखक पुस्तक प्रकाशनासाठी उत्तेजनार्थ अनुदान योजना
६. नवलेखक कार्यशाळा अनुदान योजना
७. नियतकालिकांना अनुदान योजना
८. स्व. यशवंतराव चव्हाण राज्य वाङ्मय पुरस्कार योजना, विंदा करंदीकर जीवनगौरव पुरस्कार योजना, श्री.पु. भागवत पुरस्कार योजना
९. अन्य मराठी साहित्य संमेलनांना अनुदान योजना.

**मंडळाची निवडक प्रकाशने**

१. मृगपक्षिशास्त्र (मूळ संस्कृतासह) हंसदेव विरचित-संपा. मारुती चित्तमपल्ली. पं. नरसिंशास्त्री भातखंडे
२. खगोलशास्त्राचे विश्व – डॉ. जयंत विष्णू नारळीकर
३. कलेची मूलतत्त्वे (R.G.Collingwood यांच्या The Principles of Art या पुस्तकाचे भाषांतर) – स.गं. मालशे, डॉ. मिलिंद मालशे
४. मराठी चित्रपटसृष्टीचा समग्र इतिहास-रेखा देशपांडे.
५. महाराष्ट्राचा खाद्यसंस्कृतीकोश – संपा. डॉ. अनुपमा उजगरे
६. आधुनिक महाराष्ट्राचा इतिहास खंड पहिला-के.के. चौधरी
७. श्री. चांगदेव पासष्टी (अर्थ व विवरणासहित) – स्वामी नित्यबोधानंदतीर्थ
८. आधुनिक संत आणि समाज – श्री. रवींद्र गोळे

**मंडळाची निवडक ४४४ पुस्तके ई-बुक स्वरुपात मंडळाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आली आहेत.**

**मंडळाच्या पुस्तकांचे जिल्हानिहाय वितरक**

१. मॅजेस्टिक बुक स्टॉल, गिरगाव, मुंबई
२. आयडियल पुस्तक, दादर, मुंबई
३. लोकवाङ्मयगृह, प्रभादेवी, मुंबई.
४. लक्ष्मी बुक डेपो, शिवाजी पेठ, ठाणे.
५. अक्षर साहित्य , चिपळूण, जि. रत्नागिरी.
६. अशोक एजन्सीज्, कणकवली, जि. सिंधुदुर्ग
७. ज्योती स्टोअर्स बुकसेलर, नाशिक.
८. अक्षय लॉ बुक सेलर्स, देवपूर, धुळे.
९. मे. शारदा प्रकाशन आणि बुक डेपो, जळगाव
१०. शब्दालय प्रकाशन, श्रीरामपूर, जि. अहमदनगर
११. मॅजेस्टिक बुक स्टॉल, पुणे.
१२. बलशेटवार बुक सेलर्स, सातारा.
१३. गजानन बुक स्टोअर्स, सोलापूर.
१४. मे. अजब पुस्तकालय, कोल्हापूर.
१५. मेहता बुक सेलर्स, कोल्हापूर.
१६. मे. धारा (साकेत) प्रकाशन, औरंगाबाद
१७. दीपाली बुक एजेन्सी, जालना.
१८. देबडबाड पुस्तक भांडार, नांदेड.
१९. शारदा बुक डेपो, अकोला.
२०. भारतीय पुस्तकालय, लातूर.
२१. मेसर्स प्रकाश बुक डेपो, अकोला.
२२. सरस्वती बुक्स अँड स्टेशनर्स, अमरावती.
२३. स्वराज्य भांडार महिला सेवा मंडळ, वर्धा
२४. मे. साहित्य प्रसार केंद्र, चंद्रपूर
२५. साहित्य वितरण केंद्र, चंद्रपूर
२६. मुद्रा बुक डेपो, पालघर
२७. मावळे बुक डेबो, कर्जत, जि. रायगड
२८. सुशांत बुक डेपो, नंदूरबार
२९. रत्नाकर बुक सेलर्स, मिरज, सांगली
३०. पूजा ग्रंथ वितरण, परभणी
३१. गोपाल बुक सेलर, हिंगोली
३२. अनुराग पुस्तकालय, अंबाजोगाई, बीड.
३३. टिकार बुक एम्पोरिअम, जि. बुलढाणा
३४. बालाजी बुक डेपो, वाशिम.
३५. गणेश पुस्तकालय, यवतमाळ.
३६. व्हीजन बुक शॉप, भंडारा.
३७. सनी स्टोअर्स, गोदिंया.
३८. राहुल ट्रेडिंग कंपनी अॅन्ड बुक डेपो, गडचिरोली

**शासकीय ग्रंथागारांचे पत्ते**
**महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाची पुस्तके मिळणाऱ्या शासकीय ग्रंथागारांचे पत्ते**

१. संचालक, शासन मुद्रण, लेखनसामग्री व प्रकाशन संचालनालय, नेताजी सुभाष मार्ग, चर्नीरोड, मुंबई ४०० ००४.
दूरध्वनी : (०२२) २३६३२६९३ २३६३०६९५, २३६३११४८, २३६३४०४९

२. व्यवस्थापक, शासकीय फोटोझिंको मुद्रणालय व ग्रंथागार, फोटोझिंको मुद्रणालय आवार, जी.पी.ओ. नजीक, पुणे ४११ ००१.
दूरध्वनी : (०२०) २६१२५०८०८

३. व्यवस्थापक, शासकीय मुद्रणालय व ग्रंथागार, सिव्हिल लाईन्स, नागपूर – ४४० ००१.
दूरध्वनी : (०७१२) २५६२६१५

४. सहायक संचालक, शासकीय लेखनसामग्री भांडार व ग्रंथागार, शहागंज, गांधी चौकाजवळ, औरंगाबाद ४३१००१.
दूरध्वनी : (०२४०) २३३१९९७

५. व्यवस्थापक, शासकीय मुद्रणालय व लेखनसामग्री भांडार, ताराबाई पार्क, कोल्हापूर – ४१६ ००३.
दूरध्वनी : (०२३१) २६५०३९५ २६५०४०२

**मंडळाकडून प्रकाशित ५२४ ग्रंथांवर २५२ अधिकृत वितरकांना ४० टक्के सूट मिळेल. जास्तीत जास्त पुस्तक वितरकांनी अधिकृत वितरणासाठी सहभागी व्हावे, असे आवाहन सचिव, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ यांनी केले आहे. अधिक माहितीसाठी मंडळाच्या https://msblc.maharashtra.gov.in संकेतस्थळाला भेट द्या.**

# अर्थसंवादसाठी
## हार्दिक शुभेच्छा

डॉ. मारोती तेगमपुरे
अंबड

डॉ. डी. डी. चौधरी
अहमदपूर

डॉ. स्नेहा देशपांडे
नागपूर

डॉ. जी. के. सानप
संगमनेर

डॉ.जी.के.सानप
संगमनेर

डॉ.श्रीनिवास खांदेवाले
नागपूर

डॉ. के. के. पाटील
परभणी

डॉ. अरुण पिसे
धुळे

डॉ. विजय भोपाळे
नांदेड

डॉ. मंगल भाटे/धोरण
अमरावती

डॉ. दिनकर टकले
जालना

डॉ. सुहास आव्हाड
संगमनेर

डॉ. अशोक खाचने
जळगाव

डॉ. तुकाराम मुंडे
मानवत

डॉ. अनिल सूर्यवंशी
अध्यक्ष, मराठी अर्थशास्त्र परिषद

डॉ. राहुल शं. म्हापेरे
अर्जुननगर

डॉ. जनार्दन काकडे
चंद्रपुर

प्रा. शिवाजी काकडे
गढी

डॉ. मृणालिनी फडणवीस
मा. कुलगुरू
सोलापूर

डॉ. राजू पाटील
सोलापूर

प्राचार्य डॉ. भारत खंदारे
जालना

डॉ. ए. डी. गोस्वामी
भुसावळ

डॉ. विष्णू एकनाथ घुमटकर
खामगाव

डॉ. माधव शिंदे
अहमदनगर

डॉ. सुरेश ढाके
धुळे

डॉ. राजू शिंदे
धुळे

डॉ. दि. व्य. जहागिरदार
नागपूर

डॉ. रामकृष्ण टाले
नागपूर

डॉ. विद्या आर. पाटील
धुळे

डॉ. मोहन सदामते
कुंडल

डॉ. सुभाष पाटील
पुणे

डॉ. मनीषकुमार कायरकर
बल्लारपूर

डॉ. निजवंती आर. टेंभुरणे
मोर्शी

डॉ. भाऊसाहेब देशमुख
राजूर

डॉ. अजय देरेकर
बारामती

डॉ. सुमित्रा विजय पवार
जळगाव

डॉ. चंद्रकांत रा. जाधव
वारणानगर

डॉ. प्रशांत हरमकर
अमरावती

डॉ. युगंधरा शै. टोपरे (देशपांडे)
औरंगाबाद

डॉ. वैशाली ल. देशमुख (नाईक)
औरंगाबाद

डॉ. आर. बी. भांडवलकर
यवतमाळ

डॉ. गणेश मांगडे
दापोली

डॉ. जयवंत इंगळे
विटा